सुविचार
कभी- कभी आपकी एक मुस्कान, मरुस्थल में जल की बूंद जैसी लाभदायक सिद्ध हो सकती है ।

विश्वसनीय बातम्यांचे एकमेव वृत्तपत्र

दैनिक यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/रविवार दि. १० नोव्हेंबर २०२४✦वर्ष ५३ वे✦अंक- ३० ✦पृष्ठे८✦किंमत १ रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

# संविधानाच्या नावाखाली लाल पुस्तके छापली नांदेडच्या सभेतून पंतप्रधान मोदींचा हल्लाबोल

नांदेड- संविधानाच्या नावावर लाल पुस्तक छापणं आणि त्यात संविधानाचा एक शब्दही न लिहिणं हा संविधान संपवण्याचा प्रयत्न आहे. काँग्रेसला देशात बाबासाहेब आंबेडकरांचे नाही तर स्वत:चं संविधान लागू करायचं आहे, अशी टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली आहे. तसेच काँग्रेस जाती जातीत भेद निर्माण करण्याचा प्रयत्न करते आहे, असा आरोपही त्यांनी केला. नांदेडमधील महायुतीच्या सभेत बोलताना त्यांनी काँग्रेससह महाविकास आघाडीवर जोरदार हल्लाबोल केला.

काँग्रेसचे लोक संविधानाच्या नावावर लाल पुस्तकांचे वाटप करत आहेत. त्यावर भारताचे संविधान असं लिहिलं आहे. मात्र, त्या पुस्तकाची पान कोरी आहेत. निवडणुकीच्या प्रचारात खोट्या गोष्टी पसरवण्याचं काम काँग्रेस पक्ष करतो आहे. संविधानाच्या नावावर लाल पुस्तक छापणं आणि त्यात संविधानाचा एक शब्दही न लिहिणं हा संविधान संपवण्याचा प्रयत्न आहे, अशी टीका नरेंद्र मोदी यांनी केली.



काँग्रेसला देशात बाबासाहेब आंबेडकरांचे नाही तर स्वत:चं संविधान लागू करायचं आहे. हाच प्रयत्न त्यांनी आणीबाणीच्या काळात केला होता. काँग्रेसच्या मनात बाबासाहेब आंबेडकरांप्रती द्वेष आहे. बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान काँग्रेसने काश्मीरमध्ये लागू होऊ दिलं नाही. तिथे कलम ३७० द्वारे वेगळा कायदा लागू केला. त्यांनी तेथील दलितांना कोणतेही अधिकार दिले नाहीत, आज हेच लोक दलितांच्या हक्काच्या आणि संविधान रक्षणाच्या गोष्टी करत आहेत, असेही ते म्हणाले.

गेल्या १० वर्षांपासून काँग्रेसचा जनाधार कमी होतो आहे. कारण दलित, आदिवासी, अनुसुचित जाती जमाती आणि ओबीसी एकत्र आहेत. १० वर्षांपूर्वीपर्यंत या जातीचं विभाजन होत होतं. ते काँग्रेससाठी फायद्याचं होतं. काँग्रेसलाही तेच हवं होतं. काँग्रेसने देशातील जाती-जातीत फुट पाडण्याचा प्रयत्न केला. आज देशाला ओबीसी पंतप्रधान मिळाला आहे. हेच काँग्रेस पचणी पडत नाही. त्यामुळेच ओबीसींना जातींमध्ये विभागण्याचं काम काँग्रेस करते आहे, असा घणाघातही त्यांनी केला. महाराष्ट्राच्या विकासासाठी राज्यात महायुतीचे सरकार असणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील जनतेने काँग्रेसचे शासन दीर्घकाळ बघितलं आहे. मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या समस्यांचं मूळ काँग्रेस आहे. त्यांनी कधीही येथील शेतकऱ्यांकडे लक्ष दिलं नाही. दुसरीकडे महायुतीने अनेक विकास प्रकल्प सुरू केले. शेतकऱ्यांना शेतपीकांसाठी पाणी देण्याचं काम महायुतीच्या सरकारने केलं. आम्ही महाराष्ट्रात ११ सिंचन प्रकल्पांना मंजुरी दिली. शेतकऱ्यांचे हित हीच आमची प्राथमिकता आहे, असेही ते म्हणाले.

# आमच्या योजनांची कॉपी करून कोणी पास होऊ शकत नाही

परभणी : महायुती सरकारने लाडकी बहीण, तरुण वर्ग आणि शेतक-यांसाठी सुरू केलेल्या कल्याणकारी योजनांमुळे विरोधकांच्या पोटात दुखत आहे. लाडक्या बहिणींनी खात्यात आलेले पैसे लवकर काढून घ्यावेत नाहीतर सरकार काढून घेईन असाही अपप्रचार विरोधकांनी केला. एवढ्यावरच न थांबता या योजनेसाठी पैसे कुठून आणणार असा सवाल विचारणा-या महाविकास आघाडीने आमची योजना चोरत आपल्या वचननाम्यात महिलांना प्रतिमाह ३ हजार रुपये देण्याचे जाहीर केले आहे.

आम्हाला पैसा कुठून आणणार असा प्रश्न विचारणारे विरोधक यासाठी पैसा कुठून आणणार? असा प्रतीप्रश्न विचारत आम्ही लाडक्या बहिणींना योजनेचे ५ हप्ते वाटप करून दाखवले आहेत. परंतू आमच्या योजनांची कॉपी करून कुणीही पास होऊ शकत नाही असे खडेबोल मुख्यमंत्री शिंदे यांनी विरोधकांना सुनावले. विधानसभा निवडणुकीच्या




पार्श्र्वभुमीवर परभणी येथे महायुती उमेदवारांच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवार, दि. ९ नोव्हेंबर रोजी प्रचार सभा संपन्न झाली. यावेळी महायुतीचे परभणी मतदार संघातील उमेदवार आनंद भरोसे, जिंतूर मतदार संघाच्या उमेदवार आ.मेघना बोर्डीकर, ज्येष्ठ नेते विजय वरपूडकर, माजी आ. हरिभाऊ लहाने, प्रताप देशमुख, राजू कापसे, बाळासाहेब जाधव, व्यंकटराव शिंदे, माणिक पोंढे, धम्मदीप रोडे आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, आमचे सरकार सत्तेवर आल्यास सर्व योजना बंद करत दोषी असणा-यांना तुरुंगात टाकू असा इशारा महाविकास आघाडीवाले देत आहेत. हिंमत असेल तर या सर्व कल्याणकारी योजनांची खुशाल चौकशी करावी. लाडक्या बहीण-भावांसाठी तसेच शेतक-यांसाठी आपण एकदा नव्हे तर शंभर वेळा तुरुंगात जाण्यास तयार आहोत असे मुख्यमंत्री शिंदे यांनी विरोधकांना ठणकावून सांगितले. शिवसेनेचा प्राण असलेला धनुष्यबाण काही लोकांनी काँग्रेसच्या दावणीला बांधला होता तो सोडवून आणण्याचे काम आम्ही केले. त्याची (पान ७ वर)

# आ. रमेशआप्पा कराड यांचा झंजावात

लातूर दि.०९ :- लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपा व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड यांनी शनिवारी रेणापूर शहरातील विविध प्रभागात अनेक ठिकाणी मतदारांच्या गाठीभेटी घेऊन मतदानरुपी आशीर्वाद मागितले. आ. कराड यांच्या माध्यमातून झालेल्या कोट्यावधी रुपये खर्चाच्या विविध विकासमुळे विविध समाजातील मतदारांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला.

महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून रेणापूर शहरात राज्यातील महायुती शासन सत्तेवर आल्यापासून आदिशक्ती रेणुकादेवी मंदिर परिसरात भक्तनिवास, रेणा नदीचा घाट बांधकाम व सुशोभीकरण,



मुस्लिम बांधवांसाठी शादीखाना, ईदगाह मैदान आणि कब्रस्तान संरक्षण भिंत, रेणापूर शहरासाठी नवीन पाणीपुरवठा योजना, शहरातील पथदिवे, रेड्डी समाज सभागृह, श्रीबालाजी मंदिर येथे भव्य सभागृह, श्रीराम मंदिर परिसर विकास, अशोक सम्राट बौद्ध विहार, नगरपंचायत प्रशासकीय इमारत, संत रोहिदास मंदिर सभागृह, खंडोबा मंदिर सभागृह, अमृतेश्र्वर मंदिर सभागृह, हनुमान मंदिर सभागृह, स्वामी समर्थ मंदिर सभागृह, अहिल्यादेवी होळकर समाज मंदिर, विविध प्रभागातील स्मशान भूमी, दहा अंगणवाडी विकसित करणे, रेणापूर शहरासह नगरपंचायत अंतर्गत असलेल्या वाडी तांड्यात अंतर्गत सिमेंट रस्ते, नाली बांधकाम, गरजूंना घरकुले यासह मूलभूत सुविधा आणि सार्वजनिक विकासाबरोबरच वैयक्तिक लाभाच्या योजना मोठ्या प्रमाणात मिळाल्याने प्रचार दौऱ्यात प्रत्येक प्रभागातील मतदारांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला. रेणापूर शहरातील सानेगुरुजी (पान ७ वर)

# जगप्रसिद्ध सारंगी वादक पंडित राम नारायण यांचे निधन

मुंबई : - आंतरराष्ट्रीय



स्तरावर आपल्या सारंगी वादनानं लाखो रसिकांना मंत्रमुग्ध करणारे पद्मविभूषण पंडित राम नारायण यांचे शुक्रवारी (८ नोव्हेंबर) रात्री मुंबईत निधन झाले. वयाच्या ९६ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. राम नारायण यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्याच्या सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या आहेत. त्यांच्या निधनाने संगीत क्षेत्रातील एका महान (पान ७ वर)

# उद्धव ठाकरेंचे जय शाह यांना खुले आव्हान

मुंबई- महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुकीची रणधुमाळी सध्या सुरु आहे. राज्यातील विविध मतदारसंघात दिग्गज नेत्यांच्या सभांचा धडाका सुरु आहे. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची आज नांदेडमधील लोहा-कंधारमध्ये जाहीर सभा पार पडली. या सभेत बोलताना उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. तसेच यावेळी त्यांनी अमित शाह यांना काही सवाल विचारत जय शाह यांना खुलं आव्हान दिलं. जय शाह यांच्यापेक्षा आमच्या गावातील तरुण चांगले क्रिकेट खेळतात. जय शाहांनी गावातील कोणत्याही तरुणाबरोबर क्रिकेट खेळून दाखवावं, मग त्यांना बीसीसीआय नाही तर आणखी कुठल्याही क्रिकेट बोर्डाचं अध्यक्षपद द्यायचं ते द्यावं, असा हल्लाबोल उद्धव ठाकरे यांनी केला.

अमित शाह यांनी मुद्याचं बोलावं. तुम्ही गेल्या १० वर्षात थापांशिवाय काय केलं? पंतप्रधान नरेंद्र मोदी काल धुळे जिल्ह्यात आले होते. चांगली सुरुवात केली, कारण यावेळी जनता त्यांना धूळच चारणार आहे, म्हणून त्यांनी धुळ्यातून सुरुवात केली. मोदींनी आपल्यावर टीका केली, म्हणाले की महाविकास आघाडीच्या गाडीला चाकं आणि ब्रेकही नाही. त्यांनी आमच्याकडे काय आहे आणि काय नाही? हे सोडून द्यावं. आमच्याकडे काय आहे हे जनता ठरवेल. ही जनता हे आमचं सर्व काही आहे. पण मोदींच्या गाडीला भ्रष्टाचाराची चाकं लागलेत ती चाकं एकदा पाहावी. एकीकडे अजित पवार बसलेत. आणखी कोणकोण घेतलेत? ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप आहेत ते सर्व त्यांच्याकडे आहेत, असा हल्लाबोल उद्धव ठाकरे यांनी भाजपावर केला.

प्रफुल पटेल यांना भाजपाबरोबर घेतलं. मग ते तुमच्याकडे आल्यानंतर मिरची (पान ७ वर)

# अमित देशमुख यांची पदयात्रा : उत्स्फूर्त प्रतिसाद



लातूर (प्रतिनीधी) - लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडी काँग्रेसचे अधिकृत उमेदवार अमित विलासराव देशमुख यांनी जनसंपर्क अभियाना अंतर्गत शनिवारी सायंकाळी शहरातील प्रभाग १०, ११ व १२ येथे भव्य प्रचार रॅली काढली या रॅलीला शहरवाशीयांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला. पुरुष महिला, युवक, युवती मोठया प्रमाणात या रॅलीत सहभागी झाले होते. ठिकठिकाणी नागरिकाकडून फटाक्याची आतषबाजी आणि पुष्पवृष्टी करण्यात आली.

सायंकाळी ६ वाजता लातूर शहराच्या ५ नंबर चौकातून लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडी काँग्रेसचे अधिकृत उमेदवार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रचार रॅलीला प्रारंभ झाला. रॅलीच्या प्रारंभीच हजारोंच्या संख्येत तिरंगी झेंडे घेऊन सहभागी झाले होते.

लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडी काँग्रेसचे अधिकृत उमेदवार अमित विलासराव देशमुख यांच्या रॅलीची सुरुवात होताच काँग्रेस पक्षाच्या विजयाच्या घोषणांनी परीसर दुमदूमन गेला. रॅली मार्गावर अनेक ठिकाणी नागरिकांनी रांगोळी काढून मार्ग सुशोभित केला होता., अनेक घरांच्या छतावरुन रॅलीवर पुष्पवृष्टी करण्यात आली, हातात फलक, झेडे घेऊन मोठया संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते नागरीक सहभागी झाले होते. ही भव्य रॅली एकमत चौक (५ नं.चौक) चौधरी नगर - संविधान चौक - महाराष्ट्र हाऊसींग सोसायटीपासुन अग्रोया नगर - पंचशिल चौक - बोधी चौक ते साई मंदिर - गगन विहार चौक - विठाई सुपर मार्केट डावी बाजू मरे यांच्या (पान ७ वर)

# ...तर पहिल्या १०० दिवसांत धिरज भैय्यांच्या सगळया मागण्या पूर्ण करु

लातूर / प्रतिनिधी- महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत आल्यानंतर पहिल्या १०० दिवसांत धिरज भैय्यांच्या सगळ्या मागण्या पूर्ण केल्या जातील, असे आश्वासन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या तथा खासदार सुप्रिया सुळे यांनी दिले. त्याचबरोबर त्यांनी आमदार धिरज देशमुख यांच्या भाषणाचेही कौतुक केले. धिरजभैय्यांना पहिल्यांदाच त्यांच्या मतदारसंघात ऐकले. एक आदर्श लोकप्रतिनिधी म्हणून त्यांनी केलेल्या भाषणाला माझा मानाचा मुजरा, अशा शब्दांत त्यांनी गौरव केला.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेस-महाविकास आघाडीचे उमेदवार आमदार धिरज विलासराव देशमुख यांच्या प्रचारासाठी आयोजित महिला मेळाव्यात त्या बोलत



होत्या. याप्रसंगी व्यासपीठावर सोलापूरच्या खासदार प्रणिती शिंदे, आमदार धिरज विलासराव देशमुख, विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशालीताई देशमुख, रीड लातूरच्या संस्थापक अध्यक्षा दीपशिखा देशमुख, स्वयंप्रभा पाटील, सुनिता आरळीकर, आशा भिसे, शिला पाटील, दैवशाला राजमाने यांच्यासह अनेक महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.

त्या पुढे म्हणाल्या, महाराष्ट्राची संस्कृती पुरोगामी विचाराची आहे. परंतु भाजपने महाराष्ट्रातील पक्ष फोडले, घर फोडले. आमचा पक्ष गेला, चिन्ह गेले, नेते गेले, महामंडळे गेली, सगळे गेले. परंतु जनता आमच्यासोबत राहिली आणि लोकसभेत महाविकास आघाडीचे खासदार जनतेने निवडून दिले. या सरकारने फक्त घरे फोडली नाहीत तर येथील उद्योग इतर राज्यात पळवून नेले. आमच्या बेरोजगारांच्या ताटातला घास हिसकावण्याचे पाप यांनी केले असल्याची जहरी टीका त्यांनी केली.

काँग्रेस पक्षाने देशाला इंदिरा गांधींसारख्या पंतप्रधान दिल्या. राजकारणात महिलांसाठी सोनिया गांधी यांनी ५० टक्के आरक्षण दिले. लातूर काँग्रेसने सुद्धा आरक्षण नसताना महिलांना जिल्हा परिषद अध्यक्ष पद, महानगरपालिकेच्या पहिल्या महापौर, कारखान्याच्या चेअरमन, बँकेत संचालक म्हणून संधी दिल्याबद्दल त्यांचे कौतुक केले.

विलासरावांना अभिमान वाटला असता खासदार सुप्रियाताई (पान ७ वर)

# औशाच्या विकासाची चर्चा राज्यात: शरण पाटील




औसा - आमदार अभिमन्यू पवार यांच्या प्रचार सभेला असलेली लोकांची गर्दी सांगत आहे कि जनतेचा आशिर्वाद त्यांच्या पाठीशी आहे. त्यांनी केलेल्या विकास कामातून आज औशाची चर्चा राज्यात असून विकासाच हहा रथ पुढे घेऊन जाण्यासाठी त्यांना प्रचंड मताधिक्याने निवडून देण्याचे काम जनतेने करायचे आहे असे सांगून राज्यात पुन्हा महायुती चे सरकार येणार आहे. त्यामध्ये विकासाचा अधिकचा वाटा घेण्यासाठी आमदार अभिमन्यू पवार यांचे हात बळकट करावे असे आवाहन शरण बसवराज पाटील यांनी केले आहे.

आमदार अभिमन्यू पवार यांच्या प्रचारार्थ शुक्रवारी तांबाळा येथे आयोजित सभेत ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर आमदार अभिमन्यू पवार, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख दिपकराव, विनोद आर्य, धम्मानंद कांबळे, उध्दव मेकाले, दाऊद पटेल, शिवचरण पाटील, बसवराज पाटील, शरणाप्पा मुळे, संजय सोनकांबळे, शिवलिंग स्वामी, आलू महाराज स्वामी, शिवलिंग स्वामी, सुनील माने, ओम बिराजदार, ज्ञानेश्वर वाकडे, नितीन पाटील, मल्लिकार्जुन दानाई, कल्पना ढविले, संगीता कदम आदीसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने म्हणाले की आमदार अभिमन्यू पवार यांनी या पाच वर्षांत विकासाचे अनेक कामे पूर्ण करीत या विकासाने मागासलेल्या भागाला न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. एका एका गावात चार ते पाच कोटींचा निधी देऊन त्या भागातील मुलभूत सुविधा उपलब्ध करून देत असताना कुठेही जात, पात, धर्म हा भेदभाव (पान ७ वर)

# काँग्रेसच्या शेकडो कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश

लातूर / प्रतिनिधी : भाजपाच्या विकासात्मक धोरणवर विश्वास ठेवून शाहुमहाराज मंडलाध्यक्ष गोपाळ वांगे यांच्या पुढाकारातून सिकंदरपुरचे उपसरपंच पिराजी ईटकर यांच्यासह काँग्रेस पक्षाच्या शेकडो कार्यकर्त्यांनी डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत

भाजपात प्रवेश केला.यामुळे काँग्रेसला खिंडार पडले.

उपसरपंच पिराजी ईटकर व त्यांच्या सहकाऱ्यांच्या प्रवेशामुळे भाजपाची शक्ती वाढून निवडणुकीत अधिकचे बळ मिळाले असल्याचे मत डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी व्यक्त केले.भाजपा हा सर्वांना सोबत घेऊन चालणारा पक्ष आहे.सर्वांचा विकास करणारा पक्ष आहे.या पक्षात राष्ट्र प्रथम ही भावना आहे.याच भावनेतून वरिष्ठ नेते,पदाधिकारी व कार्यकर्ते काम करतात. त्यामुळे देशाच्या विकासाला गती मिळाली आहे.म्हणूनच देशभरात व लातुरमध्येही भाजपाला वाढते



पाठबळ मिळत असल्याचे डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी यावेळी सांगितले.

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने महायुतीच्या अधिकृत उमेदवार डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या प्रचारा निमित्त सिकंदरपुर येथे पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी हा पक्ष प्रवेश कार्यक्रम झाला.

यावेळी शिवसिंह शिसोदिया, शिवसेना शहरप्रमुख दिनेश बोरा, शिवसेना समन्वयक दीपक बडगिरे,चंद्रकांत शिंदे,संदीप जाधव,श्रीनिवास लांडगे, लालासाहेब देशमुख,सुनिल होनराव, बुथप्रमुख अमर पाटील, दत्ता गंभीरे, योगेश गंभीरे, अभिषेक गंभीरे, अभिजीत गंभीरे, पृथ्वीसिंह बायस, माणिकराव आलुरे आदी कार्यकर्ते,पदाधिकारी व सिकंदपूर ग्रामस्थ मोठ्या संख्येने पदयात्रेत सहभागी झाले होते.

## ना पंत ना राहुल, या पठ्ठ्यासाठी अंबानी तिजोरी उघडणार, लिलावात पाडणार पैशांचा पाऊस




मुंबई-आयपीएल २०२५ ची रिटेन्शन लिस्ट बाहेर आल्यानंतर अनेक स्टार खेळाडूंना त्यांच्या संघांनी सोडले आहे. डीसीने ऋषभ पंतला सोडले, केकेआरने श्रेयस अय्यरला सोडले, एलएसजीने केएल राहुलला सोडले. राजस्थान रॉयल्सने युझवेंद्र चहलला सोडवून सर्वांना आश्चर्यचकित केले. आता हे सर्व खेळाडू आयपीएल २०२५ च्या मेगा लिलावाचा भाग असतील.

आयपीएल २०२५ चा मेगा लिलाव यावेळी सौदी अरेबियातील जेद्दाह शहरात होणार आहे. ज्यासाठी २४ आणि २५ नोव्हेंबर ठेवण्यात आले आहेत. स्टार खेळाडूंना खरेदी करण्यासाठी सर्व फ्रँचायझींमध्ये चांगली स्पर्धा पाहिला मिळेल. दरम्यान, पंत, राहुल नाही तर मेगा लिलावात मुंबई इंडियन्स युझवेंद्र चहलवर खर्च करू शकते अशी बातमी येत आहे.


युजवेंद्र चहल हा टी-२० क्रिकेटचा महान गोलंदाज मानला जातो. टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्येही चहलने भारतासाठी सर्वाधिक विकेट घेतल्या आहेत. याशिवाय राजस्थान रॉयल्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूसाठी चहलची कामगिरी उत्कृष्ट आहे. मात्र यावेळी राजस्थान रॉयल्सने या गोलंदाजाला सोडले आहे.

यानंतर मुंबई इंडियन्स लिलावात चहरवर पैशांचा पाऊस पाडताना दिसू शकते. चहलला टी-२० क्रिकेटचा खूप अनुभव आहे आणि तो सतत आयपीएलही खेळत आहे. याशिवाय, आपला फिरकी विभाग आणखी मजबूत करण्यासाठी, मुंबई इंडियन्स या खेळाडूवर मोठा सट्टा खेळू शकतो.

चहलची टी-२० कारकीर्द

युझवेंद्र चहलने टीम इंडियासाठी आतापर्यंत ८० टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत. ज्यामध्ये त्याने शानदार गोलंदाजी करत ९६ विकेट्स घेतल्या. या काळात चहलची सर्वोत्तम गोलंदाजी म्हणजे ४२ धावांत ६ विकेट्स घेणे. मात्र, चहलला बऱ्याच दिवसांपासून टीम इंडियात संधी मिळत नाहीये. याशिवाय चहलने आतापर्यंत आयपीएलमध्ये १६० सामने खेळले आहेत. ज्यामध्ये त्याने वेगवेगळ्या संघांकडून खेळताना २०५ विकेट घेतल्या आहेत.

## डूबते को तिनके का सहारा.... खराब फिटनेसमुळे बाहेर गेलेल्या पृथ्वी शॉची अचानक संघात निवड



मुंबई-भारताचा स्टार फलंदाज शॉ सध्या खराब फॉर्मशी झगडत आहे. अलीकडेच खराब फिटनेसमुळे त्याला मुंबईने रणजी ट्रॉफीच्या संघातून बाहेर केले होते. मात्र, आता शॉचे मुंबई संघात पुनरागमन झाले आहे. आगामी सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीसाठी त्याची निवड झाली आहे. निवड समितीने मेगा इव्हेंटसाठी २८ संभाव्य नावे जाहीर केली आहेत. पृथ्वी शॉ व्यतिरिक्त श्रेयस अय्यर आणि अजिंक्य रहाणे हे देखील या संघात आहेत. शॉला आयपीएल २०२५ साठी दिल्ली कॅपिटल्सने कायम ठेवले नाही, तर श्रेयस अय्यरला केकेआर आणि रहाणेला सीएसकेने सोडले आहे. आयपीएलच्या लिलावात या खेळाडूंचा लिलाव होणार आहे.

शॉने या मोसमात रणजी ट्रॉफीमध्ये मुंबईकडून दोन सामने खेळले. पण या खेळाडूची कामगिरी दोन्ही सामन्यात खराब राहिली. पहिल्या सामन्यात त्याने ७ आणि १२ धावा केल्या, तर महाराष्ट्राविरुद्ध त्याने १ आणि ३९ धावांची खेळी केली. मात्र, इराणी ट्रॉफीमध्ये त्याने ४ आणि ७६ धावा केल्या. भारतासाठी शॉने ५ कसोटी सामन्यात ४२.३७ च्या सरासरीने ३३९ धावा केल्या आहेत. तर या खेळाडूने ६ एकदिवसीय सामन्यांमध्ये १८९ धावा केल्या आहेत. २०२० मध्ये त्याने भारतासाठी शेवटचा कसोटी सामना खेळला. यानंतर त्याला कसोटी संघात संधी मिळाली नाही.आयपीएल २०२४ मध्येही शॉ मोठी कामगिरी करण्यापासून फेल ठरला. त्याला ८ सामने खेळण्याची संधी मिळाली. या कालावधीत सलामीच्या फलंदाजाने २४.७५ च्या सरासरीने १९८ धावा केल्या होत्या. गेल्या हंगामात शॉला केवळ १ अर्धशतक झळकावता आले होते. खराब कामगिरीमुळे दिल्ली कॅपिटल्सने त्याला आगामी हंगामासाठी सोडले.सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीसाठी मुंबई संघ-पृथ्वी शॉ, आयुष म्हात्रे, अंगकृष्ण रघुवंशी, जय बिस्ता, श्रीराज घरत, अजिंक्य रहाणे, श्रेयस अय्यर, सुर्याश शेडगे, इशान मूलचंदानी, सिद्धेश लाड, हार्दिक तामोरे (विकेटकीपर), आकाश आनंद (विकेटकीपर), साईराज पाटील, आकाश पारकर, शाहरुख पारकर, हिमांशू सिंग, सागर छाब्रिया, शार्दुल ठाकूर, मोहित अवस्थी, सिल्वेस्टर डिसोझा, रॉयस्टन डायस, योगेश पाटील, हर्ष तन्ना, इरफान उमैर, विनायक भोईर, कृतिक हनगावडी, शशांक अत्तर्डे, जुनेद खान.

## तेरा ध्यान किधर है, तेरा हीरो, संजू सॅमसनच्या शतकी खेळीनंतर पत्नी चारुलताच्या इन्स्टा स्टोरीने वेधले लक्ष

मुंबई-भारताने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या चार सामन्यांच्या टी-२० मालिकेला दणदणीत विजयाने सुरुवात केली. या मालिकेतील पहिल्या सामन्यात भारताचा यष्टीरक्षक फलंदाज संजू सॅमसन हिरो ठरला. भारतीय संघाने नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करताना गडी गमावून २०२ धावा केल्या. प्रत्युत्तरात यजमान संघ अवघ्या १४१ धावांत गारद झाला. संजू सॅमसनला त्याच्या शानदार शतकासाठी सामनावीर म्हणून गौरवण्यात आले. संजूच्या या खेळीनंतर त्याची पत्नी चारुलता रमेश हिने इन्स्टाग्रामवर एक खास स्टोरी शेअर केली आहे.

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या चार सामन्यांच्या टी-२० मालिकेतील पहिल्या सामन्यात संजू सॅमसनच्या बॅटमधून दमदार शतक झळकावले. त्याने ५० चेंडूत १०७ धावांची शानदार खेळी करत संघाच्या विजयाचा पाया रचला. या खेळीत संजूने एकूण १० षटकार आणि ७ चौकार लगावले. अवघ्या २७ चेंडूत अर्धशतक पूर्ण केल्यानंतर त्याने ४७ चेंडूत आपले दुसरे टी-२० शतक पूर्ण केले. या शानदार शतकानंतर पत्नी चारुलताने एक खास इंस्टाग्राम स्टोरी पोस्ट केली आणि संपूर्ण जगाला सांगितले की तिचा हिरो कोण आहे.

संजू सॅमसनच्या पत्नीची इन्स्टा स्टोरी व्हायरल –

संजू सॅमसनने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध शानदार शतक झळकावले. यानंतर त्याची पत्नी चारुलता रमेश हिने संजूच्या शतकी खेळीसाठी एक खास इन्स्टाग्राम स्टोरी पोस्ट केली आहे. चारुलताने संजूचा फोटो शेअर केला आणि त्याचे सुपरहिरो म्हणून वर्णन करताना कॅप्शनमध्ये लिहिले, 'मला कायम आवडणारा हिरो'. या फोटोसह चारुलताने बॅकग्राऊंडसाठी निवडलेले गाणेही जबरदस्त होते. तिने बॅकग्राऊंडला, 'तेरा ध्यान किधर है, तेरा हीरो इधर है' हे गाणे लावले आहे. संजू सॅमसनने दक्षिण आफ्रिकन गोलंदाजांची धुलाई करत सलग दुसरे टी-२० शतक झळकावले. या शतकासह अनेक विक्रमाला गवसणी घातली.संजू सॅमसनच्या टी-२० क्रिकेटमध्ये ७००० धावा पूर्ण –संजू सॅमसनने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या टी-२० सामन्यात केवळ १०७ धावांची इनिंग खेळली नाही, तर टी-२० क्रिकेटमध्ये ७००० धावाही पूर्ण केल्या. संजूने त्याच्या २६९ व्या टी-२० डावात हा आकडा गाठला आहे. यासह तो जलद ७००० धावा पूर्ण करणारा भारताचा संयुक्त सातवा खेळाडू ठरला आहे. संजूने या बाबतीत टीम इंडियाचा माजी कर्णधार आणि अनुभवी यष्टीरक्षक फलंदाज एमएस धोनी आणि दिनेश कार्तिक यांना मागे टाकले आहे. धोनीने ३०५ डावात ७००० टी-२० धावा पूर्ण केल्या होत्या.

## ऑस्ट्रेलियाकडून भारताला व्हाईटवॉश, बॉर्डर-गावसकर ट्रॉफीआधी मोठा धक्का

मुंबई-भारतीय संघाला कुठेतरी आता ग्रहण लागले आहे, असे दिसत आहे. अलीकडेच न्यूझीलंडने ३ सामन्यांच्या कसोटी मालिकेत टीम इंडियाचा ३-० ने पराभव केला होता. या पराभवामुळे भारतीय संघाला वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या गुणतालिकेत मोठा फटका बसला. टीम इंडियाला गुणतालिकेत अव्वल स्थान गमवावे लागले. न्यूझीलंडविरुद्धच्या कसोटी मालिकेनंतर टीम इंडियाला आता २२ नोव्हेंबरपासून पर्थमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध बॉर्डर-गावसकर ट्रॉफी खेळायची आहे. या ट्रॉफी अंतर्गत ५ सामन्यांची कसोटी मालिका खेळवली जाईल. या मालिकेला अजून काही टाईम असला तरी भारतीय अ संघाला ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर दारुण पराभवाला सामोरे जावे लागले आहे.खरंतर, मेलबर्न क्रिकेट ग्राउंड म्हणजेच एमसीजी येथे खेळल्या गेलेल्या दुसऱ्या अनधिकृत कसोटी सामन्यात यजमान ऑस्ट्रेलिया अ संघाने भारत अ संघाचा ६ गडी राखून पराभव केला. भारताचा पहिला डाव १६१ धावांवर आटोपला. ध्रुव जुरेल वगळता एकही फलंदाज चालला नाही. जुरेलने ८० धावांची खेळी खेळली. यानंतर ऑस्ट्रेलियाच्या अ संघाने २२३ धावा केल्या. दुसऱ्या डावात भारतीय संघाने थोडी चांगली कामगिरी केली पण ती अपुरी ठरली. यावेळीही ध्रुव जुरेलने सर्वाधिक ६८ धावा केल्या. भारताने दुसऱ्या डावात २२९ धावा करत ऑस्ट्रेलियाला विजयासाठी १६८ धावांचे लक्ष्य दिले होते. ऑस्ट्रेलियाचा दुसरा डाव सुरुवातीला गडगडला पण नंतर सॅम कोन्स्टासच्या नाबाद ७३ आणि ब्यू वेबस्टरच्या नाबाद ४६ धावांच्या जोरावर सहा विकेट्स शिल्लक राहून लक्ष्य गाठले.

अशा प्रकारे ऑस्ट्रेलिया अ संघाने २ अनधिकृत सामन्यांच्या कसोटी मालिकेत भारताचा २-० असा व्हाईटवॉश केला. याआधी ऑस्ट्रेलियाने पहिल्या अनधिकृत कसोटी सामन्यात भारताचा ७ विकेट्सने पराभव केला होता. बॉर्डर-गावसकर ट्रॉफीपूर्वी भारत अ संघाच्या या पराभवामुळे टीम इंडियाची नक्कीच डोकेदुखी वाढली आहे.

## सरफराज-राहुलसाठी धोका? ऑस्ट्रेलियात एकाच सामन्यात २ अर्धशतके झळकावणारा हा खेळाडू घेणार जागा हिसकावून

मुंबई-टीम इंडियाचा यष्टिरक्षक-फलंदाज ध्रुव जुरेलने बॉर्डर गावस्कर ट्रॉफीपूर्वी शानदार प्रदर्शन करून केएल राहुल आणि सरफराज खान यांना टेंशनमध्ये टाकले आहे. ध्रुव जुरेलला २२ नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या ५ सामन्यांच्या कसोटी मालिकेपूर्वी ऑस्ट्रेलिया अ विरुद्ध खेळण्यासाठी मेलबर्नला पाठवण्यात आले. मिळालेल्या संधीचा फायदा घेत त्याने या अनधिकृत कसोटीच्या दोन्ही डावांत अर्धशतके झळकावून आपला दावा पक्का केला. जुरेलनेही सहाव्या क्रमांकावर फलंदाजी करताना ही दोन्ही अर्धशतके केली. राहुल आणि सरफराजही याच क्रमांकावर फलंदाजी करतात.मेलबर्न येथे झालेल्या ऑस्ट्रेलिया अ विरुद्धच्या दुसऱ्या सामन्यात भारत अ संघाला ६ विकेटने पराभव स्वीकारावा लागला. पण या सामन्यात ध्रुव जुरेलची खेळी ही भारतीय संघासाठी सर्वात सकारात्मक बाजू होती. त्याची खेळी पाहून मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर आणि रोहित शर्मा यांचा तणाव थोडा कमी होईल. कारण जुरेल ऑस्ट्रेलिया अ संघाविरुद्ध दोन्ही डावांत एकटाच लढत राहिला. त्याच्यामुळेच संघाची इज्जत वाचली.पहिल्या डावात भारत अ संघाने केवळ ११ धावांवर ४ विकेट गमावल्या होत्या. यानंतर त्याने १८६ चेंडूत ८० धावांची धडाकेबाज खेळी करत भारतीय संघाला १५० च्या पुढे नेले. दुसऱ्या डावात भारतीय संघाने ४४ धावांवर ४ विकेट गमावल्या. यानंतर त्याने १२२ चेंडूंचा सामना करत ६८ धावा केल्या. त्याच्या खेळीच्या जोरावर संघाला पुन्हा १५० पर्यत मजल मारता आली आणि शेवटी गोलंदाजांनी २२९ पर्यत सन्मानजनक धावसंख्या गाठली. याआधीही त्याने इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत दडपणाखाली सामना जिंकला होता. ध्रुव जुरेलच्या दोन्ही डावांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्याने दडपण सहन करत संघाला संकटातून बाहेर काढले. एका टोकाकडून विकेट पडत राहिल्या पण दुसऱ्या टोकाला तो ठाम उभा राहिला. संघाचे प्रमुख फलंदाज बाद झाल्यानंतर त्याने गोलंदाजांसह डाव पुढे नेला. संपूर्ण सामन्यात भारत अ संघाने एकूण ८१० चेंडूंचा सामना केला, त्यापैकी एकट्या जुरेलने ३०८ चेंडू खेळले.

जुरेलला असा एकटा लढताना पाहून समालोचकही त्याचे कौतुक करण्यापासून स्वत:ला रोखू शकले नाहीत आणि त्याची तुलना विराट कोहलीशी केली. ऑस्ट्रेलियामध्ये सतत विकेट्स गमावून डाव फसण्याची भीती असते. अशा स्थितीत सहाव्या क्रमांकावर भारतीय संघाला अशा फलंदाजाची गरज आहे, जो दबाव सहन करू शकेल आणि खालच्या क्रमाने फलंदाजी करण्यात पटाईत असेल.

## अर्शद नदीमला पराभूत करण्यासाठी नीरज चोप्राचा मोठा निर्णय, विश्वविक्रमधारकाला बनवला नवा प्रशिक्षक




दिल्ली-भारताचा दुहेरी ऑलिम्पिक पदक विजेता आणि भालाफेकपटू नीरज चोप्राने मोठा निर्णय घेतला आहे. वास्तविक, नीरज चोप्रा आत्तापर्यंत जर्मन प्रशिक्षक क्लॉस बारटोनिट्झ याच्यासोबत काम करत होता. पण क्लॉस बारटोनिट्झने अलीकडेच कोचिंगमधून निवृत्ती घेतली आहे. अशा परिस्थितीत आता नीरज चोप्राने आपल्या नवीन प्रशिक्षकाच्या नावाची घोषणा केली आहे. त्याने ३ वेळा ऑलिम्पिक चॅम्पियनला आपला नवा प्रशिक्षक बनवला आहे. विशेष म्हणजे सर्वात लांब भालाफेकचा विश्वविक्रमही या दिग्गजाच्या नावावर आहे, या दिग्गजाचा अनुभव नीरज चोप्रासाठी खूप उपयोगी ठरणार आहे.

भालाफेकपटू नीरज चोप्राने अनुभवी जॉन झेलेझनी याची नवीन प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. जॅन झेलेझनी हा तीन वेळा ऑलिम्पिक आणि जागतिक विजेता आणि सध्याचा विश्वविक्रम धारक आहेत. तो दीर्घकाळ चोप्राचा आयडॉलही आहे. १९९२, १९९६ आणि २००० ऑलिम्पिक खेळांमध्ये सुवर्णपदक विजेत्या जॅन झेलेझनीकडे आतापर्यंतच्या सर्वोत्तम दहा थ्रोपैकी पाच आहेत. १९९२, १९९६ आणि २००० ऑलिम्पिक खेळांमध्ये सुवर्णपदक विजेत्या झेलेझनीकडे आतापर्यंतच्या सर्वोत्तम दहा थ्रोपैकी पाच आहेत. त्याने ४ वेळा विश्वविक्रम मोडण्याचा पराक्रमही केला होता. १९९६ मध्ये त्याने जर्मनीत ९८.४८ मीटर फेक करून विश्वविक्रम केला. हा विक्रम अद्याप कोणीही मोडू शकलेले नाही.

नीरज चोप्राने टोकियो २०२० ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकले. त्यानंतर जाकुब वडलेजने रौप्यपदक तर विटेझस्लाव्ह वेसेलीने कांस्यपदक जिंकले. त्यावेळी या दोन्ही खेळाडूंचे प्रशिक्षक जॉन झेलेझनी होता. जॉन झेलेझनी याने दोन वेळा ऑलिम्पिक चॅम्पियन आणि तीन वेळा वर्ल्ड चॅम्पियन बार्बोरा स्पोटाकोव्हाचे प्रशिक्षक म्हणून देखील काम केले आहे.

जॉन झेलेझनी याच्या मार्गदर्शनाखाली, नीरज आपले तांत्रिक प्रभुत्व अधिक सखोल करण्यास आणि त्या यशांवर उभारण्यास उत्सुक आहे. नीरज चोप्रा म्हणाला, मोठा झाल्यावर मी जॉन झेलेझनीच्या तंत्राची आणि अचूकतेची प्रशंसा केली आणि त्याचे व्हिडिओ पाहण्यात बराच वेळ घालवला. तो इतक्या वर्षापासून खेळात सर्वोत्कृष्ट होता आणि मला विश्वास आहे की त्याच्यासोबत काम करणे अमूल्य असेल, कारण आमच्या फेकण्याच्या शैली सारख्याच आहेत आणि त्याचे ज्ञान अतुलनीय आहे. माझ्या कारकिर्दीत मी पुढच्या स्तरावर जात असताना जॉन माझ्यासोबत असणे हा एक सन्मान आहे आणि मी सुरुवात करण्यासाठी प्रतीक्षा करू शकत नाही.

## या दिवशी होऊ शकतो ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर रवाना, पर्थ कसोटीत खेळणार भारतीय कर्णधार?

मुंबई-२२ नोव्हेंबरपासून भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात बॉर्डर-गावस्कर ट्रॉफी स्पर्धेला सुरुवात होत आहे. जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या दृष्टिकोनातून ही मालिका खूप महत्त्वाची असणार आहे. त्यामुळे दोन्ही संघ पाच सामन्यांच्या या मालिकेच्या तयारीत व्यस्त आहेत. दरम्यान, भारतीय कर्णधार रोहित शर्माच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर सस्पेंस होता. मात्र, आता त्याच्याबाबत एक मोठी आनंदाची बातमी समोर आली आहे. स्पोर्ट्सच्या वृत्तानुसार, तो भारतीय संघासोबत ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी रवाना होऊ शकतो.

बॉर्डर गावस्कर ट्रॉफी स्पर्धेसाठी भारतीय संघ दोन बॅचमध्ये ऑस्ट्रेलियाला जाणार आहे. टीम इंडियाची पहिली बॅच १० नोव्हेंबरला तर दुसरी बॅच ११ नोव्हेंबरला टेक ऑफ करू शकते. अहवालानुसार, लॉजिस्टिकच्या समस्येमुळे संपूर्ण संघ ऑस्ट्रेलियाला एकत्र पाठवणे शक्य झाले नाही. त्यामुळे भारतीय क्रिकेट बोर्डाने हा निर्णय घेतला आहे. दरम्यान, कर्णधार रोहित शर्मा १० नोव्हेंबरला पहिल्या बॅचसह ऑस्ट्रेलियाला रवाना होऊ शकतो.रोहितने निवडकर्त्यांना सांगितले आहे की, तो पहिल्या बॅचसह ऑस्ट्रेलियाला जाण्यासाठी उपलब्ध असेल. मात्र, पर्थ येथे २२ नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या पहिल्या सामन्यात त्याच्या खेळण्याबाबत अद्यापही सस्पेंस कायम आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, तो दुसऱ्यांदा पिता बनणार आहे. त्याची पत्नी नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात मुलाला जन्म देऊ शकते. त्यामुळे पहिल्या कसोटीत त्याचे खेळणे अद्याप निश्चित झालेले नाही. हा प्रश्न तुमच्या मनात निर्माण होऊ शकतो की रोहित शर्माचा पर्थ कसोटीतील सहभाग अद्याप ठरलेला नाही, मग त्याला ऑस्ट्रेलियाला का जायचे आहे. वास्तविक, सूत्रांवर विश्वास ठेवला तर, रोहितला काही दिवस ऑस्ट्रेलियात सराव करून तेथील परिस्थितीशी जुळवून घ्यायचे आहे, जेणेकरून आगामी सामन्यांसाठी तो तयार होऊ शकेल. त्यामुळे त्याने पहिल्या बॅचसह ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जाण्याचा निर्णय घेतला आहे. आम्ही तुम्हाला सांगतो की पहिल्या आणि दुसऱ्या टेस्टमध्ये ९ दिवसांचे अंतर आहे. या दृष्टीकोनातून पाहिल्यास मुलाच्या जन्माला उशीर झाला, तर तो पहिला सामना खेळतानाही दिसू शकतो. या मध्यंतरादरम्यान तो भारतात परत येऊ शकतो.

## बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीपूर्वी भारताची उडाली दाणादाण, दुसऱ्या सराव सामन्यातही हार

मुंबई-भारतीय संघाचा फॉर्म सध्या चांगला नाही. अलीकडेच न्यूझीलंडने तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेत भारताचा ३-० ने पराभव केला होता. या मालिकेनंतर भारतीय संघ बॉर्डर गावसकर ट्रॉफी खेळण्यासाठी ऑस्ट्रेलियाला रवाना होणार आहे. या मालिकेपूर्वी भारतीय संघाला मोठा धक्का बसला आहे. भारतीय अ संघाला ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर सलग दुसऱ्या सामन्यात दारुण पराभवाला सामोरे जावे लागले आहे. भारत अ संघाने ध्रुव जुरेलच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर दिलेल्या १६८ धावांचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलिया अ संघाने ६ विकेट्सनी दणदणीत विजय मिळवला. त्याचबरोबर दोन सामन्यांच्या मालिकेत भारताला व्हाईटवॉश केले.भारताचा सलग दुसरा मालिकेत व्हाईटवॉश –वास्तविक, मेलबर्न क्रिकेट ग्राउंड म्हणजेच एमसीजी येथे खेळल्या गेलेल्या दुसऱ्या अनधिकृत कसोटी सामन्यात यजमान ऑस्ट्रेलिया अ संघाने भारत अ संघाचा ६ गडी राखून पराभव केला. भारताचा पहिला डाव १६१ धावांवर आटोपला. या सामन्यात ध्रुव जुरेल वगळता एकही फलंदाजाला आपली छाप सोडता आली नाही. जुरेलने ८० धावांची खेळी खेळली. यानंतर ऑस्ट्रेलियाच्या अ संघाने २२३ धावा केल्या. दुसऱ्या डावात भारतीय संघाने थोडी चांगली कामगिरी केली पण ती अपुरी ठरली.यावेळीही ध्रुव जुरेलने सर्वाधिक ६८ धावा केल्या. भारताने दुसऱ्या डावात २२९ धावा करत ऑस्ट्रेलियाला विजयासाठी १६८ धावांचे लक्ष्य दिले होते. ऑस्ट्रेलियाचा दुसरा डाव सुरुवातीला गडगडला पण नंतर सॅम कोन्स्टासच्या नाबाद ७३ आणि ब्यू वेबस्टरच्या नाबाद ४६ धावांच्या जोरावर सहा विकेट्स राखून लक्ष्य गाठले. अशा प्रकारे ऑस्ट्रेलिया अ संघाने दोन अनधिकृत सामन्यांच्या कसोटी मालिकेत भारताचा २-० असा व्हाईटवॉश केला.

## बीसीसीआय करणार गंभीरची हकालपट्टी? ६ तासांची बैठक अन् गौतम-रोहितचा वाद, चीफ सिलेक्टर तडकाफडकी निर्णय घेणार!

मुंबई-न्यूझीलंडविरुद्ध झालेल्या टेस्ट क्रिकेट सीरिजमध्ये नामुष्कीजनक पराभव पत्करल्यानंतर आता टीम इंडिया ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी रवाना होणार आहे. तिथे दोन्ही टीम्स बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीसाठी एकमेकांशी लढणार आहेत. न्यूझीलंडबरोबरच्या टेस्ट सीरिजमधल्या पराभवानंतर गौतम गंभीरच्या प्रशिक्षक म्हणून होत असलेल्या कामगिरीवर टीकेची झोड उठत आहे. तशातच एका नव्या चर्चेला तोंड फुटलं आहे. ऑस्ट्रेलिया दौऱ्यात टीमची कामगिरी चांगली झाली नाही तर टेस्ट आणि व्हाइट बॉल क्रिकेटसाठी स्वतंत्र प्रशिक्षक नेमला जाण्याची शक्यता आहे.

न्यूझीलंडविरुद्धच्या टेस्ट सीरिजमधला पराभव क्रिकेट रसिकांच्या आणि टीम इंडियाच्याही चांगलाच जिव्हारी लागला आहे. तब्बल १२ वर्षानंतर टीम इंडियाला होम ग्राउंडवर टेस्ट सीरिजमध्ये असा पराभव स्वीकारण्याची वेळ आली आहे. त्यामुळेच ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी रवाना होतानाच टीम इंडियाचं मनोबलही काहीसं ढासळलेलं आहे. प्रशिक्षकपदाची सूत्रं स्वीकारल्यानंतर गौतम गंभीरसाठीही हा दौरा ही पहिलीच मोठी असाइनमेंट ठरणार आहे. त्यामुळेही टीमच्या कामगिरीकडे क्रिकेट जगताचं लक्ष लागलेलं आहे. या दौऱ्यात टीमची कामगिरी चांगली झाली नाही तर बीसीसीआय रेड आणि व्हाइट बॉल क्रिकेटसाठी दोन स्वतंत्र कोच नेमण्याचा विचार करील अशी शक्यता आहे.

नुकत्याच झालेल्या टी २० वर्ल्ड कपनंतर टीम इंडियाच्या कोच पदाची जबाबदारी गौतम गंभीरकडे सोपवण्यात आली आहे. त्याने ही जबाबदारी स्वीकारल्यानंतर टीमच्या कामगिरीची चित्र अत्यंत निराशाजनक आहे. असं असलं तरी एवढ्या कमी वेळात त्याला काढून टाकलं जाणार नाही.

त्याऐवजी रेड आणि व्हाइट बॉल फॉरमॅटसाठी स्वतंत्र कोच नेमण्याचा पर्याय पुढे आला आहे. नॅशनल क्रिकेट ॲकॅडमीचा प्रमुख म्हणून काम करत असलेला व्हीव्हीएस लक्ष्मण सध्या टी २० सीरिजसाठी कोच म्हणून दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यावर आहे. टीम इंडियाच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यानंतर रेड बॉल प्रकारातली जबाबदारी लक्ष्मणकडे सोपवली जाईल आणि व्हाइट बॉल प्रकारातील जबाबदारी गंभीरकडे राहील अशी शक्यता आहे.

टीम इंडियासाठी असे वेगवेगळे कोच यापूर्वी कधीही नेमण्यात आले नव्हते; मात्र काळाची गरज ओळखून तसा निर्णय घेण्याचा बीसीसीआयचा विचार असल्याचं दिसतं. न्यूझीलंडविरुद्ध दारुण पराभवानंतर बीसीसीआय सेक्रेटरी जय शाह, अध्यक्ष रॉजर बिन्नी, कॅप्टन रोहित शर्मा, चीफ सिलेक्टर अजित आगरकर आणि कोच गौतम गंभीर यांच्यात आढावा बैठक झाली. सहा तास चाललेल्या या बैठकीमध्ये गंभीरची कोचिंग स्टाइल आणि इतर अनेक विषयांवर चर्चा झाली. ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठीच्या टीम निवडीबाबत गंभीर आणि इंडियन क्रिकेट थिंक टँकमधले ज्येष्ठ सदस्य यांच्यात मतभेद असल्याचे समोर आले आहे. २२ नोव्हेंबरला पर्थमध्ये ही टेस्ट सीरिज सुरू होईल.

## मुंबईने ओडिशाचा उडवला धुव्वा! एक डाव आणि १०३ धावांनी चारली धूळ

मुंबई-गतविजेत्या मुंबईने शनिवारी रणजी करंडक स्पर्धेतील एलिट गटाच्या सामन्यात ओडिशाचा एक डाव आणि १०३ धावांनी पराभव केला. या विजयात मुंबईसाठी फिरकीपटू शम्स मुलाणी (५७१) आणि हिमांशू सिंग (४७७) यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. या सामन्यातील शानदार कामगिरीसाठी शम्स मुलाणीला सामनावीर म्हणून गौरवण्यात आले. त्याने या सामन्यात एकूण ११ विकेट्स घेतल्या.या सामन्यात यजमान संघाने ४ बाद ६०२ धावांवर डाव घोषित केला होता. मुंबईचा कर्णधार अजिंक्य रहाणेने फॉलोऑन दिल्यानंतर ओडिशाचा संघ दुसऱ्या डावात २१४ धावांत गारद झाला. पहिल्या डावात त्याला केवळ २८५ धावा करता आल्या. शेवटच्या दिवशी ५ बाद १२६ धावांवर खेळत असताना मुलानीने अर्धशतक पूर्ण केल्यानंतर लगेचच यष्टीरक्षक फलंदाज आशीर्वाद स्वेन (५१) याला बाद केल्याने ओडिशाच्या आशा मावळल्या.मुंबई संघाचा डाव –या सामन्यात ओडिशा संघाने नाणेफेक जिंकून मुंबईला फलंदाजी करण्यास आमंत्रित केले होते. या संधीचा मुंबईने पुरेपूर फायदा घेतला. मुंबईने १९ धावांवर पहिली विकेट गमावली. आयुष म्हात्रे १८ धावा करून बाद झाला. यानंतर मुंबईने १५४ धावांवर सलग २ विकेट्स गमावल्या. अंगकृष्ण रघुवंशी ९२ आणि अजिंक्य रहाणे शून्यावर बाद झाले. यानंतर श्रेयस अय्यर आणि सिद्धेश लाड यांनी चौथ्या विकेटसाठी विक्रमी भागीदारी केली. दोघांनी ३५४ धावांची भागीदारी केली.ही जोडी हर्षित राठोडने तोडली. श्रेयस अय्यरने २२८ चेंडूत २४ चौकार आणि ६ षटकारांच्या मदतीने २३३ धावा केल्या. सिद्धेश लाड आणि सूर्यांश शेंडगे या दोघांनी पाचव्या विकेटसाठी ९४ धावांची नाबाद भागीदारी केली.

यशवंत धाराशिव जिल्हा

रविवार दि. १० नोव्हेंबर २०२४



कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com

# माझ्यासाठी मतदार संघ मंदिर तर जनता दैवत - आ. पाटील



### महागाईवरून केंद्र सरकारवर टीका

महागाईच्या प्रश्नावर बोलताना आ. पाटील यांनी केंद्र सरकारवर कठोर शब्दांत टीका केली. त्यांनी सांगितले, महिलांना लाडकी बहिण म्हणून काही आर्थिक मदत केली, मात्र त्याचबरोबर महागाई वाढवून ही मदत दुसऱ्या मार्गाने परत काढून घेतली गेली आहे. तेल आणि किचन बजेटची वाढ झालेली किंमत सर्वसामान्य महिलांना परवडणारी नाही, हे महिलांच्याच तोंडून ऐकायला मिळत आहे. ते पुढे म्हणाले की, महागाईमुळे सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक ओढाताण सुरू आहे, आणि सरकारने याबाबत काहीही पाऊल उचललेले नाही. वाढत्या महागाईचा परिणाम सर्वसामान्य घरांवर होत असल्याने या निवडणुकीत मतदारांनी योग्य विचार करून मतदान करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

### मांजरा आणि तेरणा नद्यांवरील बॅरेजेस प्रकल्पावर भर

कळंब तालुक्यातील देवळाली, हासेगाव, नागुलगाव, एकुरगा, भाटशिरपूरा गावांमध्ये झालेल्या सभांमध्ये बोलताना आ. पाटील यांनी स्थानिक जलसंपदांच्या प्रश्नांवर विचार मांडले. त्यांनी मांजरा आणि तेरणा या नद्यांवरील ३८ कोल्हापुरी बंधाऱ्यांचे बॅरेजेसमध्ये रूपांतर करण्याचे आश्वासन दिले. या बॅरेजेसद्वारे पाण्याची साठवणूक करून शेतकऱ्यांना सिंचनाच्या पाण्याची व्यवस्था करण्याचा त्यांचा मानस आहे. ते म्हणाले, लातूर जिल्ह्याप्रमाणे धाराशिवमध्येही बॅरेजेस उभारून पाणी साठवण्याचा आमचा विचार आहे. या प्रकल्पासाठी आमच्या सत्ताकाळात सर्वेक्षण आणि अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. परंतु सरकार बदलल्यामुळे या प्रकल्पाची अंमलबजावणी रखडली. आता आम्ही या प्रकल्पाला पुनरुज्जीवित करून सिंचनाचा अनुशेष दूर करू.

### शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी प्रयत्नशील

शेतकऱ्यांच्या विकासासंबंधित मुद्द्यावर बोलताना आ. पाटील म्हणाले, शेतकरी समृद्ध व्हावा यासाठी आमचं सरकार सातत्याने काम करत राहील. सिंचनाच्या सुविधांचा विस्तार करून आणि स्थानिक पाणलोट क्षेत्राचा विकास करून आम्ही शेतकऱ्यांची समृद्धी साध्य करण्यासाठी प्रयत्नशील आहोत.

धाराशिव - कळंब मतदारसंघातील जनतेसाठी विकासाची वचनबद्धता व सत्ताधारी पक्षावर केलेली तीव्र टीका या दौऱ्यात आ. पाटील यांनी जाहीर सभांमध्ये स्पष्टपणे मांडली आहे.

### मतदारसंघ हेच मंदिर, जनता माझं दैवत'

जनसंवाद यात्रा करताना मतदारांशी भावनिक संवाद साधत आ. पाटील म्हणाले की, मतदारसंघ हे माझे मंदिर आहे तर जनता हेच माझे दैवत आहे. त्यांच्या सेवेसाठी माझा संपूर्ण वेळ समर्पित आहे, आणि भविष्यातही तो असाच असेल. या निवडणुकीत त्यांना जनतेच्या पाठिंब्याची अपेक्षा आहे आणि पुढील काळात मतदारसंघाच्या विकासासाठी ते आपला सर्व शक्तीनिशी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

धाराशिव दि.९ (प्रतिनिधी) - माझ्यासाठी मतदार संघ हेच मंदिर आहे. तर या मतदार संघातील जनता माझे दैवत म्हणूनच मी काम करतो. यापुढेही अशा प्रकारे मला सेवा करण्याची संधी मिळेल याची मला खात्री आहे असा विश्वास आमदार कैलास पाटील यांनी व्यक्त केला. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर धाराशिव - कळंब मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार आ. पाटील यांनी मतदारांशी थेट संवाद साधण्यासाठी मतदार संघातील गावागावांत भेटी देत जनतेचे प्रश्न ऐकून घेतले. दौऱ्या दरम्यान आ. पाटील यांनी गावांमधील कॉर्नर सभांमध्ये विविध विकास योजनांची माहिती दिली तसेच महागाईच्या मुद्द्यावरून सत्ताधारी पक्षावर तीव्र टीका केली.

# वैद्यकीय संकुल उभारण्यासाठी ४३० कोटी मंजूर - आ. पाटील



### ३१ एकर जागेवर आधुनिक वैद्यकीय संकुल

जलसंपदा आणि तंत्रशिक्षण विभागाकडून वैद्यकीय शिक्षण विभागाकडे जागा हस्तांतरीत झाली आहे. या ३१ एकर जागेवर आता ३०० तज्ञ डॉक्टर उपलब्ध असलेले एक सुसज्ज आणि सर्वात मोठे वैद्यकीय संकुल उभारण्याचे काम आपण हाती घेतले आहे. महाविद्यालय आणि रूग्णालय इमारतीसाठी ४३० कोटी रूपयांचा निधी देखील उपलब्ध झाला आहे. लवकरच या नवीन जागेवर अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे स्वप्न साकार होणार आहे. आपल्या महायुती सरकारच्या मदतीने प्रवेश प्रक्रियेस मान्यता मिळवून घेतली आणि वैद्यकीय शिक्षण संकुलासाठी राष्ट्रीय महामार्गालगत मोक्याच्या ठिकाणी ३१ एकर जागा पदरात पाडून घेतली. मोठे स्वप्न पाहिले. आता ते साकारण्याच्या दृष्टिने महत्वपूर्ण पाऊल टाकले असल्याचेही आमदार पाटील यांनी सांगितले.

धाराशिव दि.९ (प्रतिनिधी) - सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावरील मोक्याची ३१ एकर जागा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी पदरात पाडून घेतली आहे. या ठिकाणी ३०० तज्ञ डॉक्टर उपलब्ध असलेले सुसज्ज व सर्वात मोठे वैद्यकीय संकुल उभारण्याचे काम हाती घेतले आहे. पहिल्या टप्प्यात ४३० कोटी रूपयांचा निधी देखील मंजूर झाला आहे. महाविकास आघाडीच्या त्रुटींमुळे रखडलेल्या प्रवेश प्रक्रियेला मान्यता मिळवून घेऊन प्रलंबित असलेल्या वैद्यकिय महाविद्यालयाच्या जागेचा प्रश्नही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहकार्याने निकाली काढला. मी केलेल्या पाठपुराव्याला महायुती सरकारच्या पाठबळामुळे यश आल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.

आपल्या अनेक वर्षांच्या मागणीच्या अनुषंगाने तत्कालीन वैद्यकिय शिक्षणमंत्री गिरीष महाजन यांनी २०१७ मध्ये धाराशिव येथे आयोजित केलेल्या महाआरोग्य शिबिरात शासकीय वैद्यकिय महाविद्यालयाची घोषणा केली होती. त्यानंतरच्या हिवाळी अधिवेशनात तत्कालीन आ.सुजितसिंह ठाकूर यांनी विधान परीषदेत व आम्ही विधानसभेत हा प्रश्न उपस्थित केला होता. त्याला उत्तर देताना गिरीश महाजन यांनी वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याची सभागृहात घोषणा केली होती. त्यानुसार वैद्यकीय महाविद्यालयासाठी पूरक असणार्या सर्व अनुषंगिक बाबींची पूर्तता व्हावी यासाठी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून अधिकृत ठराव घेवून ४ एकर जागा आपण वैद्यकीय महाविद्यालयासाठी मंजूर केली. एम.सी.आय.च्या अटींनुसार लागणारी जमीन उपलब्ध करून दिली. ३० कोटी रूपये खर्चून इमारत देखील बांधण्यात आली. तर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी आवश्यक असलेला वस्तुनिष्ठ प्रस्ताव महाजन यांच्याकडे सादर केला. त्यानंतर राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आले अन् अनेक त्रुटी राहिल्यामुळे वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश प्रक्रियेवर गंडांतर आले. तसेच युती सरकार सत्तेत आल्यानंतर महाविकास आघाडीमुळे शिल्लक राहिलेल्या सर्व त्रुटी दूर करण्यासाठी प्रभावी उपाययोजना आखली. राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषदेची अर्थात एम.एन.सी.ची मान्यता मिळविली व शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये पुन्हा एकदा प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून आता या महाविद्यालयातून पहिली बॅच डॉक्टर होवून बाहेर पडेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या मंजुरी नंतरही जागेचा मुलभूत प्रश्न तसाच प्रलंबित होता. ३ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या प्रश्नाला मी प्राधान्याने हातात घेतले. तत्कालीन ठाकरे सरकारकडे त्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. मात्र धाराशिवकरांसाठी अत्यंत महत्वपूर्ण असलेल्या या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या जागेचा प्रश्न सोडविण्याकडे ठाकरे सरकार आणि त्यांच्या निष्क्रिय लोकप्रतिनिधींनी साफ दुर्लक्ष केले. राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकारकडे मी जागेसाठी पुन्हा पाठपुरावा सुरू केला असल्याचे त्यांनी सांगितले. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी शहरातील शासकीय आयटीआय आणि जलसंपदा विभागाची जागा मिळावी यासाठी प्रयत्न सुरू केले. सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गालगत असलेली मोक्याची जागा तत्कालीन शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांच्याकडून मंजूर करवून घेतली. कौशल्य विकास व जलसंपदा विभागाकडून जागेचा ताबा महसूल विभागाने शासकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. शिल्पा डोमकुंडवार यांच्याकडे ऑगस्ट महिन्यातच सोपविला आहे. विद्यार्थी, रूग्ण आणि रूग्णांच्या नातेवाईकांच्या दृष्टिने अत्यंत महत्वाची आणि सोयीची असणारी ही जागा मिळविण्यात आपल्याला यश आले आहे. काही जणांनी वैयक्तिक स्वार्थासाठी पोहनेर रस्त्यावरील दगड खानीजवळील अडगळीच्या जागेत वैद्यकीय महाविद्यालय उभारण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. ते हाणून पाडत धाराशिवकरांच्या व्यापक हिताचा निर्णय घेण्यात मला यश आले असल्याचेही आमदार पाटील यांनी सांगितले.

# लोकसभेप्रमाणे विधानसभेतील महाविकास आघाडीला भरघोस यश मिळेल - पाटील

उमरगा दि.९ (प्रतिनिधी) - महायुती सरकारच्या काळात महागाई वाढल्याने जनता कंटाळली असून लोकसभेप्रमाणे विधानसभेत ही महाविकास आघाडीला भरघोस यश मिळेल अशा आशावाद जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष बाबा पाटील यांनी तालुक्यातील प्रचार दौऱ्यात व्यक्त केले.

उमरगा लोहारा विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार प्रवीण स्वामी यांच्या निवडणूक प्रचारार्थ तालुक्यातील भुयार चिंचोली तुगाव सुंदरवाडी नाईक नगर गणेश नगर बेळम आधी गावात गावभेट व बैठका झाल्या यावेळी बाबा पाटील म्हणाले की महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षाच्या जाहीरनामा हा सर्वसामान्याच्या हिताचा आहे. महायुती सरकारने एकीकडे लाडके बहीण योजना सुरू केली. मात्र दुसरीकडे महागाईत भरमसाठ वाढ केली. जीवनावश्यक वस्तूचे भाव ऐन दिवाळीत वाढविले गेल्यामुळे विशेषतः ग्रामीण भागातील जनतेत हा मोठा रोष आहे. याचा फायदा महाविकास आघाडीला नक्कीच होणार असल्यामुळे महाविकास आघाडीचे उमेदवार प्रवीण स्वामी यांच्या पाठीशी जनतेने खंबीरपणे उभे रहावे असेही आवाहन त्यांनी केले. यावेळी महाविकास आघाडीचे उमेदवार प्रवीण स्वामी म्हणाले की शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी माझ्यावर मोठा विश्वास टाकून मला उमेदवारी दिली. त्यामुळे त्यांचे ऋण मी कधीही विसरू शकत नाही. तिन्ही पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्ते निवडणुकीत प्रामाणिकपणे काम करत आहेत. त्यामुळे निवडणुकीत



यश तर मिळणारच आहे. परंतू निवडून आल्यावर सर्वांना सोबत घेऊन एक दिलाने तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करेन. महाविकास आघाडीने महिलांचा सन्मान व्हावा यासाठी महालक्ष्मी या नावाने योजना सुरू करून दरमहा तीन हजार रुपये देण्याचे जाहीर केले आहे. त्यामुळे महाविकास आघाडी बाबत महिलात मोठी सहानुभूतीची लाट निर्माण झाली असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी तालुका शिवसेनाप्रमुख बाबुराव शहापुरे, तालुका युवासेना प्रमुख अजित चौधरी, तालुका काँग्रेस कमिटीचे नूतन अध्यक्ष अर्जुन बिराजदार, काँग्रेसचे शहराध्यक्ष विजय दळगडे, ॲड एस पी इनामदार, महेश शिंदे, राहुल वाघ, जीवन सरपे, बाबा मस्के आदींसह महाविकास आघाडीचे कार्यकर्ते या गाव भेटी दौऱ्यात सहभागी झाले होते.

# अडचणी सोडविण्यासाठी मी कायम आपल्या सोबत - आ. पाटील



धाराशिव दि.९ (प्रतिनिधी) - महायुतीचा एक घटक पक्ष म्हणून मतदार संघातील आपली बलस्थाने ओळखून एकजुटीने काम करण्याची गरज आहे. तर

महायुतीमधील घटक पक्ष असलेल्या शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी मी आपल्या कायम सोबत असल्याचे आश्वासन आमदार राणाजगजिसिंह पाटील यांनी शिवसेना (शिंदे) च्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत दिले.

तुळजापूर विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांची आढावा बैठक तुळजापूर येथे आमदार पाटील यांच्या उपस्थितीत घेण्यात आली. पुढे बोलताना आ. पाटील म्हणाले की, सरकारने केलेल्या विविध विकास कामांची माहिती प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रयत्न करणे निवडणुकीच्या दृष्टीने तेवढेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी काही महत्त्वाच्या सूचना केल्या, त्यावरही सविस्तर चर्चा झाली. या बैठकीस शिवसेना शहरप्रमुख बापूसाहेब भोसले, तालुकाप्रमुख संभाजी पलंगे, भारत पवार, दिनेश भोसले, उपशहर प्रमुख नितीन कुऱ्हाडे यांच्यासह प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

# भारतीय लोकशाहीची चिंता नाही, चिंतन करुयात

लोकशाही शासनव्यवस्था जगातील अनेक राष्ट्रांनी स्विकारली आहे, कारण ती लोकांचा सहभाग, मतांचा हक्क आणि स्वातंत्र्यावर आधारित असते. भारताने संसदीय लोकशाही व्यवस्था स्वीकारली. लोकशाही म्हणजे लोकांच्या, लोकांकरिता आणि लोकांसाठी चालवलेले सरकार होय. लोकशाहीचा खरा अर्थ प्रत्येकासाठी समान संधी आणि अधिकार होय. भारत हे जगातील सर्वोत्कृष्ट लोकशाहीचे मोठे उदाहरणच आहे. भारतासह अनेक देशांनी आपली लोकशाही व्यवस्था टिकवून ठेवली परंतु त्याचा आजच्या काळातील प्रभाव आणि आव्हाने समजून घेणे महत्वाचे वाटते. हे वास्तव आपणाला स्विकारण्याशिवाय पर्याय नाही. आज अनेक लोकशाही देशातील नागरिकांचा मतदानातील सहभाग कमी होताना दिसून येत आहे. विशेषतः तरुण वर्ग मतदानाबाबत उदासीन असल्याने त्याचा परिणाम लोकशाहीच्या कार्यक्षमतेवर झाला आहे. आज राजकीय नेत्यांमध्ये दिवसेंदिवस भ्रष्टाचार वाढत असल्याने नागरिकांचा राजकीय व्यवस्थेवरचा विश्वास उडतो आहे. न्यायालय, संसद, मीडिया इत्यादी संस्थांवर राजकीय दबाव वाढतो आहे, त्यामुळे त्यांचे स्वतंत्र धोक्यात आले आहे. त्यांची कार्यक्षमता कमी होताना दिसत आहे. आजच्या डिजिटल युगात सोशल मीडिया, आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि मोठ्या डेटा विश्लेषणाचा वापर करून जनतेच्या भावनांवर प्रभाव टाकला जातो, जेणेकरून मतदानाचे निर्णय प्रभावित होऊ शकतात. या गोष्टींचा लोकशाहीवर सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही प्रकारे प्रभाव पडतो आहे. लोकशाही ही एक विचारधारा आहे. त्यामुळे जनता सत्तेचा सर्वोच्च स्त्रोत मानला जातो. परंतु सद्यस्थितीत विविध देशांमध्ये लोकशाहीसमोरील आव्हाने, त्याचे कार्य तसेच लोकांच्या सहभागाचा अभाव यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. काही ठिकाणी राजकीय नेते सत्तेचा दुरुपयोग करून आपल्या फायद्यासाठी संस्थांना दबावात ठेवतात. यामुळे सरकारांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो आणि लोकांच्या मतांचा योग्य तो आदर राखला जात नाही. लोकशाहीत अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे अत्यंत महत्त्वाचे आहे. मात्र काही ठिकाणी माध्यमे, पत्रकार आणि विचारप्रणालीवरच मर्यादा घातली जात आहे, ज्यामुळे लोकांच्या विरोधी मतांना योग्य स्थान मिळत नाही. लोकशाहीत आर्थिक विषमता ही आणखी एक महत्त्वाची समस्या आहे. विशेषतः काही देशांमध्ये, काही गटांसाठी संसाधनांची उपलब्धता आणि सुविधा अधिक आहे, तर इतर गट वंचित राहतात. यामुळे सामाजिक असमानता वाढते आणि लोकशाहीच्या मूलतत्त्वांना धोका निर्माण होतो. विविध ठिकाणी सत्ताकेंद्रित होताना दिसत आहे. जरी लोकांनी प्रतिनिधी निवडले असले तरी काही ठिकाणी ते केवळ नावापुरते असतात आणि खरी सत्ता काही ठराविक व्यक्ती किंवा कुटुंबाच्या हातात राहते. यामुळे लोकशाहीचा मूलभूत उद्देश बाजूला राहतो. लोकशाहीच्या यशस्वितेसाठी जनतेचा सक्रिय सहभाग गरजेचा असतो. परंतु अनेक ठिकाणी जनतेचा निवडणुकीनंतर फारसा सहभाग राहत नाही आणि त्यामुळे त्यांचे प्रश्न दुर्लक्षित राहतात. सध्या लोकशाहीच्या मूलतत्त्वांना आव्हाने येत असली तरी योग्य दिशा आणि ठोस सुधारणा करण्यास प्रारंभ केला तर या आव्हानांवर मात करता येईल. माध्यमांचा स्वतंत्रपणे वापर, आर्थिक असमानता कमी करणे तसेच सत्ताकेंद्रिततेवर नियंत्रण ठेवणे या गोष्टींचा विचार करणे गरजेचे आहे. जेणेकरून लोकशाहीची गती व पारदर्शकता कायम राहील. न्याय, समता आणि बंधुत्व हाच लोकशाहीचा पाया आहे.

**भविष्यातील आव्हाने आणि संधी**

बदलत्या पर्यावरणीय संकटांचा सामना करण्यासाठी शासनाला नव्या धोरणांची आवश्यकता आहे. लोकशाही व्यवस्थेमध्ये जनतेचा मताधिकार या धोरणांसाठी महत्त्वपूर्ण आहे, कारण हे जागतिक पातळीवर आवश्यक आहे. भविष्यात निवडणुकीतील सुरक्षितता महत्वाची ठरणार आहे. तंत्रज्ञानाचा वापर करून निवडणूक प्रक्रियेत सुधारणा केली जाते, पण त्याचबरोबर सायबर सुरक्षिततेच्या आव्हानांवरही नियंत्रण ठेवावे लागेल. लोकशाही टिकवण्यासाठी जनतेचे शिक्षण आणि प्रबोधन होणे गरजेचे आहे. नागरिकांना त्यांच्या अधिकारांचे महत्त्व समजणे आणि त्यांच्या निर्णय प्रक्रियेतील सहभाग वाढविणे आवश्यक आहे. अनेक देश जागतिक पातळीवर लोकशाहीची एकत्रित रणनीती तयार करण्याचा प्रयत्न करत आहेत. हे प्रयत्न लोकशाही मूल्यमापन टिकवून ठेवण्यासाठी आणि मानवतेला एकत्र आणण्यासाठी महत्वाचे आहेच. शक्तिशाली लोकशाहीसाठी जागृत आणि सुजाण नागरिकांची आवश्यकता आहे.

लोकशाहीसमोर अनेक आव्हाने आणि संधी आहेत. बदलत्या तांत्रिक, सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीत लोकशाही व्यवस्थेतील पारदर्शकता, विश्वासार्हता आणि नागरिकांचा सहभाग टिकवणे अत्यंत महत्वाचे ठरणार आहे. योग्य धोरणे, शिक्षण आणि प्रबोधनाद्वारे, भविष्यात लोकशाही व्यवस्था अधिक स्थिर, न्याय्य आणि सर्वसमावेशक बनवता येईल. लोकशाही व्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी लोकांना त्यांच्या अधिकार, कर्तव्य व जबाबदाऱ्यांची जाणीव असायला हवी. आपला मताधिकार, आपला हक्क लोकशाहीला मजबूत करण्यासाठी पुढाकार घ्या. शिक्षणामुळे नागरिक जागरूक होतात आणि त्यांच्या हक्कांसाठी उभे राहतात. न्यायव्यवस्था स्वायत्त आणि निष्पक्ष असावी. नागरिकांना न्याय मिळावा आणि कायदा सुव्यवस्था पाळली जावी. शासन पारदर्शक असावे, ज्यामुळे भ्रष्टाचाराला आळा बसून प्रशासनाने जबाबदारीचे भान ठेवल्यास लोकांचा विश्वास वाढेल. प्रसारमाध्यमे आणि पत्रकारिता स्वतंत्र असावी. लोकांच्या आवाजाला योग्य ठिकाणी पोहोचवण्यासाठी माध्यमांना स्वातंत्र्य मिळायलाच हवे. समाजातील विविधता जपली पाहिजे. प्रत्येक नागरिकाला समान संधी आणि आदर मिळायला हवा. निवडणुकीत मत देणे, जनमत तयार करणे, जनजागृती मोहिमा राबविणे असे उपक्रम नागरिकांनी राबवले पाहिजेत. सामाजिक असमानता कमी करणे, सर्वांना समान संधी मिळवून देणे, समाजातील जातीय सलोखा राखणे. निवडून आलेल्या प्रतिनिधींनी त्यांच्या कार्याची जबाबदारी ओळखून सामाजिक भान लक्षात ठेऊन जनतेच्या प्रश्नांना न्याय दिला पाहिजे. जनतेचा सर्वांगीण विकास हाच माझा ध्यास ही भूमिका घेऊन सतत तत्पर राहून लोकाभिमुख कार्य करणे गरजेचे आहे. लोकशाही टिकली तरच राष्ट्र विकसीत होईल. लोकशाहीची खरी ताकद म्हणजे सजग आणि समजूतदार नागरिक होय.



**प्रा. डॉ. महेश मोटे**
**जिल्हा कार्याध्यक्ष**
**महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मुलन समिती, धाराशिव.**
**भ्रम. क्र. ९९२२९४२३६२**

## संपादकीय

### ‘रतन टाटा’ दुर्बलांची काळजी घेणारे नेतृत्व अन् व्यक्तिमत्त्व

रतन टाटा आपल्याला सोडून गेले त्याला आता एक महिना झाला आहे. गजबजलेल्या शहरांपासून ते छोटी शहरे, अगदी गावांपर्यंत, समाजातल्या प्रत्येक क्षेत्रांत त्यांची उणीव तीव्रतेने जाणवत आहे. प्रस्थापित उद्योगपती, होतकरू उद्योजक आणि मेहनती व्यावसायिक सर्वांनीच त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. पर्यावरणाप्रती सजगता आणि परोपकाराला वाहून घेतलेल्या प्रत्येकालाही तितकेच दुःख झाले. त्यांच्या निधनाने देशाला, तर त्यांची अनुपस्थिती तीव्रतेने जाणवली त्याचबरोबर जगालाही ती जाणवली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी

युवकांसाठी रतन टाटा हे प्रेरणास्थान होते. स्वप्ने ही साकारायची असतात आणि करुणा आणि विनम्रता बाळगत यश साध्य होऊ शकते, याचे स्मरण ते करून देतात. इतरांसाठी त्यांनी भारतीय उद्योजकतेची सर्वोत्कृष्ट परंपरा सादर केली आणि प्रामाणिकपणा, सर्वोत्कृष्टता आणि सेवा या मुल्यांप्रती ठाम कटिबद्धता त्यांनी जोपासली. त्यांच्या नेतृत्वाखाली टाटा समूहाने आदर, सचोटी आणि विश्वासार्हता जपत जगभरात नवी शिखरे गाठली. तरीही अतिशय विनम्रतेने आणि दयाळूपणे त्यांनी हे यश स्वीकारले. इतरांची स्वप्ने साकारण्यासाठी ठाम आधार देणे हा रतन टाटा यांचा एक अनोखा गुण होता. अलीकडच्या वर्षात भारताच्या स्टार्ट अप परिसंस्थेचे मार्गदर्शक म्हणून ते ओळखले जात असत अनेक आशादायी प्रकल्पांमध्ये त्यांनी गुंतवणूक केली. युवा उद्योजकांच्या आशा-आकांक्षा त्यांनी जाणल्या आणि भारताच्या भविष्याला आकार देण्याची त्यांची क्षमता ओळखली. अशा युवकांना पाठबळ देत, धाडस आणि पूर्ण क्षमतेनिशी काम करण्यासाठी अशी स्वप्ने पाहणाऱ्या पिढीला त्यांनी सबल केले. यातून नवोन्मेश आणि उद्योजकतेची संस्कृती निर्माण होण्यासाठी मोठी मदत झाली आणि याचा येत्या दशकांमध्ये भारतात सकारात्मक प्रभाव जारी राहील याचा मला विश्वास आहे.त्यांनी नेहमीच सर्वोत्कृष्टतेचा पुरस्कार केला आणि भारतीय उद्योगाने जागतिक मापदंड स्थापित करण्याचा आग्रह ठेवला. हा दृष्टिकोन भारताला, जागतिक तोडीची गुणवत्ता बनवण्यासाठी आपल्या भावी उद्योजकांना प्रेरणा देत राहील याचा मला विश्वास आहे. बोर्डरूम किंवा सहकाऱ्यांपुरती अशी त्यांची महानता मर्यादित नव्हती. सर्व मानवतेप्रती त्यांची परोपकारी दृष्टी होती. प्राण्यांप्रती त्यांचा दयाळूपणा सर्व परिचित आहे. प्राण्यांच्या कल्याणासाठीच्या प्रत्येक प्रयत्नाला त्यांचे सहकार्य राहिले. एखाद्या व्यवसाय प्रकल्पाप्रमाणेच त्यांच्या जीवनाचा भाग बनलेल्या त्यांच्या श्वानाचे फोटो ते अनेकदा सामायिक करत. त्यांचे जीवन आपल्याला, खरे नेतृत्व आणि व्यक्तिमत्त्व हे केवळ एखाद्याच्या कामगिरीने नव्हे, तर दुर्बलांची काळजी घेण्याच्या क्षमतेने मापले जाते याचे स्मरण करून देते. कोट्यवधी भारतीयांच्या दृष्टीने, रतन टाटा यांची देशभक्ती संकटाच्या काळात सर्वात तेजस्वी ठरली होती. २६/११च्या दहशतवादी हल्ल्यानंतर मुंबईतील प्रतिष्ठित ताज हॉटेल त्यांनी झपाट्याने पुन्हा उघडणे म्हणजे भारत दहशतवादाला नकार देत एकजुटीने उभा आहे, हे राष्ट्राला सूचित करणारे होते. व्यक्तिगतरीत्या मला अनेक वर्षांपासून त्यांना जवळून जाणून घेण्याचा विशेषाधिकार मिळाला. आम्ही गुजरातमध्ये जवळून काम केले, जिथे त्यांनी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली. यातील अनेक प्रकल्पांवर त्यांचा खूप जीव होता. काही आठवड्यांपूर्वी, मी स्पेन सरकारचे अध्यक्ष पेड्रो सांचेझ यांच्या समवेत वडोदरा येथे होतो आणि आम्ही संयुक्तपणे एका विमान संकुलाचे उद्घाटन केले जेथे सी-२९५ विमाने भारतात बनवली जातील. रतन टाटा यांनीच यावर काम सुरू केले होते. रतन टाटा यांची अनुपस्थिती आम्हाला फारच जाणवली हे वेगळे सांगायला नको.मला रतन टाटा हे पत्रलेखक म्हणूनही स्मरणात आहेत. ते वारंवार मला निरनिराळ्या मुद्द्यांवर पत्र लिहीत असत, मग ते प्रशासनाचे विषय असोत, सरकारच्या पाठिंब्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे असो किंवा निवडणूक विजयानंतर अभिनंदनाच्या शुभेच्छा असोत.जेव्हा मी केंद्र सरकारमध्ये गेलो तेव्हाही आमचा निकटचा संवाद कायम राहिला आणि ते आमच्या राष्ट्र उभारणीच्या प्रयत्नांमधील एक वचनबद्ध भागीदार राहिले. रतन टाटा यांनी स्वच्छ भारत मिशनला दिलेला पाठिंबा विशेषत्वाने माझ्या हृदयाच्या जवळ होता. भारताच्या प्रगतीसाठी स्वच्छता, वैयक्तिक स्वच्छता आणि साफसफाई अत्यावश्यक आहे हे समजून ते या लोकचळवळीचे मौखिक पुरस्कर्ते बनले. ऑक्टोबरच्या सुरुवातीला स्वच्छ भारत मिशनच्या दहाव्या वर्धापन दिनानिमित्त त्यांनी दिलेला मनस्वी व्हीडिओ संदेश मला अजूनही आठवतो. हे त्यांच्या काही शेवटच्या सार्वजनिक दर्शनांपैकी एक होते.त्यांच्या हृदयाच्या जवळची आणखी एक बाब म्हणजे आरोग्यसेवा आणि विशेषत: कर्करोगाविरुद्धची लढाई. मला दोन वर्षांपूर्वीचा आसाममधील कार्यक्रम आठवतो, जिथे आम्ही राज्यातील विविध कर्करोग रुग्णालयांचे संयुक्तपणे उद्घाटन केले होते. त्यावेळच्या त्यांच्या टिप्पण्यांमध्ये त्यांनी स्पष्टपणे सांगितले होते की, त्यांना त्यांची शेवटची वर्षे आरोग्यसेवेसाठी समर्पित करायची आहेत. आरोग्य आणि कर्करोग सेवा सुलभ आणि परवडण्याजोगी बनवण्याच्या त्यांच्या प्रयत्नांचे मूळ हे त्या रोगांशी लढा देत असलेल्या रुग्णांबद्दलच्या खोल सहानुभूतीमध्ये होते, समाजातील सर्वात दुर्बळांच्या/असुरक्षितांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे हेच न्याय असल्याचा त्यांना विश्वास होता.आज जेव्हा आपण त्यांची आठवण काढतो, तेव्हा आपल्याला त्यांनी कल्पिलेल्या समाजाची आठवण होते. जिथे व्यवसाय हा भल्यासाठी असणारी एक शक्ती म्हणून काम करू शकतो, जिथे प्रत्येक व्यक्तीच्या क्षमतेचे मूल्य असते आणि जिथे प्रगती ही सर्वांच्या कल्याण आणि आनंदात मोजली जाते. त्यांनी स्पर्श केलेल्या जीवनात आणि त्यांनी जोपासलेल्या स्वप्नांमध्ये ते चिरायू आहेत. भारताला एक चांगले, दयाळू आणि अधिक आशादायी ठिकाण बनवल्याबद्दल पुढच्या पिढ्या त्यांच्या कृतज्ञ असतील.

# प्रदूषणावर आळा हि आता काळाची गरज



वातावरणातील बदलांमुळे मुंबईतील प्रदूषण वाढले आहे. या प्रदूषणावर नियंत्रण मिळविण्याचे मुंबई महापालिकेचे विविध प्रकारच्या माध्यमातून प्रयत्न चाललेले असताना आता त्यावर आणखी प्रभावी उपाय म्हणून मुंबईत कृत्रिम पाऊस पाडण्याचा प्रयत्न केला जात आहे. खरे म्हणजे असे केल्याने प्रदूषण थांबणार आहे का, असा प्रश्न निर्माण होतो. उलट त्यामुळे पैशांचा चुराडाच अधिक होईल. एरव्ही मुंबईत पावसाळ्याच्या दिवसांत चार महिने भरपूर पाऊस पडत असतोच. त्याने प्रदूषण थांबत नाही, तर आता कृत्रिम पाऊस पाडल्याने हे प्रदूषण थांबणार आहे का? हा प्रश्न आहे. याबाबत शासनाने प्रदूषण तज्ज्ञांचे मत जाणून घेतले आहे काय? तसे असेल आणि महापालिकेचा पैसा वाया जाणार नाही, हेही तपासून पाहिले पाहिजे.

मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असली तरी देशातील गोरगरिबांचे मुंबई शहर जगण्याचे ठिकाण आहे. केवळ गरीबच नव्हे तर चाकरमानी, विविध क्षेत्रातील अधिकारी, कर्मचारी, व्यापारी, उद्योजक यांचेही मुंबई शहराशी नजीकचे नाते आणि त्यांचे व्यवहार अवलंबून असल्यामुळे मुंबईशिवाय ते राहू शकत नाहीत. मुंबईच्या वाढत्या लोकसंख्येमुळे मुंबई शहरावर विविध बाबतीत ताण आला आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने मुंबईतील वाढत्या प्रदूषणाची गंभीर दखल घेत, इमारती बांधकामे थांबविण्याचे आदेश दिले होते. त्याचबरोबर, मुंबईतील बांधकामाच्या ठिकाणी धूळ व प्रदूषण नियंत्रणासाठी आखण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी मुंबई महापालिकेने वॉर्डस्तरावर करण्यास सुरुवात केली आहे. वॉर्डस्तरावर नेमण्यात आलेल्या विशेष पथकांकडून पाहणी होत असून मार्गदर्शक तत्त्वांचे पालन न झाल्यास काम थांबविणे किंवा ते सील करण्यात येणार आहे.

असो. दिल्लीपाठोपाठ मुंबईतील प्रदूषणाचे प्रमाण वाढले, यात शंकाच नाही. मुंबईत आधीच लाखोंच्या संख्येने वाहने आहेत. शिवाय बाहेरून येणारी वाहने काही कमी होत नाहीत. या वाहनांमुळेही वातावरणातील हवेत प्रदूषणाचा फैलाव होत असावा, असे वाटते. वास्तविक मुंबईत विविध प्रकारच्या माध्यमातून जे प्रदूषण निर्माण होत आहे, ते थांबवणे हे महापालिकेसमोर आणि राज्य सरकारसमोर मोठे आव्हात्मक काम आहे. मुंबई महापालिकेमार्फत करण्यात येत असलेल्या उपाययोजनांची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नुकतीच पाहणी केली. त्यात रस्ते, पदपथ आणि धूळ आदी कामांची पाहणी केली. यामधून निर्माण होणारे प्रदूषण रोखण्यासाठी प्रसंगी दुबईतील कंपनीशी करार करून कृत्रिम पाऊस पाडण्यात येणार असल्याचे सूतोवाच केले. तसेच एका दिवसाआड म्हणजेच तिसऱ्या दिवशी मुंबईतील रस्ते धुऊन साफ केले जातील. त्यासाठी एक हजार टँकर भाड्याने घ्यावे लागतील, असेही त्यांचे म्हणणे आहे.

मुख्यमंत्री जे काही म्हणत आहेत ते मुंबईकरांच्या दृष्टीने आणि मुंबईच्या आरोग्याच्या दृष्टीने समाधानाची बाब आहे. हे सर्व असताना मुंबईत जी विकासकामे सुरू आहेत, जसे मोठ्या इमारतींची कामे, इमारतींचे पाडकाम, मेट्रो रेल्वेची कामे व अन्य प्रकारच्या कामामुळे जी धूळ निर्माण होते, त्यातून निर्माण होणारे प्रदूषण आणि लाखो वाहनांच्या धूर आणि धुळीच्या कणांमुळे निर्माण होणारे प्रदूषण या सगळ्यांचा मनुष्य जीवनावर होणारा परिणाम किती घातक आहे, याची आपण कल्पनाही करू शकत नाही. धूळ प्रतिबंधक उपाय करण्याची गरज तर आहेच, यात दुमत असण्याचे कारण नाही. प्रदूषण रोखणे ही काळाची गरज आहे. लोकांनीही आपापल्या पद्धतीने काळजी घेण्याची गरज तर आहेच. शिवाय महानगरपालिकेचे कर्मचारी येतील आणि स्वच्छता करतील, असे त्यांच्या भरवशावर न बसता आपला परिसर कसा स्वच्छ राहील, हे पाहिले पाहिजे. त्यासाठी त्यांना काळजी घ्यावी लागणार आहे. मुंबई महापालिका सर्व बागांमध्ये अधिकची झाडे लावणार आहे. नव्हे त्याची अधिक गरज आहे. या झाडांमुळे धुळीचे कण रोखता येतील, शिवाय कार्बन डायऑक्साईड अधिक निर्माण करण्याचे काम ही झाडे करतील. प्रदूषण रोखण्यासाठी मुंबई महानगरपालिका प्रयत्नशील आहे, त्यासाठी विविध उपाय योजत आहे. रस्ते पाण्यामुळे साफ केल्यास धुळीचे कण उडणार नाहीत. हे सर्व असताना महापालिकेला मोठ्या खर्चाची तरतूद करावी लागणार आहे. मग त्यासाठी रस्ते धुण्यासाठी लागणारे टँकर, कृत्रिम पाऊस पाडण्यासाठी होणारा खर्च सोसावा लागणार आहे. त्याचबरोबरीने आता मुंबईकरांनी प्रदूषण दूर व्हावे यासाठी सजग राहणे गरजेचे आहे.

# जेवढे आजार तेवढे उपचार



जागतिक एड्स दिन १ डिसेंबरला पाळला जातो. यायोगे एड्ससारख्या जीवघेण्या आजाराप्रति जागृती निर्माण करण्याचे काम सातत्याने होत असले तरी अजूनही बरेच काम होणे गरजेचे आहे. दुसरीकडे थंडीचा काळ सुरू होत आहे. या काळात देशभर अस्थमाग्रस्त रुग्णांची संख्या वाढताना दिसते. वाढत्या प्रदूषणामुळे आता ही समस्या अधिक गंभीर होत आहे. त्यामुळे याविषयीदेखील सविस्तर माहिती घ्यायला हवी.भारतासारख्या प्रचंड लोकसंख्येच्या देशातल्या आरोग्य समस्यांचा गंभीर प्रश्न सर्वज्ञात आणि सर्वश्रृत आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात अत्यंत तोकड्या आरोग्यसेवा आणि आरोग्याप्रति दुर्लक्ष करण्याची समाजाची मानसिकता या दोन कारणांमुळे हा देश नानाविध आजारांचे आश्रयस्थान बनत आहे, यात शंका नाही. दिवसेंदिवस हा प्रश्न उग्र रूप धारण करत आहे. त्यामुळेच दर वर्षी गंभीर आजारांप्रति जागृती निर्माण करण्यासाठी ठरावीक दिवसांचे औचित्य साधले जाते. या पार्श्वभूमीवर १ डिसेंबर रोजी साजऱ्या होणाऱ्या जागतिक एड्स दिनाचे महत्त्व खूप मोठे आहे.गेली अनेक वर्षी एड्सप्रती जागरूकता निर्माण करण्याचे काम होत आहे. या जीवघेण्या आजारामुळे केवळ बाधित व्यक्तीच नव्हे तर संसर्गाने जोडीदारही या आजाराला बळी पडू शकतो. परिणामस्वरूप संपूर्ण कुटुंबाला अनेक समस्यांचा सामना करावा लागू शकतो, हे आणि यासारखे अन्य धोके लोकांसमोर आणले जात आहेत. मात्र इतक्या वर्षांच्या प्रयत्नांनंतरही जनसामान्यांना या दाहक व्याधीचे पुरेसे ज्ञान मिळाले आहे, असे म्हणता येणार नाही. म्हणूनच अजूनही बरेच काम बाकी आहे, असे यंदाच्या या दिनाच्या निमित्ताने म्हणावे लागेल. एड्सग्रस्तांची वाढती संख्या लक्षात घेता याला कलियुगातील भस्मासूर म्हटल्यास वावगे ठरू नये.वास्तविक, एड्सपासून बचाव करण्यासाठी गर्भनिरोधके उपलब्ध असूनही जनजागरणाच्या अभावामुळे या सुरक्षा यंत्रणेचा प्रभावी वापर होत नाही. याबाबत देशातील तरुण पिढीशी संवाद साधण्याची आवश्यकता आहे. तसे प्रयत्न शासन आणि काही स्वयंसेवी संघटनांमार्फत केले जात आहेत. रोगप्रतिकारक शक्ती कमी झाल्यामुळे एचआयव्हीबाधित व्यक्ती साध्या आजारांनाही बळी पडते. शरीरातील प्रतिकार यंत्रणा मोडकळीला आणणाऱ्या या विषाणूंचा एका शरीरातून दुसऱ्या शरीरात प्रवेश होण्याचे चार मार्ग आहेत. एक म्हणजे असुरक्षित शरीरसंबंध. दुसरा एचआयव्हीबाधित मातेकडून गर्भाला लागण होणे. तिसरा एचआयव्हीबाधित व्यक्तीने वापरलेल्या सुईचा निर्जंतुक न करता पुनर्वापर आणि चौथा अपघातग्रस्त अथवा आजारी रुग्णावर शस्त्रक्रिया करताना एचआयव्हीचे विषाणू असणाऱ्या रक्ताचा पुरवठा होणे. या चार मार्गांनी एचआयव्हीचा प्रसार होतो.एचआयव्हीची बाधा झाल्यानंतर तीन ते सहा महिन्यांत रुग्णामध्ये तीव्र ताप येणे, विशेष कारण नसताना वजनात सात ते आठ किलोची घट होणे, सातत्याने जुलाब होणे, सांधेदुखी, डोकेदुखी, थकवा, गळ्यावर अथवा काखेत गाठी येणे, तोंडाच्या आतल्या भागात फोड आढळणे, टीबी, मेनींजायटिस, न्यूमोनिया, रेटीनायटिस, हर्पिस हे विकार उद्भवणे, रात्रीच्या वेळी दरदरून घाम फुटणे आणि पोटदुखी, उलट्या होणे अशी लक्षणे आढळतात. त्यामुळेच यासारखी लक्षणे आढळल्यास त्वरित तपासणी करण्याची सजगता वाढणे गरजेचे आहे. खेरीज भारतामध्ये असुरक्षित शरीरसंबंधांमुळे एचआयव्हीचा प्रसार होण्याचे प्रमाण सर्वाधिक आहे. एचआयव्हीबाधित व्यक्तीसाठी वापरलेल्या सुयांचा वापर निरोगी व्यक्तीच्या उपचारात केल्यास एचआयव्हीचा प्रसार होतो. त्यामुळे कोणतेही उपचार घेताना रुग्णाने नव्या सुईच्या वापरासाठी आग्रह धरायला हवा. अमली पदार्थ शिरेवाटे घेणारे व्यसनाधिन तरुणही एचआयव्हीच्या प्रसाराला बळी पडतात. हेरॉईन अथवा गर्दसारखे अमली पदार्थ शिरेवाटे घेण्याची पद्धत सध्या रूढ आहे. हे व्यसनाधीन तरुण एकमेकांच्या सुयांचा वापर करतात. असे करताना त्यांना सुया निर्जंतुक करून घेणे शक्य असतेच असे नाही. त्यामुळे बरेचदा एचआयव्हीबाधित व्यक्तीने वापरलेल्या सुईचा पुनर्वापर होऊन एचआयव्हीचा प्रसार होतो.

विचारात घेण्याजोगा आणखी एक मुद्दा म्हणजे रक्तदान करताना अथवा रक्त स्वीकारण्यापूर्वी रक्तचाचणी करायला हवी. एचआयव्हीबाधित व्यक्तीचे गाढ चुंबन घेतल्यानेही एड्सचा प्रसार होतो. विशेषत: एचआयव्ही बाधित व्यक्तीच्या अथवा तिचे चुंबन घेणाऱ्या व्यक्तीच्या तोंडात जखमा असतील तर निश्चितच असा प्रसार होतो. दारूसारख्या अमली पदार्थांचे सेवन केल्यानंतर अनेकांना लैंगिक क्रियेत सहभागी व्हावेसे वाटते. अशा वेळी ते कंडोमचा वापर करतीलच याची शाश्वती नसते. त्यामुळे दारूचे व्यसन अप्रत्यक्षपणे एचआयव्हीच्या प्रसाराला कारणीभूत ठरते. असे असले तरी एड्सबाधित व्यक्तीला स्पर्श केल्याने, तिचे मलमूत्र हाताळल्याने, या व्यक्तीसोबत एकाच ताटात जेवल्याने, तिचे कपडे वापरल्याने अथवा सोबत वास्तव्य केल्याने या रोगाची लागण होत नाही. एचआयव्हीची बाधा आणि प्रतिबंध यासंबंधी योग्य वेळी माहिती न मिळाल्याने काही व्यक्तींना एचआयव्हीच्या बाधेला बळी पडावे लागले आहे.रोग आणि चर्चा करत असताना वाढत्या थंडीतील काही आजारांविषयी देखील सजग होणे गरजेचे आहे. सध्याचा काळ ऋतूबदलाचा आहे. वातावरणातील बदलामुळे या काळात अस्थम्याच्या रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढताना दिसते. या काळात अस्थम्याचा त्रास जाणवण्याचे मुख्य कारण म्हणजे बदलत्या वातावरणाशी जुळवून घेताना श्वसनसंस्थेची ताकद कमी पडणे अथवा काही अडचणी जाणवणे. श्वासनलिका संवेदनशील असणाऱ्या रुग्णांना या दिवसात हा त्रास सोसावा लागतो. संसर्गामुळे संवेदनशील श्वासनलिका आकुंचन पावतात आणि अस्थम्याची लक्षणे जाणवायला लागतात. थंडी वाढू लागल्यानंतर वातावरणात परागकणांचे प्रमाणही वाढते. या दिवसात गवतफुलांचे प्रमाणही खूप जास्त असते. त्यामुळेच याची ॲलर्जी असणाऱ्यांना लगेच त्रास होण्यास सुरुवात होते. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे या काळात जमीन थंड राहते. साहजिकच गारव्यामुळे जमिनीलगत धुक्याची दुलई पसरते. ही बाबही अस्थम्याला कारक ठरते. खेरीज थंडीत हवेमध्ये अनेक दूषित कणांचा संचार असतो. प्रदूषणयुक्त वातावरणात असे घातक कण हवेत तरंगत राहतात.थंडीमध्ये पसरलेल्या धुक्यात हे कण अडकून राहतात आणि त्यांची बाधा होऊन श्वासनलिका प्रभावित होते.या समस्येचे आणखी एक कारण म्हणजे एरव्ही व्यायामाला अनुत्सुक असणारे लोकही थंडीच्या आल्हाददायक वातावरणात व्यायामासाठी बाहेर पडतात. मात्र त्यांच्या शरीराला व्यायामाची सवय नसते. त्यात वातावरणातील बदलाचा परिणाम होतो आणि व्यायामामुळे येणारा अस्थमा बळावतो. वेगवेगळ्या वयोगटातील व्यक्तींना अस्थम्याचा त्रास वेगवेगळ्या प्रकारे जाणवतो. लक्षात घेण्याजोगी बाब म्हणजे शरीर विकसित होत असतानाच अस्थमा जडतो. म्हणजेच वृद्धावस्थेत अस्थमा मागे लागत नाही, हे आपण लक्षात घ्यायला हवे. लहान मुलांना अस्थम्याचा जास्त धोका असतो. त्यांना मोठ्या माणसांसारखा दम लागत नाही, मात्र ती सतत खोकतात. सतत खोकला येणे हे अस्थम्याचे महत्त्वपूर्ण लक्षण आहे. मोठ्या माणसांना दम लागणे, छातीतून आवाज येणे, श्वास घेण्यास त्रास होणे, श्वास अपुरा पडणे आदी लक्षणे जाणवतात. त्यातही पहाटेच्या सुमारास खोकल्याची तीव्रता वाढते.

एकंदरीतच अस्थमा हा त्रासदायक आजार असला तरी सध्या यावर अत्यंत परिणामकारक औषधोपचार उपलब्ध आहेत. यात श्वासावाटे घेता येणारी औषधे अधिक परिणामकारक सिद्ध होतात. औषधांचा इनहेल्ड डोस कमी लागतो. म्हणजेच तोंडाने दोन मिली औषध पोटात जात असेल तर श्वासावाटे दिल्या जाणाऱ्या औषधाचा २०० मायक्रोग्राम डोस पुरेसा असतो. याचे कारण औषध नेमकी गरज आहे तिथे पोहोचते. मात्र दुर्दैवाने आपल्याकडे श्वासावाटे घेतल्या जाणाऱ्या म्हणजेच इनहेल्ड औषधांप्रती हवी तेवढी जागृती झालेली नाही. आपल्याकडे आजही औषधे घेण्याची योग्य पद्धत अवलंबली जात नाही. अशा प्रकारे घेतल्या जाणाऱ्या इनहेलर्सची सवय लागू शकते असाही एक गैरसमज आढळतो. तो दूर करणे गरजेचे आहे.तोंडावाटे अनावश्यक प्रमाणात औषध पोटात जाते आणि काही परिणाम दाखवते. याचाच एक भाग म्हणून अशी औषधे घेतल्यानंतर हात थरथरणे, शरीरात कंप जाणवणे, अस्थिरता अथवा बैचेनी जाणवणे आदी त्रास सोसावा लागतो. मात्र श्वासावाटे घेतल्या जाणाऱ्या औषधांमुळे असा कुठलाही त्रास जाणवत नाही. या औषधांमुळे अस्थम्यावर लवकर नियंत्रण ठेवणे शक्य होते. थंडीच्या सुरुवातीच्या काळातच आपण या सगळ्यांची माहिती घेणे गरजेचे आहे. त्रास वा लक्षणांकडे लक्ष ठेवणे, गरज वाटताच तज्ज्ञांचा सल्ला घेणे, औषधांचा पूर्ण डोस घेणे आणि आवश्यक ती पथ्ये पाळणे या नियमांचे पालन केल्यास अस्थमा रुग्ण या आल्हाददायक वातावरणाचा आनंद घेऊ शकतात.-डॉ. दिलीप शिरसाठ

## जीवनाचे सार: चार गोष्टी

जगातल्या प्रत्येक अडचणीची उकल शक्य आहे. मानव तर विशेष शक्तींचा धनी आहे. जर मानवाकडे सातत्य, निष्ठा व प्रयत्न करण्याची क्षमता असेल तर त्यासाठी सर्व सोपे आहे. जीवनाला निरुपयोगातून उपयोगी बनवण्यासाठी अनेक उपाय आहेत. त्यापैकी चार गोष्टी अशा आहेत, ज्यांचा जीवनात समावेश केल्याने अडचणींचे समाधान होऊ शकते. या चार गोष्टींना जीवनाचे सार किंवा आधार सुद्धा म्हटले जाऊ शकते. सर्व प्रकारच्या विकारांचा त्याग, मिथ्यत्व सोडून साधेपणा ग्रहण करणे आहे, बंधने झुगारुन साहस व जीवनात अध्यात्माचा समावेश केला तर मनुष्याचे निरुपयोगी जीवन उपयोगी बनेल. त्याच्या जीवनात असंतोषाचा नाश होईल. त्याबदल्यात त्याच्या जीवनात आनंद, उत्साह, शांतता व समाधानाची वृद्धी होईल.

विकार मानवी जीवनातील सर्वात मोठा अडसर आहे. जो मानवास फक्त विकृती देतो तसेच उदारता, दान, दया, प्रेम या प्रवृत्तींना वंचित करतो. म्हणून त्याच्या भौतिक इच्छा इतक्या बळावतात की, संग्रह करणे मग ते योग्य-अयोग्य, कर्तव्य-अकर्तव्य, नातेवाईक-त्रयस्त, शोषण-पोषण याचा अजिबात विचार करत नाही. आपला फायदा व मोहासमोर त्यास सर्व आदर्श, मर्यादा व धोरणे क्षुल्लक वाटू लागतात. अशाप्रकारे विकारांनी पिडीत मनुष्याच्या जीवनात शोक-संताप व अशांतता, असंतोषाशिवाय कुणाला आनंदाची संधी मिळू शकते? विकृती मनुष्याचा फार मोठा दोष आहे, याचा तात्काळ त्याग केला पाहिजे. उदारता व महानतेची वृत्ती मनुष्याचे दोन दागिने मानले गेले आहेत. उदारतेचा गुण आपल्यातील इतर गुण त्यागण्यास प्रोत्साहित करतो. त्याग तपश्चर्येपेक्षा कमी नसतो. त्यागी पुरुष कुठल्याही वस्तुचा संग्रह धोरण व आदर्श व्यतिरिक्त करत नाही. उदारता पुरुष मोक्षासाठी अंगीकारतो. उदार पुरुष धोरणाने मिळवलेल्या धन-धान्याने सुखी व समाधानी राहतो. अशा लोकांची प्रत्येक अडचण आपोआप सुटत राहते.

## राशी भविष्य



१० नोव्हेंबर २०२४ -

मेष: शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: पश्चिम
नशिबावर सोडून दिलेले कामे पार पडतील. आर्थिक फायदा होईल. दुसऱ्याच्या कामात हस्तक्षेप करू नका व्यापारात वेळेवर घेतलेले निर्णय फायदेशीर राहतील.

वृषभ : शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: दक्षिण
दूरदर्शिपणामुळे व चातुर्यामुळे अनेक अडचणीं पार पाडताल. कामातील गती कायम राखल्याने यश मिळेल. समाजातील प्रतिष्ठेत वाढ होईल. नवीन संबंध फायदेशीर राहतील.

मिथुन : शुभ रंग: गुलाबी: शुभ दिशा: दक्षिण
व्यवसायात यश मिळेल. अडकलेला पैसा मिळेल. अधिक विश्वास दाखवून कामे करू नका. भाग्याचे पूर्ण सहकार्य आज लाभणार आहे.

कर्क :शुभ रंग: पांढरा., शुभ दिशा: उत्तर
आपले प्रयत्न यशस्वी होतील. सन्मान व किर्तीत वाढ होईल. खर्च विचारपूर्वक करा. सरकारी कामे पार पडतील.कुटुंबात शुभ कार्याची चर्चा होऊन रूपरेषा आखली जाईल.

सिंह : शुभ रंग: लाल, शुभ दिशा:पश्चिम
नवीन योजना फायदेशीर राहतील. मानसिक तणावापासून मुक्ति मिळेल. आळस सोडून द्या. स्थावर मालमत्तेचे काम पूर्ण होईल. संयम बाळगा.

कन्या :शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: उत्तर
मुलांच्या प्रगतीचे योग आहेत. कामात अनुकूल परिस्थिती निर्माण होईल. शुभ संकेत मिळाल्याने आपले मन उत्साहित राहील. आर्थिक लाभ भरपूर होईल. परमेश्वरावरील विश्वासात वाढ होईल.

तुळ: शुभ रंग :जांभळा, शुभ दिशा: उत्तर
निंदा करण्यापासून दूर रहा. कामकाजात निर्माण झालेल्या अडचणीमुळे निराश रहाल. घरातील सदस्यांशी वाद होण्याचा संभव आहे. हाती कमी पैसा असल्याने आपले काम अपूर्ण राहण्याची शक्यता आहे.

वृश्चिक: शुभ रंग: निळा, शुभ दिशा:पश्चिम
आपल्या कामाची लोक स्तुती करतील. विचारपूर्वक काम केल्यामुळे कामकाजाची स्थिती भक्कम होईल. अहारावर नियंत्रण असू द्या. सार्वजनिक कामात यश मिळेल.

धनु: शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: उत्तर
रोजगारामध्ये बदल किवा नवीन संधी मिळतील. प्रत्येक कामात आपल्याला यश मिळेल. जीवनसाथीच्या भावनेकडे दुर्लक्ष करू नका.

मकर :शुभ रंग: पांढरा : शुभ दिशा: पश्चिम
योजनेनुसार काम केल्यास फायदा होईल. आई वडिलांशी असलेले संबध दृढ होतील. व्यापारा स्पष्टपणा राखा. व्यापार नौकरीत इच्छेप्रमाणे उन्नती होईल. वाचनाची गोडी वाढणार आहे.

कुंभ: शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: दक्षिण
आर्थिक तंगी वाढल्याने व कौटुंबिक अडचणीमुळे मानसिक स्थिती चांगली राहणार नाही. आपल्या योग्यतेचे मूल्यमापन होणार नाही. व्यक्तिगत समस्या निर्माण होईल.

मीन :शुभ रंग: लाल, शुभ दिशा: दक्षिण
प्रसन्न वातावरण असल्यामुळे आपण केलेले प्रयत्न यशस्वी राहतील. चोरी किंवा नुकसान होण्याची शक्यता आहे. कौटुंबिक वातावरण आनंदमय राहील. व्यापारात घेतलेले निर्णय फायदेशीर असणार आहेत.

२५ नोव्हेंबरला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर चंद्र, बुध, नेपच्यून व गुरूचा प्रभाव आहे. तुम्ही संवेदनाक्षम आहात. परिस्थितीच्या चढउताराचा परिणाम तुमच्यावर जास्त होतो. तुमची भावनिक आंदोलने सतत चालू असतात. वास्तपेक्षा कल्पनासृष्टीत तुम्ही जास्त रमता. त्यामुळे साहित्य, कलाक्षेत्रात तुम्ही नवनिर्मिती करू शकता. तुमच्याकडे असाधारण प्रतिभा आहे. जीवनात जे गूढ, अतर्क्य आहे त्याबद्दल तुम्हाला आकर्षण वाटते. ते ज्ञानाच्या कक्षेत आणण्यासाठी परलोकविद्या, ज्योतिष इ.चा अभ्यास करता. अपयशाने खचून जाऊ नका. औदासीन्य आल्यास नदीकिनारी समुद्रकिनारी जा. आत्मपरीक्षण करा. तुमचा उत्साह, उमेद परत मिळाल्याचा प्रत्यय येईल. मद्यपान, मादक द्रव्ये यामुळे निद्रानाश, मनोविकार उद्भवतील. व्यसनी मित्र टाळा. ध्यानधारणा नियमित करा.

कार्यक्षेत्र : कुणाच्याही मनोभूमिकेत प्रवेश करण्याच्या क्षमतेमुळे अभिनयकलेत वरचा पल्ला गाठाल. व्यक्तिंवैशिष्ट्यांचे रेखाटन करण्याची कला नाटक, चित्रपट, दूरदर्शनसाठी लेखन करण्यास उपयुक्त ठरेल. मानसशास्त्राचा अभ्यास करून मनोविकारांची चिकित्सा करणारे मानसोपचार तज्ज्ञ वा कुटुंबकल्याण सल्लागार म्हणून काम करू शकाल. शीतपेये, पाणीपुरवठा, जहाजबांधणी इ. अनुकूल आहेत.

प्रणयी जीवन : स्वप्नाळू वृत्तीत रमण्यामुळे प्रियकराच्या स्वभावाबद्दलचा तुमचा अंदाज बऱ्याच वेळा चुकू शकतो. निवडीच्या वेळा इतरांचाही सल्ला घ्या. तुमच्या भावनांची जपणूक करणारा, तुमच्या मनोव्यथा समजून घेणारा जोडीदार तुम्हाला हवा असतो. मनाने कठोर व्यक्ती आवडत नाहीत. जून २१ ते जुलै २० दरम्यानच्या व्यक्तींशी सूर जुळेल.

वर्षफळ : जुन्या सहकाऱ्यांच्या कारवायांमुळे मनस्ताप होईल. जागा जमिनीच्या हस्तांतरणाची शक्यता आहे. डिसेंबर जानेवारी मध्ये कार्यक्षमता उंचावल्याबद्दल गौरव होईल. मार्च एप्रिल मध्ये नव्या योजनातून पैसा हाती येईल. मे जून मध्ये मित्रांचे गैरसमज दूर करण्यात वेळ जाईल. जुलै ऑगस्ट मध्ये सहचराचा सल्ला वेळोवेळी उपयुक्त ठरेल. सप्टेंबर ऑक्टोबर मध्ये प्रकृती सांभाळा. किडनीचे विकार होतील.

महत्वाचे वर्ष : ७, १६, २५, ३४, ४३, ५२, ६१, ७०.

भाग्यरत्न : लसण्या

याच तारेखेची व्यक्ती :
साधु वासवानी,
रा. रं. बोराडे, इम्रान खान

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे**, संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे ईमेल** : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-

# शाहरुख खानसोबत १००० कोटींची कमाई

मुंबई –चित्रपटांमध्ये नफा आणि तोटा दोन्ही सामान्य असतात. तथापि, सेलिब्रेटींच्या इमेजवर त्याचा महत्त्वपूर्ण प्रभाव पडतो. 'सिंघम अगेन' मधील अजय देवगणच्या चित्रपटाची कथा मजबूत करण्यासाठी, रोहित शेट्टीने अक्षय कुमार, दीपिका पादुकोण, रणवीर सिंग आणि टायगर श्रॉफ यांचे कॅमिओ देखील जोडले. तथापि, रोहित शेट्टीने कॅमिओमध्येही सर्व स्टार्सना भरपूर जागा दिली आहे. पण 'सिंघम अगेन' मधून ज्याचे सर्वात जास्त नुकसान झाले आहे, ती दुसरी कोणी नसून शक्ती शेट्टी म्हणजेच दीपिका पादुकोण आहे.

'सिंघम अगेन'मध्ये शक्ती शेट्टीच्या उपस्थितीचा अर्थ असा होता की आता रोहित शेट्टी एक वेगळा चित्रपट घेऊन येणार आहे, जो पूर्णपणे दीपिका पादुकोणच्या व्यक्तिरेखेवर आधारित असेल. त्याच्या चित्रपटात ॲक्शनसोबतच कथाही असेल, पण सध्या या फक्त चर्चा आहेत. आता तुम्ही विचार करत असाल की 'सिंघम अगेन'मुळे दीपिका पादुकोणचे काय नुकसान झाले असेल? 'सिंघम अगेन'मधील तिच्या कॅमिओसाठी दीपिकाला खूप ट्रोलिंगला सामोरे जावे लागले, असे उत्तर आहे.

चित्रपटाच्या ट्रेलरमध्ये आधीच दाखवलेली दीपिकाची ॲक्शन 'सिंघम अगेन'मध्ये दिसली होती. म्हणजेच दीपिकाने या चित्रपटात विशेष काही केलेले नाही. तिने कारसोबत स्टंट करताना दीपिकाचा चेहराही दाखवला नाही. मात्र, दीपिकाचे सर्व ॲक्शन सीन्स तिच्या बॉडी डबलने केले आहेत.

या चित्रपटासाठी दीपिकाने तिच्या कॅमिओसाठी ६ कोटी रुपये घेतल्याचे बोलले जात आहे. त्याचबरोबर चित्रपटाचीही फारशी कमाई होताना दिसत नाही.

याआधी दीपिका पादुकोणने शाहरुख खानच्या 'जवान' चित्रपटात कॅमिओ केला होता, तेव्हा तिची चांदी झाली होती. एकीकडे तिला तिचा दुसरा १००० कोटींचा चित्रपट मिळाला, तर दुसरीकडे तिच्या व्यक्तिरेखेला खूप पसंती मिळाली.

दीपिकाच्या छोट्याशा भूमिकेमुळे लोक खूप काही जोडू शकले. तिच्या या कामाबद्दल तिला खूप प्रशंसाही मिळाली. पण 'सिंघम अगेन'ची गोष्ट उलटी दिसतेय. दीपिकाचा कॅमिओ आवडला नाही किंवा तिच्या व्यक्तिरेखेवर हा चित्रपट बनत असल्याबद्दल चाहत्यांमध्ये विशेष उत्सुकता आहे. अशा परिस्थितीत बॅक–टू–बॅक १०००–१००० कोटींचे ३–३ चित्रपट देणाऱ्या दीपिका पादुकोणला 'सिंघम अगेन'मध्ये कॅमिओ करून तोटा सहन करावा लागला आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

# ट्रम्प यांचा विजय आणि भारताचे हित



अमेरिकेच्या अध्यक्षपदी डोनाल्ड ट्रम्प निवडून आल्यामुळे भारतासाठी आयात–निर्यात व्यवहार नुकसानदायी होऊ शकतो. ट्रम्प यांनी स्थलांतरितांविरोधात कडक धोरण राबवण्याचा इशारा दिला होता. त्यांनी मोदींना अनेक वेळा मित्र म्हटले आहे; पण ते भारताच्या धोरणांवर कठोर टीका करतात, हेही वास्तव आहे. ट्रम्प यांच्या विजयामुळे त्यांची आर्थिक धोरणे अमेरिका फर्स्ट'वर केंद्रित असतील, असे मानले जात आहे.

जगभर सध्या उजव्या विचारांच्या नेत्यांची चलती आहे. अमेरिकेच्या अध्यक्षपदी निवडून आलेले डोनाल्ड ट्रम्पही उजव्या विचारांचे आहेत. सर्वच स्विंग स्टेट्स'मध्ये त्यांनी चांगली आघाडी घेतली. पाऊस आणि डेमोक्रॅट्स यांचे नाही म्हटले, तरी वाकडेच असते. मोठ्या तीन स्विंग राज्यांमधील पाऊसही ट्रम्प यांच्या पथ्यावर पडला आहे.

ट्रम्प हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मित्र आहेत. दोघांची विचारधारा एकच असली, तरी राष्ट्रहिताचा मुद्दा पुढे येतो, तेव्हा मैत्री मागे पडते. पूर्वी भारतीय वस्तूंवर आयात कर लादून ट्रम्प यांनी ते सिद्ध केले होते. आयात–निर्यात व्यवहारात भारताचा अमेरिकेशी असलेला व्यापार फायद्याचा आहे. त्यामुळे या व्यापारात अडचणी आल्या, तर ते भारतासाठी नुकसानीचे आहे. ट्रम्प यांनी प्रचारकाळातच देशातील उत्पादनांना प्राधान्य देण्याचे आणि स्थलांतरितांविरोधात कडक धोरण राबवण्याचा इशारा दिला होता. त्यामुळे त्यांचे निवडून येणे हे भारतासाठी फारसे चांगले नाही. जागतिक बाजारांबरोबरच भारतीय शेअर बाजारानेही ट्रम्प यांच्या विजयाचे स्वागत केले असले, तरी हा तात्कालिक परिणाम आहे. दीर्घकालीन विचार करता बाजारातही स्विंग मूड' येऊ शकतो.

## आयात महाग होणार

ट्रम्प यांनी आपल्या पहिल्या कार्यकाळात अमेरिकन उद्योगांना संरक्षण देण्याचे धोरण स्वीकारले होते. त्यांनी चीन आणि भारतासह अनेक देशांमधून होणाऱ्या आयातीवर जबरदस्त शुल्क लादले होते. आताही ते अमेरिकन वस्तू आणि सेवांच्या आयातीवर उच्च शुल्क आकारणाऱ्या देशांवर कारवाई करू शकतात. भारतही त्याच्या प्रभावाखाली येऊ शकतो. ट्रम्प यांच्या मते भारत व्यावसायिक नियमांचे मोठ्या प्रमाणात उल्लंघन करतो. भारताने अमेरिकन वस्तूंवर जादा शुल्क लादलेले त्यांना आवडत नाही. ट्रम्प यांना त्यांच्या देशातून आयात केलेल्या वस्तूंवर केवळ वीस टक्के शुल्क आकारणे अपेक्षित आहे. त्यांचे आयात शुल्काचे नियम लागू झाले तर भारताचा जीडीपी २०२८ पर्यंत ०.१ टयांनी घसरेल. भारत आणि अमेरिका यांच्यात २०० अब्ज डॉलर्सचा व्यापार आहे. ट्रम्प यांनी दर वाढवल्यास भारताचे मोठे नुकसान होऊ शकते. त्यांच्या व्यापार धोरणांमुळे भारताची आयात महाग होऊ शकते. त्यामुळे महागाईचा दर वाढेल आणि व्याजदर फार कमी करणे शय होणार नाही. यामुळे ग्राहकांच्या, विशेषत: मध्यमवर्गीयांच्या अडचणी वाढू शकतात, कारण त्यांचा ईएमआय' वाढू शकतो.

ट्रम्प हे चीनचे कट्टर विरोधक मानले जातात. त्यांच्या पहिल्या कार्यकाळात अमेरिका आणि चीनमधील संबंध खूपच बिघडले होते. यामुळे भारत आणि अमेरिका यांच्यातील संरक्षण संबंध मात्र अधिक दृढ होऊ शकतात. आपल्या पहिल्या कार्यकाळात, ते वाड' मजबूत करण्यासाठी सक्रिय असल्याचे दिसून आले. क्वाड' ही आशिया–प्रशांत महासागर प्रदेशातील अमेरिका, ऑस्ट्रेलिया, भारत आणि जपान यांची संघटना आहे. ट्रम्प अध्यक्ष झाल्यामुळे शस्त्रास्त्र निर्यात, संयुक्त लष्करी सराव आणि भारतासोबत तंत्रज्ञान हस्तांतर यामध्ये दोन्ही देशांमध्ये अधिक चांगला समन्वय दिसून येईल.

## भारतीयांच्या संधी जातील

लाखो भारतीय एच–१बी व्हिसा घेऊन अमेरिकेत काम करतात. हे लोक व्हिसाची संख्या वाढवण्याची मागणी करत आहेत. ट्रम्प यांच्या धोरणांमुळे स्थलांतरितांसाठी खूप अडचणी निर्माण होऊ शकतात. ट्रम्प यांना अवैध स्थलांतरितांना अमेरिकेतून परत पाठवायचे आहे. ते म्हणतात की अवैध स्थलांतरित अमेरिकन लोकांच्या नोकऱ्या खातात. अमेरिकेतील तंत्रज्ञान क्षेत्रात मोठ्या संख्येने भारतीय काम करतात आणि ते तिथे एच–१बी व्हिसावर जातात. ट्रम्प यांनी आपल्या पहिल्या कार्यकाळात एच–१ बी व्हिसाच्या नियमांबाबत कठोरपणा दाखवला होता. त्याचा परिणाम भारतीय व्यावसायिक आणि तंत्रज्ञान कंपन्यांवर दिसून आला. हे धोरण कायम राहिल्यास अमेरिकेत भारतीयांसाठी नोकरीच्या संधी कमी होतील.

कठोर स्थलांतरविषयक धोरण भारतीय तंत्रज्ञान कंपन्यांना अमेरिका सोडून इतर देशांमध्ये गुंतवणूक करण्यास प्रोत्साहित करू शकते. ट्रम्प यांच्या राजवटीप्रसंगीचे जपान आणि दक्षिण कोरियामधील तणावाचे संबंध लक्षात घेतल्यास त्यांच्यावर फार विसंबणे धोयाचे आहे. ते चीनविरुद्ध तैवानचे रक्षण करतील, की नाही हे देखील स्पष्ट नाही. अशा वृत्तीमुळे अमेरिकेची आशियातील आघाडी कमकुवत होईल. यामुळे चीनची स्थिती मजबूत होईल. ते भारताच्या हिताचे नाही. काश्मीरच्या मुद्द्यावर त्यांनी भारत आणि पाकिस्तान यांच्यात मध्यस्थीचा प्रस्तावही ठेवला होता. तो भारताला आवडला नव्हता. ट्रम्प यांनी तालिबानशी करार केला आणि अमेरिकन सैन्य अफगाणिस्तमधून मागे घेतले. अमेरिकेचे हे पाऊल दक्षिण आशियातील भारताच्या हिताच्या विरोधात गेले. बांगलादेशाच्या प्रश्नावर ट्रम्प यांनी उघडपणे भारताचे समर्थन केले आहे. त्यांनी बांगलादेशामधील अल्पसंख्याकांच्या सुरक्षेबाबत प्रश्न उपस्थित केले होते.

## युद्धविराम शक्य

पाकिस्तान हा चीनचा मित्र आहे आणि अमेरिका आता अफगाणिस्तानला आपल्या रणनीतीचा भाग मानत नाही. कारण तिथे तालिबान आहे. ट्रम्प रशिया आणि भारत यांच्यातील संबंधांबाबत अधिक उदार होऊ शकतात; पण भारतासोबतच्या व्यापार आणि शुल्काच्या मुद्द्यावर ते कठोर भूमिका घेऊ शकतात. ट्रम्प नवीन युद्ध सुरू करणार नाहीत. त्यांनी अफगाणिस्तानमधून आपल्या सैनिकांना माघारी बोलावले. ट्रम्प यांचे पुतीन यांच्यांशी चांगले संबंध आहेत. युक्रेनमधील युद्धाला अमेरिकाही तेवढीच जबाबदार आहे. आता ट्रम्प हे युद्ध संपवतील,इस्रायललाही ते युद्धविराम करण्यास भाग पाडतील अशी आशा आहे.

ट्रम्प यांच्या विजयामुळे होणारे भारताचे पहिले मोठे नुकसान म्हणजे महागाईमध्ये होऊ शकणारी वाढ. ट्रम्प यांची धोरणे महागाई वाढवणारी असू शकतात. व्याजदर वाढू शकतात आणि भारतीय कंपन्यांसाठी आयात खर्च वाढू शकतात. विशेषतः यंत्रसामग्रीसाठी अमेरिकेवर अवलंबून असलेल्या कंपन्यांच्या खर्चात वाढ होऊ शकते. ट्रम्प यांच्या विजयामुळे डॉलर मजबूत झाल्यास भारताला आयातीवर अधिक खर्च करावा लागेल. भारताची निर्यात आयातीच्या तुलनेत कमी असल्याने डॉलर मजबूत होतो, तसतसे भांडवल अमेरिकेत जाते. त्यामुळे जागतिक गुंतवणूकदारांसाठी चलन अधिक आकर्षक बनते. यामुळे रुपयासह उदयोन्मुख बाजारातील चलनांवर दबाव येईल.

गुंतवणूकदारांनी भांडवल काढून घेतल्यास भारतात अवमूल्यन होऊ शकते. मजबूत डॉलरमुळे आयात, विशेषतः खनिज तेल आणखी महाग होईल. त्यामुळे भारतात महागाई वाढेल. ट्रम्प यांच्या धोरणांबद्दलची अनिश्चितता जागतिक आणि भारतीय बाजारांमध्ये दीर्घकालीन अस्थिरता आणू शकते. ट्रम्प यांच्या मागील कार्यकाळात भारतीय समभागांपेक्षा अमेरिकन शेअर बाजाराच्या कामगिरीला प्राधान्य दिले होते. त्यांच्या पहिल्या टर्ममध्ये नॅसडॅक'ने निफ्टी'पेक्षा खूप चांगली कामगिरी केली. निफ्टी'च्या ३८ टयांच्या परताव्याच्या तुलनेत नॅसडॅक' ने ७७ टयांची उल्लेखनीय वाढ नोंदवली होती. ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळात एच–१ बी व्हिसा कार्यक्रमावर अंकुश ठेवण्याच्या प्रयत्नांमुळे एच–१बी कामगारांचा व्हिसा नाकारण्यात वाढ झाली, प्रक्रिया शुल्कात वाढ झाली आणि महागाई वाढली. त्यामुळे भारतीय आयटी सेवा क्षेत्रात त्यांच्या अवलंबित्वामुळे घट झाली; मात्र यावेळी परिस्थिती वेगळी असू शकते. भारतीय आयटी कंपन्या स्थानिक कामगार वाढवत आहेत आणि आता अमेरिकन कर्मचाऱ्यांचा एक मोठा भाग स्थानिक किंवा ग्रीन कार्डधारक असल्यामुळे संभाव्य इमिग्रेशन धोरणांपासून अधिक संरक्षित आहे. त्यामुळे सेवा वितरण आणि मार्जिनवर होणारा परिणाम कमी होतो. ट्रम्प प्रशासनाने अमेरिका केंद्रित व्यापार धोरणांना प्राधान्य दिल्यास भारतावर व्यापारातील अडथळे कमी करण्यासाठी किंवा टॅरिफ'ला तोंड देण्यासाठी दबाव येऊ शकतो. आयटी, फार्मास्युटिकल्स आणि कापड यासारखी अमेरिकेच्या निर्यातीवर जास्त अवलंबून असलेली भारतीय क्षेत्रे सर्वाधिक प्रभावित होऊ शकतात. तथापि, पुरवठा साखळी हस्तांतरित करण्यासाठी अमेरिकन कंपन्यांना प्रोत्साहन देऊन चीनवरील अवलंबित्व कमी करण्याच्या ट्रम्प यांच्या प्रयत्नांचा भारताला फायदा होऊ शकतो. –प्रा. डॉ. विजयकुमार पोटे

# प्रेमाचा संदेश देणारे – संत कनकदास

विचारधन : प्रा. डॉ. प्राची गडकरी
संत साहित्याच्या अभ्यासक

मुल होण्यासाठी नवससायस करणं, गंडे दोरे बांधण, उपासतापास करणं हे जुन्या काळात अगदी सामान्य गोष्ट होती. डॉटरी उपायापेक्षा लोकांचा अंधश्रद्धेवरच जास्त विश्वास होता. असाच एक मुलं होण्यासाठी नवस बच्चमा नावाच्या बाईंनी आदीकेशवाकडे केला. नवसात त्या म्हणाल्या की मला मुलगा झाला तर हे आदीकेशवा तो मुलगा मी तुला देईन.

पुढे नवसा सायासाने झालेल्या आपल्या मुलाला बच्चम्मांनी सैन्यात भरती केले. अशातच त्यांच्या मुलावर एकदा शत्रूने प्रहार केला. युध्दात त्यांचा मुलगा प्रचंड जखमी झाला. त्यावेळी दोन तीन वेळा त्या मुलाच्या अंगावरुन कोणीतरी हात फिरवल्याचा मुलाला भास झाला. जणू परमेश्वराने जीवदान देऊन आपले रक्षण केले, असे मुलाला वाटू लागले. मुलाने ही गोष्ट आपल्या आईला म्हणजे बच्चमांना सांगितली, तेव्हा बच्चम्मा म्हणाल्या तू तर देवाचा प्रसाद आहेत. कारण तुझ्यासाठी मी देवाला नवस केला होता की जर मला मुलगा झाला तर तो मुलगा मी देवा तुझ्या चरणी अर्पण करेन. पण तुझ्या जन्मा नंतर तुझ्या वडिलांच्या अकस्मात मृत्यूने मी तुला देवा चरणी वाहिलेच नाही. कारण तुझ्या शिवाय मला आता कोणाचाच आधार नव्हता. आदिकेशव खूप मायाळू आहे. तू त्या केशवाचा प्रसाद असल्याने त्यानेच तुला तारले. हे ऐकताच मुलाची वृत्ती पार पालटून गेली. आपल्या आईने आदिकेशवाला फसवल असे त्याला वाटू लागले. आपल्या मृत शरीरात तीन वेळा आदिकेशवाने प्राण टाकून आपल्याला वाचवले. आपण आदिकेशवाला फसवले पण त्या केशवाने आपले काम चोख केले. असे समजून त्या मुलाने त्या क्षणी ऐहिक संसाराचा त्याग केला आणि आपले संपूर्ण जीवन आदि केशवाच्या चरणी वाहिले. त्याच मुलला पुढे जाऊन संपूर्ण भारत थोर संत म्हणून ओळखू लागला. ती थोर संत विभूती म्हणजेच संत कनकदास!



आपल्या जीवावर केवळ आदिकेशवचा अधिकार आहे. असे समजून सैन्यातील नोकरी सोडून, सर्व भौतिक सुखांचा त्याग करून कनकदास आदि केशवाच्या शोधात निघाले. उडपी येथील एका मठातील व्यासराय नावाच्या संन्यासाने कनकदासांना अनुग्रह दिला. पुढे ते उडपी येथे स्थायिक झाले. कनकदासांचे गुरू उडपी मठाचे अधिपती होते. त्यांचा कनकदासांवर फार जीव! पुजा झाली की पहिला प्रसाद ते कनकदासांना द्यायचे. कनकदास अंत्यज जातीचे असल्याने इतर अनुयायी त्यांचा फार राग करायचे. पहिला प्रसाद कनकदासांना दिलेला त्यांना आवडत नसे. सगळी मुलं त्यांच्या आणि गुरूजींचाही राग करू लागले.


एकदा गुरूजींनी ठरवलं की कनकाची भक्ती किती श्रेष्ठ आहे ते सगळ्यांना दाखवून द्यायचे. गुरूजींनी सगळ्या विद्यार्थ्यांना एकदा जवळ बोलावले आणि प्रत्येकाच्या हातावर एक केळे प्रसाद म्हणून ठेवले. गुरूजी विद्यार्थ्यांना म्हणाले बाळांनो हा प्रसाद अशा ठिकाणी जाऊन खा जिथे तुम्हाला कोणीच पाहू शकत नाही. गुरूजींनी कनकदासांच्या हातावरही एक केळे प्रसाद म्हणून ठेवले. सगळी मुलं क्षणात दूर गेली. कोणी डोंगरावर जाऊन केळ खाल्ले. कोणी तळ्याकाठी खाल्ले. कोणी माजघरात कोणी अडगळीत तर कोणी झाडावर चढून केळे खाल्ले. थोड्यावेळाने सगळी मुलं अभ्यासाच्या खोलीत जमली. गुरूजी आले. मुलांनी सांगितले की आम्ही केळ खाल्लं तेव्हा कोणीच आम्हेला पाहिले नाही. तेव्हा गुरूजींनी कनकदासांना विचारले तू खाल्ला का प्रसाद? तेव्हा कनकदास म्हणाले नाही. कारण आपली अट होती की कोणी पहाणार नाही अशा ठिकाणी प्रसाद खा! परंतु मी ज्या ठिकाणी गेलो तिथे प्रभूचा वास होता. हे जग संपूर्ण प्रभूने व्यापले आहे. सर्वबाजूने देव माझ्याकडे पहात होता. त्यामुळे मी प्रसाद खाऊ शकलो नाही. तेव्हा सगळी मुलं खजिल झाली.

मुल कनकदासांच्या भक्तीत खोट शोधत होते. पण कनकदास मात्र दिवसेंदिवस आपल्या असीम भक्तीने केशवाच्या हृदयात स्थान घेत होते. एकदा कनकदास कृष्णलीला गात होते. इतयात एक शिष्य कनकदासांना म्हणाला तू तर अंत्यज आहे. तू काय देवा समोर बसतोस?. तू देवळाच्या पाठी जाऊन भक्ती कर! तशीही तुझी भक्ती देवाला नकोय. कनकदास उठले आणि देवळाच्या पाठी, दक्षिणेकडे जाऊन देवाची स्तुती गात बसले. थोड्या वेळाने मंदिरात गुरुजी आले. त्यांनी पाहिले तर कृष्णाच्या मुर्तीची मान नव्वद अंशाच्या कोनात दक्षिणेकडे वळली होती. तेव्हा गुरूजींनी विद्यार्थ्यांना बोलावून मुर्ती अशी कोणी केली विचारले. तेव्हा विद्यार्थी म्हणाले जिथे कनक भजन म्हणतोय तिथे मुर्तीची मान आपोआप वळतेय. तेव्हा गुरूजींनी धावत जाऊन कनकदासांना मिठी मारली आणि त्यांना देवळाच्या आत घेतले तेव्हा आपोआप मुर्ती पुन्हा सरळ झाली.

उडपीमध्ये आजही कनकाची कुटी कृष्ण मंदिराच्या पाठीमागे पहावयास मिळते. त्या प्रमाणे देवळाच्या दारातून कृष्ण दर्शन होते नाही. कुटी समोरच्या भिंतीला चार भोके ठेवलेली आहेत. तेथूनच कृष्ण दर्शन होते. ह्यावरूनच कनकदासाची भक्ती आणि अध्यात्मिक अधिकार किती थोर होता हे कळते. मेंढ्या राखणारे कनकदास आपल्या सगळ्या भक्ती भावाना मेंढ्यांना सांगत असे. त्यामुळे मेंढ्या सुध्दा सतत त्यांच्या पायात घुटमळत असत. देव सर्वत्र असून तो मुया प्राण्यांत सुध्दा आहे. हे सांगताना ते मेंढ्या कशा प्रेमळ आहेत हे वारंवार लोकांना समजावून सांगत. अखंड महाभारतातील गोष्टी सांगत भक्ती करणाऱ्या कनकदासांच्या हातात एकदा एकाने मासा पाहिला आणि गुरूजींना सांगीतले हा मासा घेऊन चालला आहे. गुरूजींनी विचारले तुझ्या हातात काय आहे कनक? मासा आहे का?

कनकदास म्हणाले नाही महाभारत आहे. गुरूजी म्हणाले मग हा रस कसाला पडतोय हातातून.? कनकदास म्हणाले महाभारताचा रस आहे हा. गुरूजींनी पाहिले तर खरंच हातात महाभारत ग्रंथ होता आणि तो रस म्हणजे महाभारताचे सारं होते जणू की द्वेषाने व्देष वाढतो आणि प्रेमाने प्रेम वाढते. त्यामळे आपल्या प्रत्येक ग्रंथात सगळ्यांवर केवळ प्रेम करा हा एक मोठा संदेश जगाला देणारे संत कनकदास हे भारताचे भुषण आहेत. कनकदासांचे गुरूजी म्हणायचे कनक म्हणजे सोने! पण एकवेळ सोने अशुद्ध निघेलय; परंतु कनकदासांचा प्रत्येक विचार हा केवळ शुद्धच आहे. त्या विचारांना ठायीठायी भक्तीने दिलेला डाग तुम्हाला दिसेल. त्यामुळे कनकदासांचे विचार हे शुद्ध सोन्यापेक्षाही अधिक किंमतीचे आहेत.

# यशवंत महाशब्दकोडे



आडवे शब्द
१. व्याकूळ, घाबरलेला
५. असामान्य
८. पान (सं.)
९. दृष्ट
१०. 'पुरी'चे दैवत
१२. मोठा नगारा
१३. नवरदेव
१४. व्याख्यान
१५. रेशमचा किडा
१६. अंदाज, तर्क
१८. राबता, जाणे–येणे
२०. प्रमाणपत्र
२२. मच्छर
२४. स्वाभिमानी स्त्री
२५. पल्लवीने रेणुका शहाणेच्या चित्रपटात साकारलेली भूमिका
२७. धमकी, श्वास
३०. व्यवस्थित
३२. अखबार
३३. कासंडी, दुधाची घागर
३४. हाताचा एक अवयव
३६. व्यवस्था
३८. ऋण, व्याजाने घेतलेली रक्कम
४०. जहाजांचा मुक्काम
४१. फळातील द्रव
४२. हाताने सूत काढून हातमागावर विणलेले कापड
४३. पंगत
४५. दरोडा
४७. अपशकुन
५०. नकला करणारा
५२. हिशोबाची एक बाजू
५४. यात्रेत नियमित जाणारा
५६. दुधाच्या वड्या
५८. शेजारी शेजारी
६०. झकास
६१. एक मंगलवाद्य
६३. निवासस्थान
६४. समोरसमोरची चकमक
६५. पूर्णपणे
६७. एक सुगंधी वनस्पती
६८. समुद्र
७०. रमणीय
७१. असुर, दानव, देवांचा शत्रू
७२. गाजावाजा
७३. किंमत, पैसा
७४. विशेष
७५. चंद्र
७६. निकट, जवळ
७८. भूकंप
८०. मलई
८१. फरक
८२. घराणे
८३. रंग बदलणारा प्राणी

उभे शब्द
१. यजमानीण
२. पहारेकरी
३. कलंक
४. सुकुमार
५. न थांबता
६. धैर्य
७. दारूचा एक प्रकार
८. उद्याच्या नंतरचा दिवस
११. गर्दीचा विळखा
१३. भावाची पत्नी
१५. कृत्रिम शीतपे (इंग्रजी) उन्हाळ्यात या कंपन्यांमध्ये शीतयुद्ध रंगते!
१७. धार्मिक पर्यटन
१८. महिला, बाई
१९. प्रफुल्लित
२१. पटपट, वेळ न दवडता
२३. मानसिक धक्का (हिंदी)
२६. वस्तूचा छोटा तुकडा
२८. समोरच्याच्या मनातील विचार आ–ेळखणारा
२९. वार्ताहर
३०. पाणी
३१. आई–वडील
३३. सूत काढण्याचे एक साधन
३५. आरोळी, ललकारी
३७. जिव्हा
३९. मळलेले
४०. आपला नसलेला
४४. अरण्य
४६. अंजन
४८. चेष्टेखोर
४९. न वापरलेली, नवी
५१. दुलई
५३. चौसोपी वाड्यातील मधली खोली
५५. लेखणी
५६. भिऊन पळ काढणारा
५७. भटकणारा
५९. आशीर्वाद
६१. माळ, हार
६२. नुकतेच आगमन झालेला, नवखा
६४. तुलनेतील सारखेपणा
६५. अनुत्तीर्ण
६७. चर्चा
६८. लाकडाची उत्कृष्ट जात
६९. रानरेडा
७०. सुंदर तरुणी
७३. दरवाजा
७४. मृत्तिकापात्र
७५. सुविधा
७७. मगज
७८. द्रव्य
७९. बीजगणितात आढळणारा श्रीकृष्णाचा मामा

कोडे क्र.६ चे उत्तर

आडवे उत्तर
१.कावराबावरा ५.असाधारण ८.पर्ण ९.खट १०.जगन्नाथ १२.डम १३.वर १४.भाषण १५.कोसरा १६.कयास १८.वहिवाट २०.दाखला २२.डास २४.मानिनी २५.रटरट २४.दम ३०.नीट ३२.वर्तमानपत्र ३३.चरवी ३४.मनगट ३६.कारभार ३८.कर्ज ४०.पडाव ४१.रस ४२.खादी ४३.भोजनावळ ४५.डाका ४७.नाट ५०.नकलाकार ५२.जमा ५४.वारकरी ५६.पनीर ५८.जवळजवळ ६०.मस्त ६१.सनई ६३.घर ६४.सामना ६६.पुरता ६७.मरवा ६८.सागर ७०.रम्य ७१.राक्षस ७२.गवगवा ७३.दाम ७४.खास ७५.सोम ७६.लगत ७८.धरणीकंप ८०.साय ८१.अंतर ८२.खानदान ८३.सरडा

उभे उत्तर–१.कारभारीण २.राखणदार ३.बाट ४.राजस ५.अथक ६.धाडस ७.रम ८.परवा ११.गारडा १३.वहिनी १५.कोलार १७.यात्रा १८.वनिता १९.टवटवीत २१.खटपट २३.सदमा २६.टवका २८.मनकवडा २९.पत्रकार ३०.नीर ३१.जनकजननी ३३.चरखा ३५.गर्जना ३७.रसना ३९.मळकट ४०.परका ४४.वन ४६.काजळ ४८.टवाळ ४९.कोरी ५१.रजई ५३.माजघर ५५.कलम ५६.पळपुटा ५७.रमताराम ५९.वर ६१.सर ६२.नवागत ६४.साम्य ६५.नापास ६७.मसलत ६८.सागवान ६९.गवा ७०.रमणी ७३.दार ७४.खापर ७५.सोय ७७.गर ७८.धन ७९.कंस

# मतदान जनजागृतीसाठी डॉ. शिव आयुर क्लिनिकमध्ये दोन दिवस मोफत तपासणी

## मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी युवा डॉक्टर शिवकार्तिक स्वामी यांचा स्तुत्य उपक्रम

देगलूर (प्रतिनीधी): महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुक व नांदेड लोकसभा पोटनिवडणूकीसाठी दि. २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. निवडणुकीमध्ये देगलूर विधाससभा मतदार संघात मतदानाचे प्रमाण ७५ टक्के व्हावे , यासाठी स्वीप कक्षाद्वारे विविध कार्यक्रम राबविले जात आहेत.



विशेष महत्वाची बाब म्हणजे देगलूर शहरातील सावित्रीबाई फुले हायस्कूल मध्ये एकूण तीन मतदान केंद्र आहेत व हायस्कूलच्या अगदी समोर डॉ. शिवकार्तिक शिवानंद स्वामी यांचे शिव आयुर क्लिनिक आहे. त्यामूळे डॉ. स्वामी यांना मतदार जनजागृतीच्या राष्ट्रीय कार्यात योगदान देण्याचे आवाहन तहसील कार्यालयातील स्वीप कक्षाच्या वतीने करण्यात आले व त्याला प्रतिसाद देत डॉ. स्वामी यांनी दि.२० नोव्हेंबरला जास्तीत जास्त मतदारांनी मतदान प्रक्रियेत भाग घेऊन सहयोग द्यावा असे आवाहन केले व जे मतदार मतदान करून मतदान केल्याची शाई बोटाला दाखवतील त्यांना दि. २० व २१ नोव्हेंबर असे दोन दिवस बी.पी व आरोग्य तपासणी फीसमध्ये १०० % सूट देण्यात येईल असे जाहीर केले आहे.

लोकशाहीचा पाया मजबूत व भक्कम करण्यासाठी मतदानाचे प्रमाण / टक्केवारीत वाढ होणे खूप आवश्यक आहे. त्यासाठी समाजातील डॉक्टर,वकील,पत्रकार,प्राध्यापक व इतर सर्व घटकांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. समाजातील इतर व्यापारी,उद्योगपती,वकील, डॉक्टर यांनीही डॉ. शिवकार्तिक शिवानंद स्वामी यांची प्रेरणा घेऊन मतदारांना प्रोत्साहित करावे, असे आवाहन स्वीप कक्षाच्या वतीने करण्यात आले आहे.

# वृत्तपत्रामध्ये पेडन्यूज आल्यास उमेदवारांच्या खर्चात करा जमा

## एमसीएमसी समितीला जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

नांदेड(प्रतिनीधी) :लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा निवडणुकीच्या शेवटच्या आठवड्यात बातमी आड पेडन्युजच्या माध्यमातून प्रचार होणार नाही याची काळजी घ्या. याकाळामध्ये सारख्या बातम्या आणि बातम्यांच्या आडून प्रसिद्धी सुरू असेल तर पेड न्यूज म्हणून हा खर्च उमेदवाराच्या खात्यात पकडण्यात यावा. तसेच याकाळात वृत्तपत्रांनी देखील कोणतीही बातमी पेडन्युज येणार नाही याकडे काटेकोरपणे लक्ष द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अभिजीत राऊत यांनी केले.

राजकीय जाहिरातींचे पूर्व प्रमाणिकरण, प्रिंट माध्यमात येणाऱ्या जाहिराती व मजकूर या माध्यमातून पेड न्यूज तर जात नाही याची देखरेख करण्याकरिता, जाहिराती व पेड न्यूजचा खर्चाचा अहवाल एक्सपेंडिचर (खर्च) विभागाला देण्याकरीता माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समितीचे (एमसीएमसी )असून त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी, असे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

**जाहिरात बातमीमध्ये काय नको**

आदर्श आचारसंहितेनुसार दिलेल्या निर्देशाचे जाहिरातीमध्ये पालन होणे आवश्यक आहे. या प्रामुख्याने राष्ट्रीय एकात्मतेला हानी पोहोचविणाऱ्या बाबी, धार्मिक भावना दुखावणे, भारतीय घटनेचा अवमान करणे, गुन्हा दाखल करण्यास प्रवृत्त करणे, कायदा व सुव्यवस्थेस बाधा निर्माण करणे, गुन्हेगारीचे उदात्तीकरण, महिलांचे चुकीचे चित्रण, तंबाखूजन्य किंवा नशा आणणाऱ्या पदार्थांच्या जाहिराती, हुंडा, बालविवाह यांना उत्तेजन देणाऱ्या जाहिराती प्रसारित करण्यास प्रतिबंध आहे. इतर देशावर टीका नसावी. न्यायालयाचा अवमान जाहिरातीतून होता कामा नये. राष्ट्रपती व न्याय संस्था यांच्याबाबत साशंकता नसावी. राष्ट्रीय एकात्मतेला, सौहार्दतेला आणि एकतेला बाधा पोहचविणारा मजकूर त्यामध्ये नसावा. सुरक्षा दलातील कोणतेही सैनिक, व्यक्ती, अधिकारी यांची अथवा सैन्य दलाचे छायाचित्र जाहिरातीत नसावे. कोणत्याही व्यक्तीच्या खाजगी, वैयक्तिक जीवनातील घटनांना धरुन त्यावर भाष्य नसावे.

**पेड न्यूज सारखे वृत्त नको**

निवडणुकीच्या काळात अनेक वेळा सारख्या हेडींगच्या बातम्या उमटतात. जाहिरातींच्या मोबदल्यात ही प्रेस नोट पेड न्यूज म्हणून तर छापली जात नाही ना याकडे लक्ष देण्यात येत आहे. याशिवाय बाइलाईन नसलेल्या मात्र एकाच मजकुराच्या सारख्या बातम्या सारखे हेडींग ठेवण्यात येवू नये. सर्व क्षेत्रातून उमेदवारांना पाठबळ मिळत आहे. हा उमेदवार विजयी होणार आहे, या उमेदवाराचे पारडे जड आहे, विजय दृष्टीपथात आहे अशा पध्दतीने निवडणुकी पुर्वीच कुणाला थेट समर्थन उमटणार नाही याची काळजी घेण्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे. अशी बातमी पेडन्युज ठरते व शासकीय दरानुसार याचा सर्व खर्च उमेदवाराच्या खर्चामध्ये जाणार असल्यामुळे उमेदवाराचा खर्चाचा बजेट बिघडू शकतो. या निवडणुकीमध्ये उमेदवारांना लोकसभेसाठी ९५ लक्ष रुपये तर विधानसभेसाठी ४० लक्ष रुपयांची मर्यादा आहे. त्यामुळे वृत्तपत्रात प्रचार सभा व अन्य बाबींच्या सारख्या बातम्या येणार नाही याबाबत राजकीय पक्ष तसेच वृत्तपत्रांनी दक्ष राहावे अशी सूचनाही यावेळी करण्यात आली. निवडणुकीबाबतचे सर्व वृत्त संपादकीय संस्कारातून जावेत. प्रेसनोटच्या मजकुरात व हेडिंग मध्ये संपादन करण्यात यावे. तसेच या वृत्तांतून आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची काळजी घेण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

# श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे बोधचिन्ह निवडण्यासाठी मतदान

धाराशिव दि.९ (प्रतिनिधी) - तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानकडून मंदिर संस्थांचे बोधचिन्ह (लोगो) तयार करण्यासाठी क्रिएटिव्ह डिझाईन मागवण्यात आल्या होत्या. यासाठी १९ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकाऱ्यांच्या समक्ष या बोधचिन्ह तयार करणाऱ्या व्यक्तींचे सादरीकरण होऊन ते बोधचिन्ह ( लोगो) मतदानासाठी मंदिर संस्थानच्या संकेतस्थळावर टाकण्यात आले होते. त्या बोधचिन्हावर (लोगो) मतदान करण्याचे आवाहन तहसीलदार तथा मंदिर संस्थानचे व्यवस्थापकांनी केले आहे.



श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे बोधचिन्ह (लोगो) तयार करण्यासाठी मागवण्यात आलेल्या बोधचिन्हाचे (लोगों ) सादरीकरण करण्यात आले. यावेळी उपस्थित असलेल्या व्यक्तीसोबतच संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या ईओआयनुसार २३ सप्टेंबरपर्यंत इमेलवर लोगो सादर करणारे व्यक्ती यांचे लोगो विचारात घेऊन त्यानुसार सर्व लोगो वोटींगसाठी उपलब्ध करण्यात आलेले आहेत.या सर्व लोगोंना सर्व जनतेने मतदान करावे यासाठी सर्व बोधचिन्ह (लोगो) मंदिराचे संकेतस्थळावर उपलब्ध आहेत . भाविकांनी मतदान करणेसाठी https:// shrituljabhavanitempletrust.org या संकेतस्थळावरील होमपेजवर सर्व लोगो वोटींग या लिंकवर जाऊन लोगोची पाहणी करून पसंत असलेल्या लोगोसाठी ३० नोव्हेंबरपर्यंत मतदान करावे, असे आवाहन श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे तहसिलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) यांनी केले आहे.




नांदेड : स्वीप अंतर्गत आज जिल्हा प्रशासनामार्फत शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था नांदेड येथे भव्य रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आलेली होती.स्वीपच्या नोडल अधिकारी तथा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांच्या हस्ते स्पर्धेत सहभागी महिलांना सन्मानित करण्यात आले. तसेच यावेळी त्यांनी मतदानाचे महत्व सांगितले.

# ८५ वर्षांवरील वृद्ध व दिव्यांग मतदार घरुनच करणार मतदान

धाराशिव दि.९ (प्रतिनिधी) - लोकसभा निवडणुकीप्रमाणेच विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीतही ८५ वर्षापेक्षा अधिक वय असलेले आणि दिव्यांग मतदार घरुनच मतदानाचा हक्क बजावणार आहे. तुळजापूर विधानसभा मतदारसंघातील केंद्रस्तरीय मतदान अधिकारी यांनी गृहभेटी दरम्यान ८५ वर्षापेक्षा अधिक वय असलेल्या ५८३ व ९३ दिव्यांग मतदारांनी घरातुन मतदानाचा पर्याय निवडला आहे. अशा एकूण ६७६ मतदारांचे मतदान दि. ९ व १० नोव्हेंबर या कालावधीत होणार आहे.

गृहभेटीतून होणाऱ्या मतदानाची पूर्व कल्पना ५ नोव्हेंबर २०२४ रोजी घेतलेल्या उमेदवार यांच्या बैठकीमध्ये देण्यात आली. तसेच ८ नोव्हेंबर २०२४ रोजी बैठक घेऊन सर्व उमेदवारांना याची माहिती देण्यात आली.यासाठी ३० पथक नियुक्त करण्यात आले आहे. या पथकात १ क्षेत्रिय अधिकारी, २ सहाय्यक मतदान कर्मचारी, सूक्ष्म निरीक्षक आणि एक पोलिस कर्मचारी यांचा समावेश आहे. गृहभेट मतदान पथक हे ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार प्रत्येक मतदार जिथे रहात असेल तिथे त्यांची पडताळणी करुन त्यांना मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करुन देणार आहे.तरी सर्व राजकीय पक्ष, उमेदवार व मतदार यांना आवाहन करण्यात येते की या प्रक्रियेमध्ये सहभाग घेऊन मतदान सुरळीत पार पडेल याची काळजी घ्यावी असे आवाहन तुळजापूर विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा धाराशिव उपविभागीय अधिकारी संजय डव्हळे यांनी केले आहे.

# जाण

गरिबीतून वर आलेली आणि गरिबीची जाण असलेली व्यक्ती कितीही यशस्वी झाली, तरी हाताखाली काम करणार्या कुणाशीही वागताना कायम 'माणूस' म्हणून वागते... असं म्हणतात ज्या घरात धुणीभांडी करणारी बाई अनेक वर्ष टिकते त्या घराची मालकीण माणुसकी जपणारी असते !

...यशवंतराव चव्हाण यांची एक लै मजेशीर पण हृदयस्पर्शी आठवण आहे. त्यांची आई विठाई ही कष्टकरी मजूर महिला होती. नवर्याच्या निधनानंतर अतिशय हलाखीच्या परिस्थितीत तिनं यशवंताला लहानाचं मोठं केलं. पोरानंही या कष्टाची बूज राखली. मन लावून शिकला. आधी स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग होता... नंतर थेट आमदार, मंत्री, मुख्यमंत्री ते थेट उपपंतप्रधानपदापर्यंत मजल मारली.

...बावन्न साली पहिली विधानसभा निवडणुक जिंकल्यावर मोरारजी देसाईंच्या मंत्रीमंडळात यशवंतराव नागरी पुरवठा आणि समाजकल्याण मंत्री झाले. मुंबईला रहायला आले. येताना त्यांनी आईलाही सोबत आणलं. मंत्रीपद असल्यामुळं साहेबांना चोवीस तास पोलीस संरक्षण होतं. विठाईनं एकेकाळी पोरगा स्वातंत्र्यलढ्यात असताना भुमिगत झालेले दिवस पाहिले होते. ब्रिटीश राजवटीतले पोलीस यशवंताचा शोध घेण्यासाठी घरी येऊन झडती घ्यायचे. वाट्टेल तसं बोलायचे. अपमान करायचे.

...आज आपलं पोरगं एवढं मोठं झालंय की पोलीस अधिकारी येता-जाता त्याला सलाम करतात हे बघून तिला पोराचं लै कवतिक वाटायचं. डोळे भरून हा रूबाब ती बघत रहायची.

...एक दिवस मध्यरात्री विठाबाईंना जाग आली. परत झोपच लागंना, म्हणून त्या सहज चालत बाहेरच्या दारापर्यंत आल्या. तिथं बाहेर दोन पोलीस पहारा देत होते. विठाबाई मायेने त्यांना म्हणाल्या, आरं लेकरांनू, का उगं ताटकळत उभं र्हायलाय? येसवंता कवाच झोपला. तुमीबी झोपा आता.

...पोलीसांना काय करावं कळंना. हो हो करत उभेच राहिले. विठाबाई लगबगीनं आत गेल्या. घरातल्या काहीजणांना उठवलं आणी सांगीतलं, भाईर ती लेकरं बिचारी ताटकळत उभी र्हायलीत. त्यास्नी सतरंजी, चादर, उशीबिशी न्हिऊन द्या. झोपा म्हनावं आता. घरात काहीतरी गोंधळ सुरूय हे जाणवून यशवंतराव जागे झाले. बाहेर आले. सगळा प्रकार त्यांच्या लक्षात आला. ते हसून त्या पोलिसांना म्हणाले, झोपा. आता तुम्ही झोपल्याशिवाय आमची आई झोपणार नाही. झोपा. झोपा.

...असे राजकारणी या महाराष्ट्रानं पाहिलेत भावांनो! ज्यांचा धर्म एकच होता, 'माणुसकी'. अशा नेत्यांमुळेच आपले बापजादे शांत, समाधानी, समृद्ध आयुष्य जगले. कसला गुन्हा किंवा चुना त्यांच्या नावाला चिकटला नाही. आजच्या नेत्यांनी राजकारणच नव्हे तर सर्वसामान्य माणसाचं जगणं मुश्किल केलं आहे...! अगदी किळस आणि कळस झाला आहे. बाजार भरवला आहे. स्वच्छ कार्यकर्त्यांना गुलाम व दोन नंबर वाल्यांना सलाम अशी परिस्थिती तयार केली आहे. इच्छेने स्वेच्छेने ना का होईना पण लोक नाईलाजाने तरी आपल्या मागे यावेत यासाठी राजकारणाला पैसा लागतो ही मानसिकता या लोकांनी करून ठेवलेली आहे. पण त्यांना हे कळत नाही की त्यामुळे त्यांचं स्वत:चंही आयुष्य बरबाद झालंय. रस्त्यावर एखाद्या वाहनाचा टायर फुटला तरी 'आपल्याला मारायला कुणीतरी बॉम्ब फोडला' असं समजुन, भेदरून रात्र जागवावी लागते त्यांना. यांनी कितीबी जाहिरातबाजी करून स्वत:ला वाघ ठरवू द्यात...! किंग मेकर ठरवू द्यात, विकासरत्न ठरवू द्यात किंवा आणखी काही पण यशवंतराव चव्हाणांसारखं आपल्या संरक्षणासाठी असलेल्या पोलीसांना 'झोपा' असं सांगायला निर्मळपणा, बिनधास्तपणा आणि वाघाचं काळीज लागतं गड्याहो... ते आजच्या नेत्यांकडं नाही ! मूळात अनेक चुकांमुळे , गैरकारभारामुळे त्यांच्या मनातील भितीच त्यांना सतत कावरं बावरं करत आहे.

**- सौजन्य: शरद ठोंगे पाटील**

## संकटग्रस्त बालकांच्या मदतीसाठी हेल्पलाईन नंबर १०९८ ची मदत घ्या

नांदेड (प्रतिनीधी): आपल्या आजूबाजूला जर बालकामगार, बाल भिक्षेकरी, लैंगिक अत्याचारग्रस्त बालके, हरवलेली बालके, सापडलेली बालके, सोडून दिलेली बालके, बालविवाह, संकटग्रस्त बालके आढळल्यास अशा बालकांना त्वरीत आवश्यक मदत कुठून कशी मिळवून देता येईल, याकरीता कुठे संपर्क करावा याबाबत सामान्य नागरिकांमध्ये संभ्रम असतो. यासाठी आता चाईल्ड हेल्पलाईन नंबर १०९८ कार्यान्वित करण्यात आली आहे. संकटग्रस्त बालकांना त्वरित मदतीसाठी भारत सरकारच्या महिला व बाल विकास विभागामार्फत 0 ते १८ वयोगटातील कोणत्याही प्रकारच्या अडचणी व संकटात सापडलेल्या तसेच काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या सर्व बालकांसाठी चाईल्ड हेल्पलाईन सेवा १०९८ संपूर्ण महाराष्ट्रात कार्यान्वित आहे. या सेवेअंतर्गत संकटग्रस्त बालकांना २४ तास हेल्पलाइन सेवा उपलब्ध आहे. या सेवेचा लाभ बालक स्वतः घेऊ शकतो किंवा इतर कोणीही सदर सेवेद्वारे बालकांना मदत मिळवून देऊ शकतात. या संबधी माहिती देणाऱ्या व्यक्तीचे नाव गोपनीय ठेवले जाते. याद्वारे संकटग्रस्त बालकांना मदत करण्यासाठी संबंधीतांनी १०९८ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन महिला व बालविकास विभागाचे आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, महिला व बालविकास अधिकारी श्रीमती आर. पी. रंगारी यांनी केले आहे.

# शेतकऱ्यांनी खरेदी केंद्रावर जावून नोंदणी करावी - बाजपेयी

धाराशिव दि.९ (प्रतिनिधी) - खरीप हंगाम २०२४-२५ मध्ये जिल्हयात आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत नाफेडमार्फत तालुकानिहाय १७ केंद्रावर मुग,उडीद व सोयाबीन या पिकाची ऑनलाईन शेतकरी नोंदणीस १ ऑक्टोबरपासून सुरूवात झाली आहे. शेतकऱ्यांनी आपल्या जवळच्या खरेदी केंद्रावर स्वत: जावून ऑनलाईन नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा पणन अधिकारी एम.व्ही. बाजपेयी यांनी केले आहे.

शेतकऱ्यांनी पिकांच्या नोंदणीसाठी आपले आधार कार्ड, राष्ट्रीयकृत बँकेचे छापील पासबुक (अकाउंट नंबर व आय.एफ. एस.सी. कोड स्पष्ट दिसावा), ऑनलाईन पीक पेरा असलेला ७/१२ उतारा घेवून पिकाची नोंदणी करावी.

शासनाकडून मुंग, उडीद व सोयाबीन या पिकांसाठी नोंदणी कालावधी निश्र्चित करण्यात आला आहे. यामध्ये मुंग आणि उडीद या पिकासाठी १ ऑक्टोबरपासून सुरुवात झाली आहे. तर त्यांचा खरेदी कालावधी हा १० ऑक्टोबरपासून ७ जानेवारी २०२५ पर्यंत असणार आहे. तर सोयाबीन पिकासाठी १५ ऑक्टोबरपासून खरेदीस सुरुवात झाली आहे.ही खरेदी १२ जानेवारी २०२५ पर्यंत नाफेडकडून करण्यात येणार आहे. मुग, उडीद व सोयाबीन या पिकांच्या आधारभूत किंमतीही निश्र्चित करण्यात आल्या आहेत. यामध्ये मुग पिकासाठी ८ हजार ६८२ रूपये प्रती क्विंटल, उडीद ७ हजार ४०० रूपये प्रती क्विंटल, सोयाबीन ४ हजार ८९२ रूपये प्रती क्विंटल दराने निश्र्चित करण्यात आला आहे. तसेच तालुकानिहाय खरेदी केंद्र आणि सबएजंट संस्थेची नेमणूकही करण्यात आली आहे. धाराशिव जिल्ह्यातील धाराशिव तालुका शेतकरी सह संघ लि.,धाराशिव, विकास कृषी पणन सहकारी संस्था मर्या उस्मानाबाद, वसुंधरा जिल्हा कृषी पणन व प्रक्रीया सह. संस्था कनगरा, वसुंधरा ऍग्रीकल्चर फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लि. कनगरा, तुळजापूर तालुक्यातील तुळजापूर तालुका शेतकी सहकारी खरेदी विक्री संघ, ता.तुळजापूर, श्री खंडोबा पणन सहकारी संस्था मर्या अणदूर, लोहारा तालुक्यातील जगदंबा सहकारी खरेदी विक्री संस्था लोहारा,दस्तापूर विविध सर्व सेवा सहकारी सोसायटी मर्या दस्तापूर, उमरगा तालुक्यातील गुंजोटी विविध कार्यकारी सेवा सोसायटी लि गुंजोटी, श्री स्वामी समर्थ सर्व सेवा सहकारी संस्था मर्या. गुंजोटी, कळंब तालुक्यातील एकता खरेदी विक्री सहकारी संस्था मर्या.धाराशिव, तालुका सह.शेतकरी खरेदी विक्री संघ लि.कळंब, राजमाता कृषी पुरक सेवा पुरवठा सहकारी संस्था, चोराखळी, वाशी तालुक्यातील वाशी तालुका शेतकरी सह संघ लि. वाशी तर भूम तालुक्यातील शिवाजी भूम तालुका शेतकरी सह.खरेदी विक्री संघ लि., तनुजा महिला शेतीपूरक सेवा पुरवठा सह संस्था सोन्नेवाडी भूम, कै. उत्तमराव सोन्ने कृषीमाल पुरक सह. संस्था सोन्नेवाडी या केंद्रावर आपले वरील पिके विकता येणार आहेत. शेतकऱ्यांनी शासनमान्य हमीभाव खरेदी केंद्रावर सोयाबीन शेतमाल घेवून येताना व्यवस्थितरित्या वाळवून आणावा. त्यामुळे आर्द्रता मोजताना १२ टक्यापेक्षा कमी असणे आवश्यक आहे. जास्त आर्द्रतेमुळे शेतमाल परत नेण्याची वेळ येणार नसल्याचे बाजपेयी यांनी सांगितले.










**उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर**

उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर

फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|

| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया |
|---|---|

मराठवाडयात एक अद्यावत नेत्र रुग्णालय

भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड)<br>डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार<br>४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!

अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ | डॉ.अंकिता लाहोटी (DOMS) | डॉ. दिपाली पाटील (MS)

डॉ. शितल पेद्देवाड (M.S.) | डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष | व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर | लॉ. प्रदिप बेंद्रे सचिव

पान १ वरून

## आमच्या योजनांची...

शान वाढविण्याचे काम आता करायचे आहे असे सांगितले.

परभणीच्या स्थानिक आमदाराने जनतेचा भ्रमनिरास केला आहे. काहीही काम करायचे नाही परंतू श्रेय लाटण्यासाठीच पुढे यायचे असा आरोप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी परभणी येथील महायुतीच्या जाहीर सभेत बोलताना विरोधकांवर केला. तसेच परभणीला विकासाच्या वाटेवर नेऊन विकासाची पर्वणी साधण्यासाठी महायुती उमेदवाराच्या पाठीशी राहा असे आवाहनही मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी बोलताना केले. महायुती सरकारने शेतक-यांच्या वीज बिल माफी पाठोपाठ आता १० कलमी कार्यक्रमात कर्ज माफीचा निर्णय घेतला आहे. तसेच लाडक्या बहिणींच्या खात्यात दर महिन्याला २१०० रूपये जमा केले जाणार आहेत.

विरोधकांनी आमच्या कल्याणकारी योजनांबद्दल अपप्रचार चालवला. लवकर लवकर खात्यात जमा झालेले पैसे काढा नाहीतर सरकार काढून घेईल असाही खोटा प्रचार केला. परंतू आमचे सरकार देणारे आहे घेणारे नाही. कोणी कोर्टात जाऊ दे, कोणी कुठेही गेले तरी ही योजना बंद होऊ देणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सोन्याचा चमचा तोंडात घेऊन जन्मलेल्या आणि पैशांच्या राशीत लोळणा-यांना काय समजणार दीड हजाराची किंमत? असा सवाल करत त्याची किंमत केवळ लाडक्या बहिणींनाच कळते, असेही मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

यावेळी महायुतीचे उमेदवार भरोसे, ज्येष्ठ नेते वरपूडकर, माजी आ. लहाने, देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले. सुत्रसंचालन सुनील तुरूकमाने यांनी केले. या सभेला पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह नागरीकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## आ. रमेशआप्पा...

नगर, रूपचंद नगर, नेहरूनगर, रामनगर, ढोर गल्ली, लिंगायत गल्ली, एकुरके गल्ली, गाडे गल्ली, बालाजी मंदिर, कातळे गल्ली, येलम गल्ली, नासरजंग, श्रीराम नगर, संजय नगर या परिसरातील मतदारांच्या आ. रमेशआप्पा कराड यांनी गाठीभेटी घेतल्या.

यावेळी भाजपा ओबीसी मोर्चाचे भागवत सोट, पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, भाजपा विधानसभा अध्यक्ष अनिल भिसे, तालुकाध्यक्ष दशरथ सरवदे, पहिली नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, माजी नगराध्यक्षा आरती राठोड, जिल्हा भाजपाचे सतीश आंबेकर, चंद्रकांत कातळे, ज्ञानोबा भिसे, श्रीकृष्ण जाधव, शिवसेनेचे कुलदीप ठाकूर, रवी चव्हाण, सुधीर तोडकरी, अच्युत कातळे, संतोष राठोड, धम्मानंद घोडके, दत्ता सरवदे, विजय चव्हाण, महेश गाडे, श्रीकृष्ण मोटेगावकर, उत्तम चव्हाण, उज्वल कांबळे, प्रवीण कोतवाड, राजू आलापुरे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

पाच वर्षांपूर्वीचे रेणापूर आणि आजचे रेणापूर यात खूप मोठा विकसनशील बदल झाल्याने शहरातील विविध समाजातील मतदारात मोठे उत्साहाचे वातावरण दिसून येत होते. प्रत्येक ठिकाणी आ. रमेशआप्पा कराड यांचे महिलांनी औक्षण करून विजयीभव अशा शुभेच्छा दिल्या. मुस्लिम बांधवांनी ही आप्पांचा यथोचित सत्कार करून मताधिक्य मिळवून देण्याची ग्वाही दिली.

रेणापूर शहरातील मतदारांच्या गाठीभेटी प्रचार दौऱ्यात आ. रमेशआप्पा कराड यांनी केलेल्या विविध विकास कामाच्या पाठीशी आपण खंबीरपणे उभे राहून भविष्यात उर्वरित सर्व कामांना गती देण्यासाठी मला आशीर्वाद द्यावेत काम करण्याची संधी द्यावी असे आवाहन केले.

या प्रचार दौऱ्यात भाजपाचे दिलीप आकनगिरे, श्रीमंत नागरगोजे, अंतराम चव्हाण, नारायण राठोड, रामा चव्हाण, सचिन इगे, लखन आवळे, मनोज चक्रे, हनुमंत भालेराव, गणेश माळेगावकर, जगन्नाथ कातळे, राजू आतार, गणेश चव्हाण, शरद चक्रे, हनुमंत इंगे, अनिल चक्रे, नंदकुमार बंडे, सचिन शिरसकर, शिवसेनेचे रखमाची जोगदंड, बाळू माळेगावकर, श्याम राजे, सुरेखा चव्हाण, मनीषा मुंडे, रुक्मिणी इंगळे, महेश कलशेट्टी, शंकर कापसे, सचिन भोकरे, लक्ष्मण खलंगरे, हनुमंत आकनगिरे, शेख शहेनशहा, शेख मकसूद शेख दोष आवेश कुरेशी सोपान सातपुते, शेषराव पवार, ज्ञानोबा सातपुते, विशाल कांबळे, संजय विरुळे, सोमनाथ सातपुते, रावसाहेब कातळे, नरहरी डावळे, लिंबराज गायकवाड, महेश वरवटे, अजय मारलापल्ले, सुरज फुलारी व्यंकटेश दरोडे, नागेश बस्तापुरे, रफिक शिकलकर, सलीम मिस्तरी, विकी राजे, गणेश आकनगिरे, मनोहर सेदरकर, शशिकुमार अकनगिरे, अफजल सय्यद, विनोद गायकवाड, प्रशांत बंडे, गोविंद काळे, लक्ष्मण दळवी, वसंत काळे, मोतीराम कांबळे, शिवाजी भावे, भगवान काळे, गणेश भोकरे, दिलीप कांबळे, श्रीकांत राठोड, हनुमंत आडसकर, गोविंद माळेगावकर, रोहित खुमशे, गोविंद कटके, राहुल चव्हाण, निमराज चव्हाण महादेव राठोड संजय चव्हाण, जयवंत आडसकर, शंकर गाडे, शेषराव वाघमोडे, रंगनाथ एकुरके, काशिनाथ गवळी, श्रीकांत राठोड यांच्यासह अनेक जण होते

## जगप्रसिद्ध सारंगी...

कलाकारास आपण मुकलो आहोत, अशी भावना मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली आहे.

मूळचे राजस्थानच्या उदयपूरमधील राम नारायण हे ५० च्या दशकात मुंबईत आले आणि एकल सारंगी वादक म्हणून त्यांनी मोठी लोकप्रियता मिळवली. त्यांनी सारंगी वादनाच्या विविध शैली विकसित करून जागतिक स्तरावर कीर्ती मिळवली. संगीत क्षेत्रातील नवनव्या कलाकारांना पंडित राम नारायण यांचे कार्य नेहमीच प्रेरणा देणारे ठरेल, असे मत मुख्यमंत्र्यांनी आपल्या शोक संदेशात व्यक्त केले आहे.

## उद्धव ठाकरेंचे...

गोड कशी झाली? आमच्याकडे होते तेव्हा त्यांना मिरचीचा ठसका लागत होता. प्रफुल पटेल भाजपाबरोबर गेले आणि त्यांना मिरची गोड झाली. मग तुमच्याकडे आल्यानंतर सर्व साधू संत झाले का? आता ते विकास मी थांबवला अशी टीका माझ्यावर करतात. यावरून अमित शाह यांना मी प्रत्युत्तर दिलेलं आहे. ते लोकसभेच्या प्रचारात बोलत होते की, मला आदित्यला मुख्यमंत्री करायचंय आणि शरद पवारांना सुप्रिया सुळे यांना मुख्यमंत्री करायचंय. मग आता तुम्ही ज्यांना मानता त्यांच्या डोक्यावर हाथ ठेवून सांगता का? की तुम्हाला पंतप्रधान होण्याची इच्छा नाही म्हणून. हे ही शपथ घेऊन सांगा की कोणी कितीही जबरदस्ती केली तरी तुम्ही पंतप्रधान होणार नाही, असा हल्लाबोल उद्धव ठाकरे यांनी केला.

आधी जय शाह यांना क्रिकेटच्या बोर्डावरून खाली उतरवा. जय शाह यांनी काय विराट कोहलीचा विक्रम मोडला आहे का? सर्वात जास्त विकेट जय शाह यांनी काढल्या आहेत का? जय शाह यांचं कर्तृत्व काय? त्यांच्यापेक्षा आमच्या गावाकडचा एखादा मुलगा जास्त चांगलं क्रिकेट खेळतो. माझं आव्हान आहे जय शाह यांनी इकडे लोहा-कंधारला यावं आणि कोणत्याही तरुणाबरोबर क्रिकेट खेळून दाखवावं. आहेत का ते तयार? माझं त्यांना जाहीर आव्हान आहे, विराट कोहली वैगेरे नाही तर कोणत्याही गावातील एखाद्या तरुणाबरोबर जय शाहांनी क्रिकेट खेळून दाखवावं. मग मी मानेन की केवळ भारताचंच नाही जगाचंच नाही तर आणखी पृथ्वीशिवाय गुरु, शुक्र आणखी कुठे क्रिकेट क्लब असतील तर त्या सर्वांचा अध्यक्ष जय शाह यांना करा, अशी खोचक टीका उद्धव ठाकरे यांनी केली.

## अमित देशमुख...

घरापासून श्याम नगर - अमलपुरा - बजरंग चौक - जिजामाता चौक - भैरवनाथ मंदिर मार्गे बाजीराव चौक - पाणंद रोड मार्गे सुग्रे - किरणा दुकानासमोरून एल.आय.सी. ऑफिस सदरील रॅलीचा समारोप करण्यात आला.

## ...तर पहिल्या १००...

सुळे यांनी आदरणीय विलासराव देशमुखसाहेबांची आठवण काढून त्यांना अभिवादन केले. या मातीने खूप मोठा सुपुत्र महाराष्ट्र दिला आहे. आदरणीय वैशालीताई यांची त्यांना साथ होती. आदरणीय साहेबांचे विचार, त्यांचा आदर्श, समर्थ वारसा त्यांचे तीन सुपुत्र या ठिकाणी चालवत आहेत. धिरजभैय्यांचे अप्रतिम भाषण ते एक आदर्श लोकप्रतिनिधी असल्याचे सांगत त्यांचे कौतुक केले. त्यांनी ज्या-ज्या मागण्या केल्या आहेत. त्या सगळ्या मागण्या मी वरिष्ठ नेत्यांपर्यंत पोहोचवून त्या पूर्ण करण्याचा प्रयत्न करणार आहे. आपल्या सरकारचा शपथविधी झाल्यावर पहिल्या १०० दिवसांत सगळ्या मागण्या पूर्ण करणार आणि त्याची अंमलबजावणी करणार असल्याचा शब्द त्यांनी दिला.

हे लाडकं नव्हे लबाड सरकार- धिरज देशमुख

भाजपने अदृश्य शक्तीच्या माध्यमातून महायुतीचे सरकार जनतेवर लादले आहे. परंतु आमच्यावर आई तुळजाभवानी व महालक्ष्मीचा आशीर्वाद आहे. महाविकास आघाडीचे सरकार या ठिकाणी निवडून येणार आहे, असा विश्वास आमदार धिरज देशमुख यांनी व्यक्त करत काँग्रेसने काय केले असा प्रश्न विरोधक विचारतात. परंतु, दहा वर्षांमध्ये राज्य सरकारने व केंद्र सरकारने काय केले हे सांगा असा जाब त्यांनी विचारला. महायुती सरकारने फक्त भ्रष्टाचार, बेरोजगारी, महिला अत्याचार यात महाराष्ट्र एक नंबरवर नेऊन ठेवला आहे. हे लाडकं नाही तर लबाड सरकार आहे, असा टोलाही त्यांनी यावेळी लगावला.

दिल्लीप्रमाणे ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळा व्हाव्यात, आरोग्य व्यवस्था प्राथमिक आरोग्य केंद्र, बचत गटाला शून्य टक्के व्याज, ग्रामपंचायतीमध्ये महिलांना उद्योगासाठी जागा उपलब्ध करणे तसेच बचत गटांना शासनाच्या विविध वस्तू निर्मितीमध्ये सहभाग वाढविणे, गावामध्येच केजी टू पीजी शिक्षण मिळाले पाहिजे, यासाठी खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रयत्न करण्याची विनंती केली.

भाजपमुळे विकृत मानसिकता वाढली- प्रणिती शिंदे

खासदार प्रणिती शिंदे यांनी भाजपा युती सरकारवर जोरदार हल्ला चढवला. जिजाऊ, सावित्रींचा, अहिल्याबाईंचा महाराष्ट्र जो पुरोगामी विचारधारेवर चालतो, त्या महाराष्ट्रामध्ये आज चार-चार वर्षाच्या लहान मुलींवर अत्याचार आणि अन्याय होत आहेत. एकीकडे लाडकी बहीण म्हणून महिलांना तीन हजार रुपयांची लाच देत आहेत. तर दुसरीकडे त्याच लाडक्या बहिणीच्या चिमुरडीवर अन्याय, अत्याचार होतात. ही विकृत मानसिकता भाजपमुळे वाढली आहे. भाजप यासाठी दोषी असल्याचा आरोप करत भाजपला आता मते मागण्याचा अधिकार नसल्याचा घणाघात प्रणिती शिंदे यांनी यावेळी केला.

लाडकी बहीण योजनेवर बोलताना शिंदे पुढे म्हणाल्या, भाजपने निवडणुकीच्या तोंडावरच ही लाडकी बहीण चालू कशी केली. मागच्या तीन वर्षात लाडक्या बहिणाचा का विसर पडला होता? असा सवाल केला. ते आधी टेबलाच्या खालून पैसे द्यायचे आता टेबलाच्या वरून पैसे देत असल्याची टीका प्रणिती शिंदे यांनी केली.

## औशाच्या...

केला नाही. विकासाचा समांतर वाटा देणाऱ्या या नेतृत्वाचे हात आपण मजबूत केले पाहिजेत मराठवाड्यात सर्वाधिक मताधिक्याने हि जागा निवडून आणायची जबाबदारी आता आपली असून राज्याच्या मंत्रिमंडळात आमदार अभिमन्यू पवार यांना स्थान मिळणार असून त्यामुळे याभागातील विकासाला आणखी गती मिळणार आहे. महाविकास आघाडीच्या भूलथापांना बळी पडू नका महायुतीच्या सरकारने सर्व सामान्यांच्या हितासाठी अनेक चांगले निर्णय घेतले आहेत. त्यामुळे महाविकास आघाडीच्या पोटात गोळा उठला असून या योजना बंद व्हावा म्हणून त्यांचा आमदार सुनील केदार यांनी न्यायालयात धाव घेतली होती.याचा जाब तुम्ही मत मागायला येणाऱ्या ठाकरेंच्या उमेदवारांना विचारला पाहिजे. सर्व सामान्यांना केंद्रबिंदू मानून काम करणारे महायुतीचे सरकार पुन्हा सत्तेवर आल्यास या कल्याणकारी योजनेला आणखी बळ मिळेल लाकडी बहिण योजनेअंतर्गत मिळणाऱ्या रक्कमेत वाढ होवून महिलांना प्रत्येक महिन्याला २१०० रूपये देण्याचे आश्वासन या सरकारने दिले असून महिलांच्या सन्मान वाढविण्यासाठी अनेक चांगले निर्णय आमच्या सरकारने घेतले असल्याचे यावेळी बोलताना शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने यांनी सांगितले.

**CHANGE IN NAME**

DECLARATION

HERE IN THIS ADVERTISE I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER- INAYAT ALI SHER ALI SAYYED TO: INAYATALI SHERALI SAYYAD HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE INAYATALI SHERALI SAYYAD FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY AND RELATIVE

**OLD NAME**
INAYAT ALI SHER ALI SAYYED
**NEW NAME**
INAYATALI SHERALI SAYYAD
**ADDRESS**
NEAR MADINA MASJID KHORI GALLU LATUR 413512

**CHANGE IN NAME**
**DECLARATION**

HERE IN THIS ADVERTISE I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER- NASREENBANU INAYAT ALI SAYEED TO: NASARINABEGAM INYATALI SAYYAD HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE NASARINABEGAM INYATALI SAYYAD FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY AND RELATIVE

**OLD NAME**
NASREENBANU INAYAT ALI SAYEED
**NEW NAME**
NASARINABEGAM INYATALI SAYYAD
**ADDRESS**
KHORI GALLI NEAR MADINA MAJID LATUR 413512

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY NAME FROM SHAIKH RAISABEGUM SHAFIYODDIN TO CHOUDHARI RAISABEGAM SHAFIUDDIN HENCE FOR THIS DECLERETION AND WILL BE KNOWN BY THIS NAME I WILL USE CHOUDHARI RAISABEGAM SHAFIUDDIN IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY WIFE, CHILDREN AND FAMILY.

**OLD NAME**
SHAIKH RAISABEGUM SHAFIYODDIN
**NEW NAME**
CHOUDHARI RAISABEGAM SHAFIUDDIN
**ADDRESS**
PAIGAMBAR PURA, AT-POST-TQ. UDAGIR, DIST-LATUR (M.S.) 413517

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGE MY NAME FROM SHAFIYODDIN SHAIKH TO SHAFIUDDIN ABDUL SHUKUR CHOUDHARI HENCE FROTH THIS DECLERATION AND WILL BE KNOWN BY THIS NAME I WILL USE SHAFIYUDDIN ABDUL SHUKUR CHOUDHARI IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY WIFE CHILDREN AND FAMILY.

**OLD NAME**
SHAFIYODDIN SHAIKH
**NEW NAME**
SHAFIUDDIN ABDUL SHUKUR CHOUDHARI
**ADDRESS**
PAIGAMBAR PURA, AT-POST & TQ-UDGIR DIST-LATUR-413517

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGE MY NAME FROM SHAIKH SHAFIYODDIN ABDUL SHAKUR TO SHAFIUDDIN ABDUL SHUKUR CHOUDHARI HENCE FROTH THIS DECLERATION AND WILL BE KNOWN BY THIS NAME I WILL USE SHAFIUDDIN ABDUL SHUKUR CHOUDHARI IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY WIFE CHILDREN AND FAMILY.

OLD NAME: SHAIKH SHAFIYODDIN ABDUL SHAKUR

NEW NAME: SHAFIUDDIN ABDUL SHUKUR CHOUDHARI

ADDRESS: PAIGAMBAR PURA, AT-POST-UDGIR, TQ-UDGIR, DIST-LATUR (MS)-413517

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGE MY NAME FROM RAISABEGUM SHAFIYODDIN SHAIKH TO RAISABEGAM SHAFIUDDIN CHOUDHARI HENCE FROTH THIS DECLERATION AND WILL BE KNOWN BY THIS NAME I WILL USE RAISABEGAM SHAFIUDDIN CHOUDHARI IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY WIFE CHILDREN AND FAMILY.

**OLD NAME**
RAISABEGUM SHAFIYODDIN SHAIKH
**NEW NAME**
RAISABEGAM SHAFIUDDIN CHOUDHARI
**ADDRESS**
PAIGAMBAR PURA, AT-POST & TQ-UDGIR DIST-LATUR-413517

**CHANGE OF NAME**

My incorrect name was Yashraj Bhise, with father's name Dinesh Bhise and mother's name Kanchan Thigle And my correct name is Yashraj Dinesh Bhise with father's name Dinesh Dattu Bhise and mother's name is Kanchana
Both names are pertain to one
Affidavit no: 01AB 061892
Date:09/11/2024

**CHANGE IN NAME**
**DECLARATION**

HERE IN THIS ADVERTISE I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER- SHAIKH ABASALI ESMAIL TO: ABBAS ALI ISMAIL SHAIKH HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE ABBAS ALI ISMAIL SHAIKH FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY AND RELATIVE

**OLD NAME**
SHAIKH ABASALI ESMAIL
**NEW NAME**
ABBAS ALI ISMAIL SHAIKH
**ADDRESS**
KATGHAR GALLI AUSA DIST LATUR 413520

### जाहिर प्रगटन

माझे पक्षकार फुलाबाई संदीपान पवार रा. वाघोली ता. औसा जि.लातूर यांनी दिलेल्या माहिती, दर्शविलेले कागदपत्रे व अधिकृत केल्यावरुन जाहीर प्रगटन करण्यात येते की, दि.२६/१०/२०२४ रोजी १०.०० वा. सुमारास माझे पक्षकार हे कोरे गार्डन लातूर येथून प्रवास करीत असताना माझे पक्षकाराचे नावे असलेली मुळ खरेदीखत आरआर पावतीसहदस्त क्र.२७९७/१९८२ दि. २२/०७/१९८२ रोजीचे मुळ खरेदीखताचे दस्त हरवले/गहाळ झाले आहे. त्याबाबत माझे पक्षकाराने दि. २६/१०/२०२४ रोजी पोलीस स्टेशन गांधी चौक लातूर येथे अर्ज दिलेला आहे.

तरी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदरील मुळ खरेदीखतासंबंधी किंवा जो कोणी व्यक्ती सदरील कागदपत्राआधारे कसल्याही प्रकारचा व्यवहार करत असेल तर माझे पक्षकार यांचे होणारे नुकसान अथवा परिणामास सदरील बेकायदेशीर कामाबाबत जबाबदार राहणार नाहीत. जो कोणी अशा प्रकारचा व्यवहार करील त्याची सर्वस्वी दिवाणी व फौजदारी प्रकारची जबाबदारी त्याच्यावर राहील. तरी कोणास वरील नमुद कागदपत्रांबाबत माहिती असेल तर खालील नमुद पत्त्यावर कळवावे अथवा कोणाकडे वरील नमुद मुळ खरेदीखत आरआर पावतीसह असल्यास खालील नमुद पत्त्यावर जमा करावे. तसेच सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेपासून सात (७) दिवसाच्या आत सदरील कागदपत्रांबाबत माहिती नाही मिळाली तर माझे पक्षकार सदरील कागदपत्रांची नक्कल संबंधीत कार्यालयातून काढुन घेतील व योग्य ती पुढील कार्यवाही करतील, याची नोंद घ्यावी.

सबब हे जाहीर प्रगटन.
दिनांक : ०९/११/२०२४

तर्फे :

**ॲड. एम. बी. पठाण,**
**ऑ. सिल्वर ज्युबली रोड,**
**खोरी गल्ली, लातूर.**
**मो.क्र. ९४२२६५८५३५.**

**जाहीर प्रगटन देणार**
**फुलाबाई संदीपान पवार**

### जाहीर प्रगटन

सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, सतिशचंद्र सुरेशचंद्र देशमुख हे दि आदर्श सहकारी (भा.मा.) गृहनिर्माण संस्था म.लातूर या संस्थेचे सभासद होते. सदर संस्थेतील सर्वे नं.३३/ब/४ (कन्हेरी) मधील प्लॉट क्र. ७३ हा त्यांचे नावावर वर्ग करण्यात आला होता. सदरील प्लॉट हा अमोल बसवराज बिराजदार, रा. संगमेश्र्वर निवास, राममंदिरच्या मागे, राम नगर, उदगीर, ता. उदगीर, जि. लातूर यांच्या नावाने कायमस्वरुपी हस्तांतर (वर्ग) करणेचा प्रस्ताव संस्थेकडे दि. ०९.११.२०२४ रोजी सादर करण्यात आला आहे. त्यामुळे सदर प्लॉट क्र. ७३ च्या हस्तांतरणाबाबत कोणाचे काही आक्षेप अथवा उजर, तक्रार जसे की गहाणखत, खरेदीखत, दानपत्र, बक्षिसपत्र, ठरावपत्र, वारसाहक्क, न्यायालयीन प्रकरण व त्यातील आदेश, महानगरपालिकेचे आरक्षण, इच्छापत्र, तारण इ. असल्यास सर्व संबंधीतांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यातारखेपासून ०७ दिवसाच्या आत दि आदर्श सहकारी (भा.मा.) गृहनिर्माण संस्था म.लातूर या संस्थेच्या कार्यालयात लेखी स्वरुपात पुराव्यासह हरकत कार्यालयीन वेळेत सादर करावी. याबाबत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर प्लॉट निर्विवाद आहे असे समजून सदरील प्लॉट/मिळकत अमोल बसवराज बिराजदार यांच्या नावावर हस्तांतर (वर्ग) करणेची योग्य ती कार्यवाही संस्थेकडून करण्यात येईल. मुदतीनंतर आलेल्या हरकतीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही. याची कृपया संबंधीतांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १०/११/२०२४

**सचिव**
**दि आदर्श सहकारी (भा.मा.)**
**गृहनिर्माण संस्था म.लातूर.**

**This may be published in Newspapers and TV from day following the last date for withdrawal of candidature and up to two days before the date of poll**

**Format C-1**
**(For candidate to publish in Newspapers, TV)**

## DECLARATION ABOUT CRIMINAL CASES

**(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Drs. Union Of India & Anr.)**

Name and address of candidate : **Ramesh Kashiram Karad, R/o, Rameshwar, Tq. Dist. Latur.**
Name of Political Party in : **Bhartiya Janata Party**
Name of Election : **MAHARASHTRA STATE ASSEMBLY ELECTION - 2024**
Name of Constituency : **234-Latur Rural.**

**I, Ramesh Kashiram Karad, a candidate for the above mentioned election, declare for public information the following details about my criminal antecedents :**

**(A) Pending criminal cases**

| Sr. No. | Name of Court | Case No and Dated | Status of Case (s) | Sections of Acts Concerned & brief descriptions of offence (s) |
|---|---|---|---|---|
| 1) | CJM Court Latur | RCC No. 142/2002 | Hearing | u/s 147, 148, 149 of IPC |
| | 1st JMFC Nilanga Court | SCC No. 119/2022 | Plea/ Particulars | u/s. 188 of IPC, Sec. 135 Mumbai Police Act |
| | 1st JMFC Renapur Court | SCC No. 325/2021 | B.W. Unready | u/s 341, 269, 270 of IPC |
| | 8th JMFC Court Latur. | RCC No. 45/2016 | B.W. Unready | u/s 143,145, 149 IPC and 110, 112, 37, 37 (1) (3) Mumbai Police Act |

**(B) Details about cases of conviction for criminal offences**

| Sr. No. | Name of Court & date(s) of order | Description of offence (s) & Punishment imposed | Status of case (s) | Maximum Punishment Imposed |
|---|---|---|---|---|
| | Not Applicable | Not Applicable | Not Applicable | Not Applicable |
| | Not Applicable | Not Applicable | Not Applicable | Not Applicable |
| | Not Applicable | Not Applicable | Not Applicable | Not Applicable |
| | Not Applicable | Not Applicable | Not Applicable | Not Applicable |

**लोकमान्य अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि.उदगीर नगरपरिषद, उदगीर जि.लातूर संस्थेच्या विविध ठेवी योजना**

| कालावधी | व्याजदर |
|---|---|
| ३० ते ४५ दिवस - | ५.५० % |
| ४६ ते १८० दिवस | ७.५० % |
| १८१ ते ३६५ दिवस | ८.५० % |
| १२ महिने ते २४ महिने | ९.७५ % |
| २४ महिने ते ३६ महिने | १०.५० % |
| ३६ महिने ते ६० महिने | १० % |

९ % आवर्त ठेव द.सा.द.शे. ०.५० % अधिक व्याजदर जेष्ठ नागरीक व महिला, दाम दुप्पट,७८ महिने, वैधानिक कर्ज व इतर कर्ज १६ % सोने तारण कर्ज १४ % केअर हाउस कर्ज १६ %, वरिल सर्व ठेवीवर निमय व अटी लागू.







उदगीर
कार्यालय :०२३८५-२५३९९८ मो.९८५०२२८२४०
email - yashudgirram@gmail.com




**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**

**शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७**

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ५.००% | ५.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | १०.००% | १०.५०% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.५०% | ११.००% |

**मासिक प्राप्ती योजना :-** आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८६७/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३६ महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (१०.५०%)
**दाम दुप्पट योजना :-** रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)
**आवर्तक ठेव योजना (RD) :-** (०१/१०/२०२३ पासुन लागू)

| अ.क्र | मुदत/कालावधी | व्याजदर |
|---|---|---|
| १ | १३ ते २४ महिने | ९.२५% |
| २ | २५ ते ३६ महिने | ९.५०% |
| ३ | ३७ ते ६० महिने | १०.२५% |
| ४ | ६० महिने ते पुढे | ९.००% |

# आघाडी सरकार सत्तेवर आल्यास शेतकऱ्यांना तीन लाखापर्यंत कर्जमाफी

उदगीर प्रतिनिधी :- आमचे सरकार सत्तेवर आल्यास या राज्यात शेतकऱ्यांना तीन लाखापर्यंत कर्जमाफी देईल. तसेच बेरोजगारांना दरमहा चार हजार रुपये देईल,अशी घोषणाही त्यांनी यावेळी केली. लातूर जिल्ह्यातील उदगीर विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे उमेदवार सुधाकर भालेराव यांच्या प्रचारार्थ शनिवारी उदगीर शहरातील तालूका क्रीडा संकूल मैदानावर झालेल्या सभेत मतदाराशी संवाद साधत असताना ते बोलत होते.या जाहीर सभेत काँग्रेसचे नेते माजी मंत्री अमित देशमुख,उमेदवार सुधाकर भालेराव,माजी खासदार सुधाकर शृंगारे, खासदार फौजिया खान, राष्ट्रवादीचे नेते बसवराज पाटील नागराळकर, संजय शेटे, संभाजी पाटिल,शिवराज तोंडचिरकर,शिवाजी मुळे,ज्ञानेश्र्वर पाटिल,उषा कांबळे,लक्ष्मी भोसले,शिवाजी हुडे, चंदन पाटिल,गजानन सताळकर,डॉ अंजूम कादरी,कल्याण पाटिल,संभाजी पाटिल, पंडित धुमार,अजय शेटकार,राजा राजापुरकर ईश्र्वर समगे, गातकार राजेश सरकटे,यांच्यासह महाविकास आघाडीतील सर्व पक्षाचे नेते यावेळी उपस्थित होते.आपल्या देश्याचे सरकार बाहेरच्या देशातून सोयाबीन आयात करत असल्याचे शरद पवार म्हणाले,या देशातील इथेनॉल साखर कांदा सोयाबीन आदींना निर्यात बंदी करून सरकारने बाहेरच्या देशातून सोयाबीन आयात केले.सोयाबीनच्या उत्पादनाचा खर्चही निघत नाही,असा भाव सोयाबीनला मिळत आहे. यामुळे पुन्हा शेतकरी संकटात आलाआहे. जो शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करतो,त्याला सत्तेत राहण्याचा अधिकार नाही, असे सांगत महाविकास आघाडीच्या हातात सत्ता द्या,महाविकासआघाडी

तील सहकाऱ्यांच्या मदतीने राज्य पुन्हा प्रगती पथावर आणण्याचे, अश्र्वासन त्यांनी दिली.

नियमित कर्जफेड करणाऱ्यांना ५० हजारां पर्यंत प्रोत्साहनपर अनुदान देण्याचे जाहीर केले. राज्यातले अनेक कारखाने गुजरातला गेले राज्याचे उद्योग बाहेर जाणे हे राज्यावरील संकट आहे.हे संकट टाळायचे असेल तर राज्याच्या सत्तेत बदल झाला पाहिजे.त्यासाठी परिवर्तन होणे आवश्यक आहे.

मतदार जागी राहिले तर हे बदलू शकता,असे सांगून महाविकास आघाडीला निवडून द्या, असे आवाहन केले.महाविकास आघाडीला निवडून दिले तर महिलांना दरमहा तिन हजार रुपये,मोफत बस प्रवास, शेतकऱ्यांना ३ लाखापर्यंत कर्जमाफी, नियमित कर्ज फेड करणाऱ्यांना ५० हजारां पर्यंत प्रोत्साहनपर अनुदान, जातनिहाय जनगणना, बेरोजगारांना दरमहा चार हजार रुपये भत्ता तसेच राज्यातील प्रत्येक नागरिकाला २५ लाखाचा आरोग्य विमा व मोफत औषधोपचार देण्यासाठी महाविकास आघाडी सरकार कटिबद्ध राहील,अशी ग्वाही त्यांनी दिली.यावेळी माजी मंत्री अमित देशमुख,खासदार फौजिया खान,माजी खासदार सुधाकर शृंगारे, बसवराज पाटील नागराळकर, डॉ रवी मुळे,ईश्र्वर समगे, अजय शेटकार, पक्षाचे जिल्हाध्यक्ष संजय शेटे यांच्यासह उमेदवार भालेराव यांची भाषणे झाली.या सभेला उदगीर जळकोट तालुक्यातून मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# चिंचोलीरावबाडी परिसरात जनजागृती

लातूर /प्रतिनिधी- जिल्हाधिकारी तथा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर- घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली २३४- लातूर ग्रामीणचे निवडणूक निर्णय अधिकारी संदिप कुलकर्णी यांच्या नेतृत्वात मतदान जनजागृती (स्वीप) च्या पथकाने गावातील गृहभेटी देवून घरोघरी मतदार जागृतीस सुरुवात केली आहे. या अंतर्गत मतदारांना मतदान करण्यासाठी प्रात्साहीत करुन मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

चिंचोलीरावबाडी मांजरा साखर कारखाना परीसरातील मतदार व तरुण - तरुणी नव-मतदार यांनी मतदानाच्या उत्साहात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. गावातील व स्थलांतरीत मतदारांना संपर्क करुन २० नोव्हेंबर २०२४ रोजी आपल्या मतदान केंद्रावर येऊन मतदान करुन घेण्याचे यावेळी युवकांनी आश्र्वासित केले. या मतदान जनजागृतीमुळे मतदारामध्ये मतदान करण्यासाठी उत्साह निर्माण झाला आहे.

याप्रसंगी २३४ - लातूर ग्रामीण मतदार संघाचे स्वीप नोडल अधिकारी डॉ. मारुती सलगर म्हणाले मतदारांना संविधानाने मतदानाचा आधिकार दिला आहे, त्या अधिकाराचा हक्क आपण बजावून राष्ट्र व लोकशाही मजबूत करण्यासाठी पुढे आले पाहिजे. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ राज्याच्या सरासरी मतदानाच्या टक्केवारीपेक्षा आपल्या गावाची मतदानाची टक्केवारी होती. येत्या २० नोव्हेंबर, २०२४ रोजीच्या विधानसभेच्या मतदानात मतदार यादीत समाविष्ट मतदारांनी मतदान करुन आपल्या गावातील सर्व मतदारांनी मतदान करावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी पथकातील नोडल अधिकारी धनराज गीते, स्वीप समन्वयक मंगेश सुवर्णकार, स्वीप सदस्य हनुमंत भासिंगे, सुरेखा चंदिले, अमृतेश्र्वर स्वामी, जाकिर शेख, माधव बन यांनी आपल्या लोकगीत, गवळण, भारुड, पथनाट्याच्या माध्यमातून उपस्थित तरुण-तरुणी, जेष्ठ, दिव्यांग, तृतीयपंथी मतदारांना मतदानाचे आवाहन केले.

**टि.सी.हरवली आहे**

माजी निखिल शिवकुमार शेरे या नावाची डिप्लोमा ईन इलेट्रीकल इंजिनिअरींगची तृतीय वर्षाची टि.सी. व रहिवासी प्रमाणपत्र दि.८/०११/२०२४ रोजी उदगीर बस स्टँड येथे हरवले आहे कोणास सापडल्यास खालील मोबाईल नंबर वर संपर्क साधावा
मो.न.८४८२८१४३३७

# यशवंत महाविद्यालयातील माजी विद्यार्थींचा स्नेह मेळावा संपन्न

**बालाजी मुस्कावाड**



उदगीर प्रतिनिधी - उदगीर तालुक्यातील वाढवणा येथील यशवंत कनिष्ठ महाविद्यालयातील माजी विद्यार्थ्यांचा तब्बल २३ वर्षानंतर सन् २००१-२००२ ची अकरावी-बारावीच्या विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा दि. ५-११-२४ रोजी उदगीर येथील शिवम् लॉन्समध्ये मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

यावेळी झालेल्या कार्यक्रमात कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ पुणे येथील माजी सदस्य प्रा. राजेंद्र कांबळे तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. बालाजी पारसेवार , प्रा. कदम सर, प्रा. रमेश केंद्रे,, प्रा. सरवदे, प्रा. विरभद्र बिरादार, प्रा. कांबळे सर, एनसीसी प्रमुख बालाजी मुस्कावाड, हास्यकवी श्रीगण वंगवाड हे उपस्थीत होते.

सर्वच माजी विद्यार्थ्यांनी यावेळी महाविद्यालयीन जीवनातील आठवणींना उजाळा दिला. काहींनी आपला आनंदाने व भावनिक होऊन आपल्या भावना व्यक्त केल्या. आपले वय , पद, प्रतिष्ठा, कामाचा व्याप बाजूला ठेवून चाळीशी पूर्ण केलेले हे सर्व माजी विद्यार्थी उत्साहाने एकत्र जमले होते . त्यांच्या चेह-यावरचा आनंद ओसंडून वाहताना दिसून येत होता. अनेक वर्षानंतर आपण एकत्र भेटत आहोत , त्यामुळे ओळख लागते की नाही , ही मनातील भावना होती पण एकत्र आले आणि गळा भेटी झाल्या. सर्वांनी आपला परिचय दिला.

प्रमुख पाहुणे हास्यकवी श्रीगण वंगवाड यांनी आपल्या हास्य फुललय काव्यात या कार्यक्रमाच्या माध्यमातून कविता सादर करुन सर्वांना खूप हसवले.

अध्यक्षिय समारोपात प्रा. राजेंद्र कांबळे म्हणाले, ग्रामीण भागातील माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा घेणारे हे पहिलेच यशवंत महाविद्यालय आहे. त्यामुळे मला माजी विद्यार्थ्यांचा अभियान आहे. आपण सर्वजण आपापल्या क्षेत्रात उत्तम काम करत आहात , हे ऐकल्यानंतर खूप आनंद झाला. माझ्याकडून आपणास खूप शुभेच्छा.

प्रा. बालाजी पारसेवार, प्रा. रमेश केंद्रे, प्रा. बिरादार सर, प्रा. कदम सर, प्रा. कांबळे सर, एनसीसी प्रमुख बालाजी मुस्कावाड यांनी मार्गदर्शनपर भाषणे केली. प्रास्ताविक मुधाळे सरांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध साहित्यिका वर्षाराणी मुस्कावाड यांनी केले तर आभार गणेश बोयने यांनी मानले.

# प्रा.कुमार बंडे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर



उदगीर / प्रतिनिधी- देविदासराव जमदाडे विचार मंच लातूरच्या वतीने देण्यात येणारा आदर्श शिक्षक पुरस्कार प्रा. कुमार बंडे यांना जाहीर झाला आहे. या पुरस्काराचे वितरण लातूर येथील जयक्रांती महाविद्यालयात दि ११ नोव्हेंबर २०२४ रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत केले जाणार आहे.

श्री मन्मथस्वामी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय शिरूर अनंतपाळ येथे प्रा. कुमार बंडे हे इंग्रजी विषयाचे सहशिक्षक म्हणून कार्यरत आहेत. ते एक उत्तम वक्ते, उत्कृष्ट सूत्रसंचालक म्हणून परिचयाचे आहेत. अनेक शाळा, महाविद्यालयात ते व्याख्यानासाठी जातात. विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेत यश संपादन करण्यासाठी मार्गदर्शन करतात. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ते नेहमी आपल्या विद्यालयात विविध स्पर्धा आयोजित करतात. ते एक विद्यार्थी प्रिय प्राध्यापक म्हणून परिचयाचे आहेत.

यासोबतच सामाजिक वारसा देखिल ते जपतात. आपल्या मुळगावी गुडसूर येथे दरवर्षी दिपावली सुट्टी मध्ये वर्षभरात विविध क्षेत्रात यश संपादन केलेल्या भूमिपूत्रांचा सत्कार व व्याख्यान याचे आयोजन करतात. त्यामुळे आपल्या गावातील इतर तरुणांनी यापासून प्रेरणा घेऊन आपल्या जीवनात यश संपादन करावे, हा त्यांचा हेतू असतो. यासाठी त्यांच्या पुढाकारातून ग्राम विकास मंच गुडसूर याची स्थापना करण्यात आली आहे.

प्रा.कुमार बंडे यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याची दखल घेऊन त्यांना आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन अजय मुडपे, राष्ट्रपती आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त सहशिक्षक विश्र्वनाथ मुडपे, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य धनंजय गुडसूरकर, एनसीसी प्रमुख बालाजी मुस्कावाड, प्रा. धनराज बंडे, बाळू तोटकर, बलन मुडपे, तुकाराम महाराज, वर्षाराणी मुस्कावाड, धनाजी मानसिंगे, गजानन पाटील, मिलिंद जोशी, आकाश तोटकर, ग्राम विकास मंचचे सदस्य यांनी केले आहे.

# मैत्री प्रशिक्षणातून मिळालेल्या ज्ञानाद्वारे जनजागृती करून दुग्ध उत्पादन वाढीस हातभार लावा



उदगीर / प्रतिनिधी- 'मैत्री' प्रशिक्षणातूनमिळालेल्याज्ञानाद्वारे जनावरांतील गर्भधारणा दर वाढवण्याबरोबरच जनजागृती करून दुग्ध उत्पादन वाढीस हातभार लावा असे प्रतिपादन डॉ. नंदकुमार गायकवाड, सहयोगी अधिष्ठाता, पशुवैद्यकीय महाविद्यालय, उदगीर यांनी केले. ते 'राष्ट्रीय गोकुळ मिशन' अंतर्गत महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर; पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने पशुप्रजनन व स्त्रीरोगशास्त्र विभाग, पशुवैद्यकीय महाविद्यालय, उदगीर येथे आयोजित 'ग्रामीण भारतासाठी बहुउद्देशीय कृत्रिम रेतन तंत्रज्ञ' (च-खढठख) दुसऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमातील प्रशिक्षणार्थींच्या प्रमाणपत्र वितरण व सांगता समारंभ कार्यक्रमात अध्यक्षीय स्थानावरून बोलत होते. पशुवैद्यकीय महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. नंदकुमार गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सदरील प्रशिक्षण कार्यकमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठावर डॉ. अनिल पाटील, प्रकल्प सह-समन्वयक हे उपस्थित होते.

डॉ. अनिल पाटील यांनी प्रास्ताविकामध्ये या प्रशिक्षणामध्ये राबविण्यात आलेल्या बाबींविषयी सर्वाना अवगत केले आणि प्रशिक्षणार्थीना वाढलेल्या जबाबदारीची आठवण करून दिली. आपल्या मार्गदर्शनात पुढे डॉ. नंदकुमार गायकवाड यांनी प्रशिक्षित तरुणांनी पशुपालकांना उत्तम व वेळेवर सेवा देऊन पशुपालकांच्या अडचणी सोडवून तसेच योग्य वेळी कृत्रिम रेतन करून जनावरांतील गर्भधारणा दर वाढवण्यासाठी नेहमी प्रयत्नशील राहावे. यामुळे जनावरांचा भाकडकाळ कमी होऊन जनावरापासून उत्पादनकाळ जास्त मिळेल आणि पशुपालकांची आर्थिक उन्नती होईल असे प्रतिपादन केले. लातूर व नांदेड जिल्ह्यातील ३० सुशिक्षित बेरोजगार तरुणांनी सदर प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले म्हणून त्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. यावेळी प्रशिक्षणार्थींनी आपले मनोगत व्यक्त केले व प्रशिक्षणामधून मिळालेल्या ज्ञानाबाबत समाधान व आभार व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशिक्षण सहसमन्वयक डॉ. प्रफुल्लकुमार पाटील यांनी तर आभार प्रदर्शन प्रशिक्षण सहसमन्वयक डॉ. राहुल सूर्यवंशी यांनी केले. यावेळी प्रशिक्षणार्थी आणि इतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लालबहादूर शास्त्री विद्यालयाचे विद्यार्थी जुन्या आठवणीत



उदगीर / प्रतिनिधी- शाळेतील मस्ती, एकत्रितपणे केलेला अभ्यास, गुरुजींची शिस्त, स्नेहसंमेलने, खेळ अशा विविध विषयांवर माजी विद्यार्थ्यांनी गप्पा मारून जुन्या आठवणींना उजाळा दिला. या गप्पांच्या ओघात सर्वजण आपण इतके मोठे झालो हे अक्षरशः विसरून गेले होते .

निमित्य होते लालबहादूर शास्त्री विद्यालयातील दहावी २००१ या बॅचचा स्नेह मेळाव्याचे. दिनांक ३ नोव्हेंबर २०२४ रोजी तब्बल २३ वर्षानंतर पहिल्यांदाच या विद्यार्थ्यांनी हा स्नेह मेळावा आयोजित केला होता. शाळेतील विविध विद्यार्थी आज उद्योग, शिक्षण तंत्रज्ञान ,राजकारण, समाजकारण अशा अनेक क्षेत्रात काम करीत असून त्यांनी आपल्या कामाचा वेगळा ठसा उमटवला आहे. सकाळी बरोबर अकरा वाजता शाळेची घंटा व प्रार्थना तसेच राष्ट्रगीताने कार्यक्रम सुरू झाला. याप्रसंगी भारतीय शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यकारणी सदस्य तथा स्थानिक समन्वय समितीचे कार्यवाह श्री शंकरराव लासुने हे अध्यक्ष म्हणून तर संकुलाचे अध्यक्ष श्री मधुकरराव वट्टमवार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

याप्रसंगी प्रशालेतून निवृत्त झालेले शिक्षक श्री बनशेळकीकर गुरुजी, धनाजी जाधव , उप्परबावडे गुरुजी ,सरोज बाई ,जनवाडकर बाई, सौ अंजली बनशेळकीकर बाई, सुरेखा कुलकर्णी बाई, शिवशंकर राऊत गुरुजी, गोपाळ जोशी गुरुजी, संजय विभुते गुरुजी, नळगीरकर गुरुजी तसेच सध्याचे पर्यवेक्षक श्री मठवाले गुरुजी, कोणाळे गुरुजी, मच्छिंद्र मामा, डांगे ताई आदी उपस्थित होते.

सर्व मान्यवरांचा याप्रसंगी शाल स्मृतीचिन्ह व पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. विशेष बाब खारीमुरे विकणाऱ्या तानाजी मामाचाही सत्कार या विद्यार्थ्यांनी केला, सर्व विद्यार्थ्यांनी आपला परिचय दिला. आभा गुडसुरकर , विशाल तोंडचिरकर या विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून शाळेतील कडू गोड आठवणींना उजाळा करून देत आपल्या भावनांना वाट करून दिली. नंतर बनशेळकीकर गुरुजी जाधव गुरुजी राऊत गुरुजी व विभूते गुरुजींनी विद्यार्थ्यांविषयी मनोगत व्यक्त केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी २००१ च्या विद्यार्थ्यांनी शाळेला साऊंड स्पीकर भेट ही दिली. विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचा मनमुराद आनंद लुटला आपापल्या वर्गांना भेटी दिल्या व जुन्या आठवणींमध्ये रमले. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक संतोष मोरतळे यांनी केले तर स्वागत व परिचय दिपाली धुमाळे यांनी करून दिला. शिल्पा गिरी यांनी आभार व्यक्त केले तर सूत्रसंचालन अंबिका पारसेवार यांनी केले. मनोरंजनात्मक खेळाने विद्यार्थ्यांनी लहानपण अजून एकदा जगायलाही ते विसरले नाहीत. अल्पोपहारानंतर वंदे-मातरम या राष्ट्रगानाने कार्यक्रमाची सांगता झाली. या स्नेह मेळाव्यासाठी दहवी २००१ या बॅच चे माजी विद्यार्थी संघटन प्रमुख संदीप बोधनकर, प्रशांत शिंदे ,सूर्यकांत साकोळे ,संगमेश मुलगे, मनीष बुलानी, आशिष अंबरखाने ,अमोल नखाते, भालचंद्र कुडलिकर, अश्र्विनी सुडे,शिल्पा देशमुख, कोमल केंद्रे,प्रिती पंदिलवार, विनोद चनाळे असे एकूण १०० विद्यार्थी उपस्थित होते.